सभापतीस्थानी माननीय सभापती

अधिवेशनाचा शुभारंभ " वंदे मातरम् " या गीताच्या समूह गायनाने झाला.

नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाबाबत

सभापती : आजचा प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन "राज्यात पाऊस न पडल्यामुळे निर्माण झालेली भीषण दुष्काळी परिस्थिती " यावर चर्चा करण्यासाठी नियम 289 अन्वये एकूण तीन प्रस्ताव देण्यात आलेले आहेत. पहिला प्रस्ताव सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आज सकाळी 9 वाजून 27 मिनिटांनी दिला असून दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील आणि सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी दिला आहे त्या प्रस्तावावर आणखी एका सन्माननीय सदस्यांचे नाव असून ते सत्तारुढ पक्षाचे आहेत. त्यांना स्थगन प्रस्तावाची सूचना देता येत नसल्यामुळे मी त्यांचे नाव वाचून दाखवत नाही. हा प्रस्ताव आज सकाळी 9 वाजून 50 मिनिटांनी देण्यात आला आहे. त्यानंतर तिस-या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र.पाटील आणि श्री. जैनुद्दिन जव्हेरी यांची नावे आहेत. सत्तारुढ पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना हा प्रस्ताव देता येत नाही परंतु सन्माननीय सदस्य श्री जैनुद्दिन जव्हेरी यांचे नाव मी अनवधानाने वाचले आहे. अशा प्रकारे एकूण तीन प्रस्ताव आलेले आहेत. या प्रस्तावांच्या अनुषंगाने .....

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मला एक शंका विचारावयाची आहे आणि ती अशी की, सत्तारूढ पक्ष सदस्य नियम 289 अन्वये प्रस्ताव देऊ शकतात काय ?

सभापती : म्हणूनच मी दुसरा प्रस्ताव देणाऱ्या सदस्यांची नावे वाचून दाखविताना सांगितले की, प्रस्ताव देणाऱ्यांमध्ये सत्तारूढ पक्ष सदस्याचे नाव होते आणि ते मी येथे वाचून दाखविले नाही. तसेच तिसऱ्या प्रस्तावाबाबत सांगताना मात्र अनावधानाने मी तो देणाऱ्यापैकी सत्तारूढ पक्ष सदस्याचे नाव वाचून दाखविले. परंतु वस्तुत: त्यांना अशा प्रकारचा, हा प्रस्ताव देता येणार नाही. ....

श्री. गुरूनाथ कुलकर्णी :सभापती महोदय, हे सारे कन्व्हेन्शनल आहे. सत्तारूढ पक्ष सदस्याने नियम 289 चा वापर करू नये असे केवळ संकेत आहेत. परंतु नियम 289 चा प्रयोग वा वापर सत्तारूढ पक्ष सदस्याने करू नये असे त्या नियमात कोठेही म्हटलेले नाही.

सभापती : आतापर्यंत जे संकेत आपण येथे पाळले आहेत ते लक्षात घेता नियम 289 अन्वये सत्तारूढ पक्ष सदस्य अशा प्रकारची सूचना देण्याचे टाळतात आणि म्हणूनच मी त्या दृष्टीने प्रस्ताव देणाऱ्यांतील सत्तारूढ पक्ष सदस्याचे नाव वाचण्याचेही टाळले आहे.

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मला हे मान्य आहे. परंतु सभापतींना वाटले तर नियम 289 अन्वये कोठल्याही सदस्याला मग तो सत्तारूढ पक्षाचा सदस्य असला तरी त्याला प्रस्ताव सभागृहात मांडता येतो. तोही सभागृहाचा संकेत आहे.

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, मला येथे केवळ कन्व्हेंशनबाबत सांगावयाचे आहे. ज्याप्रमाणे सत्तारूढ पक्ष सदस्याने नियम 289 खाली प्रस्ताव मांडायचा नसतो त्याच आधारे विरोधी पक्षाने देखील शोक प्रस्तावाच्या अगोदर अशा प्रकारचा कोठलाही प्रस्ताव सभागृहापुढे मांडू नये असेही संकेत आहेत.

सभापती : सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार यांनी मांडलेल्या मुद्याच्या संदर्भात मी आपल्याला सांगेन की, आजच्या कामकाज पत्रिकेवर जे विषय आहेत त्यातील पहिला विषय हा प्रश्नोत्तरांचा आहे. त्यामुळे प्रश्नोत्तरे झाल्यानंतर जे कामकाज आहे त्यात शोकप्रस्ताव येतो. आता एखाद्या दिवशी अत्यंत महत्त्वाच्या बाबीच्या अनुषंगाने सभापतींचे लक्ष वेधून नियम 289 खाली सत्तारूढ पक्ष सदस्यांना प्रस्ताव देताच येणार नाही असे म्हणता येणार नाही., शेवटी सदस्य म्हणून आता सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांनी सांगितल्याप्रमाणे तो त्याचा अधिकार आहे, भले कन्व्हेन्शन काहीही असेल. तरीही मी याबाबतीत आणखी तपासून घेतो आणि मग माझे या संबंधात रूलिंग देईन. ...

..... बी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण या संबंधात रूलिंग देण्यापूर्वी मला सभागृहाला मार्गदर्शन करण्याची इच्छा आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांनी सांगितल्याप्रमाणे सत्तारूढ पक्ष सदस्याला अशा प्रकारचा प्रस्ताव देण्याचा अधिकार आहे., कारण नियमामध्ये सत्तारूढ पक्ष सदस्याने प्रस्ताव देऊ नये याबाबत स्पष्ट असे कोठेही म्हटलेले नाही. हे सांगण्यास ठीक आहे. परंतु मुळात नियमात वेगळी तरतूद आहे. सत्तारूढ पक्ष सदस्याला एखाद्या तेवढ्याच निकडीच्या व महत्त्वाच्या बाबीकडे शासनाचे लक्ष वेधावयाचे असेल तर त्यासाठी आपल्या नियमांमध्ये अन्य आयुधे आहेत. या सभागृहाचे कामकाज चालविण्याची जबाबदारी ही सरकारची आहे, सरकार पक्षाची आहे. असे असताना आपल्याच सरकारचे कामकाज ताबडतोब तहकूब करा आणि एखाद्या महत्त्वाच्या बाबीवर चर्चा घडवून आणावी असे सत्तारूढ पक्ष सदस्याने म्हणणे बरोबर होणार नाही. ...

(यानंतर श्री.सरफरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

नियम 289 अन्वये मांडण्यात यावयाच्या प्रस्तावान्वये सरकारच्या ध्येय धोरणाबाबत आणि कल्याणकारी योजनांच्या कृतीबाबत विरोधी भावना आणि नापसंती व्यक्त करावयाची असते. यानिमित्ताने सरकारच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडता येत नाही. सरकारकडून जनहिताच्या कामामध्ये अक्षम्य चूक झाली आहे, आणि त्यामुळे सरकारी पक्षामध्ये बसून आपला असह्य कोंडमारा होत आहे, तथापि सरकारवर निष्ठा असल्यामुळे मी सरकारच्या विरोधात निषेध व्यक्त करु शकत नाही हे सरकारला सांगितले पाहिजे अशी जर माननीय सदस्यांच्या मनामध्ये भावना निर्माण झाली तर त्यासाठी नियम 93 अंतर्गत चर्चा उपस्थित करण्याची नियमात तरतूद आहे. परंतु सरकारी पक्षाचे असलेले कामकाज तहकूब करावे असे सरकारी पक्षामध्ये राहून जर माननीय सदस्य सांगत असतील तर ते सरकारी कामकाजाला पूर्णपणे छेद देण्याचे काम करीत आहेत. सरकारी कामकाजातील उणिवा दाखविण्याचे काम विरोधी पक्षाचे आहे. परंतु याठिकाणी नियम 93 मध्ये मध्ये अशी तरतूद आहे की, "निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करु इच्छिणारा सदस्य नियोजित प्रस्तावाचे लेखी निवेदन विधानपरिषदेच्या ज्या बैठकीत चर्चा उपस्थित करण्याचे त्याने योजले असेल त्या बैठकीच्या सुरुवातीपूर्वी निदान एक तास अगोदर सचिवांच्या स्वाधीन करील आणि विधानपरिषदेच्या बैठकीस सुरुवात होण्यापूर्वी नियोजित प्रस्तावास सभापतींची संमती मिळवील." परंतु नियम 289 मध्ये माननीय सदस्यांवर याबाबतीत निर्बंध आहेत.

सभापती : माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी आपले म्हणणे मांडावे.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, याठिकाणी माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सभागृहाच्या संकेत आणि कन्व्हेंशनबाबत आपले मत सांगितले आहे. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी म्हटल्याप्रमाणे नियम 289 अन्वये प्रस्ताव मांडीत असतांना सत्ताधारी पक्षातील सदस्य सरकारच्या विरोधी आपल्या भावना प्रकट करणार आहेत असा त्याचा अर्थ होत नाही. एखाद्या सार्वजनिक हिताच्या गंभीर प्रश्नाच्या अनुषंगाने सरकारच्या कारभारातील उणिवा किंवा चुका याठिकाणी स्पष्टपणे मांडण्याचे काम सत्ताधारी पक्षातील माननीय सदस्य करीत असतील तर ते सरकारला विरोध करीत आहेत असे नव्हे. एवढेच मला यानिमित्ताने लक्षात आणून द्यावयाचे आहे.

सभापती : नियम 289 च्या अनुषंगाने माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी केलेले स्पष्टीकरण सुध्दा महत्वाचे आहे. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या अनुषंगाने नियम 93 मधील तरतुदीसंबंधी केलेले भाष्य वेगळया प्रकारचे आहे. एखादा अत्यंत तातडीचा व महत्वाचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ SBT/

सभापती...

विषय सभागृहामध्ये आणून त्या विषयावर चर्चा घडवून आणण्याकरिता नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास तहकूब करण्यासंबधीचा नियम आहे. तेव्हा संकेताच्या दृष्टीने बघितले तर शक्य तो सत्ताधारी पक्षाचे माननीय सदस्य त्या चर्चेमध्ये सहभागी होण्याचे टाळतात याचा अर्थ त्यांना आपले म्हणणे मांडता येत नाही असा होत नाही. तेव्हा माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते व माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावासंबंधी स्पष्टीकरणात्मक एक-दोन मुद्दे मांडावेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये कधी नव्हे इतकी अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली आहे, त्या परिस्थितीवर चर्चा घडवून आणून त्याबाबत उपाययोजना करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे, त्याकरिता नियम 289 अन्वये सभागृहामधील सर्व कामकाज बाजूला ठेवून आपण या विषयावर चर्चा करावी अशी यानिमित्ताने आम्ही मागणी करीत आहोत. आणि ती उपाययोजना आपण केली नाहीतर या अधिवेशनामध्ये या विषयावरील चर्चेला आपण मुकलो असे होईल. पुढील अधिवेशन डिसेंबर महिन्यापर्यंत होणार नसल्यामुळे ही चर्चा तातडीने होण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, दरवर्षी पावसाळयाची सुरुवात रोहिणी नक्षत्रापासून होते. मे महिन्याच्या 21 तारखेला या नक्षत्राला सुरुवात होते आणि 7 जूनपासून पेरण्यांना सुरुवात होते. आज जुलै महिन्याची 16 तारीख असून 7 जून ते 16 जुलैपर्यंत महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्हयांमध्ये सरासरीपेक्षा 25 टक्के इतका सुध्दा पाऊस पडलेला नाही. काही ठिकाणी तो थोडयाफार प्रमाणात पडला. विदर्भामध्ये धूळ पेरण्या करण्याची पध्दत आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / अशुद्धीसाठी नाही

लोकांनी धूळ पेरणी केली, पण पावसाअभावी त्या उलटल्या. अगोदरच राज्य शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे राज्यामध्ये खताच्या बाबतीत तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना खत मिळाले नाही. उलट खताच्याऐवजी लाठया खाव्या लागल्या आहेत, शेतकऱ्यांचे रक्त सांडलेले आहे. तसेच शेतकऱ्यांना बियाणे मिळालेले नाही आणि सध्या कुठेही पावसाचा थेंब पडलेला नाही. पदवीधर मतदार संघातील निवडणुकीच्या निमित्ताने मी मराठवाडयामध्ये 200-200 कि.मी.फिरलो आहे.परंतु कुठेही हिरवीगार शेती दिसून आली नाही, तर काळीशार शेतीच दिसून आली. विदर्भा मध्ये देखील हीच परिस्थिती आहे. केंद्र शासनामार्फत जी कर्जमाफी जाहीर करण्यात आली, त्या बाबतीत सांगावयाचे तर पाच एकराच्या आतील जे शेतकरी आहेत, त्यांनाच कर्जमाफी योजनेचा लाभ झाला आहे. मात्र जे उर्वरित शेतकरी आहेत, तसेच ज्यांनी प्रामाणिकपणे कर्ज परत केलेले आहे असे शेतकरी या लाभापासून वंचित राहिले आहेत. असे जवळजवळ 25 लाख शेतकरी आहेत. केंद्र शासनाने कर्जमाफी योजना जाहीर केल्यानंतरही विदर्भामध्ये जवळपास पावणे दोनशे शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत आणि तेथे गेल्या दीड महिन्यापासून पावसाचा अजिबात एकही थेंब पडलेला नाही.महाराष्ट्रामध्ये 1972 नंतर एवढी अभूतपूर्व परिस्थिती कधीच निर्माण झाली नव्हती, अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे जरी प्रश्नोत्तराचा तास महत्वाचा असला तरी सुध्दा सध्या महाराष्ट्रामध्ये जी परिस्थिती निर्माण झाली आहे, त्यापेक्षा दुसरा कोणताच प्रश्न महत्वाचा नाही. आज अधिवेशनास सुरुवात होत आहे. मुळामध्ये या राज्यातील गोरगरीब शेतकरी, शेतमजूर, कामगार, सर्वसामान्य माणसांच्या विविध प्रश्नावर विचार-विनिमय करण्यासाठी हे सभागृह आहे. अशा वेळी जर या राज्यातील गोरगरीब शेतकरी, शेतमजूर, कामगार, सर्वसामान्य माणूसच अडचणीत आला असेल तर त्यापेक्षा दुसरा कोणताही विषय महत्वाचा असू शकत नाही. म्हणून माझी अशी विनंती आहे की, आता प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन, सदनासमोरील सर्व कामकाज स्थगित करावे आणि महाराष्ट्र राज्यामध्ये निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीसंबंधात नियम 289 अन्वये जो प्रस्ताव देण्यात आलेला आहे, त्याबाबत चर्चा करण्यासाठी सभागृहासमोरील आजचे कामकाज स्थगित करावे अशी मी यानिमित्ताने आपल्याला विनंती करीत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, खरे म्हणजे आम्ही या विषयाच्या संदर्भात नियम 289 अन्वये प्रस्ताव मांडण्यापूर्वी आपल्याकडूनच सुमोटो अशा प्रकारचा प्रस्ताव यावयास हवा होता,

. . . .डी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

सभापती महोदय, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, 1972 च्या भीषण दुष्काळानंतर पुन्हा या राज्यामध्ये गंभीर दुष्काळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे. मात्र अशी परिस्थिती असताना राज्यामध्ये शासन अस्तित्वात आहे की नाही ? अशी शंका निर्माण होण्यासारखी अवस्था आहे. राज्यामध्ये पुरेसा पाऊस पडलेला नाही हे सर्वांना माहिती आहे.

सभापती : सदरहू प्रस्ताव नियम 289 अन्वये चर्चेसाठी का घेण्यात यावा ? तेवढेच सन्माननीय सदस्यांनी सांगावे. मी या प्रस्तावावरील चर्चेला परवानगी दिल्यानंतर मग सन्माननीय सदस्यांनी बाकीची माहिती सांगावी.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्हाला हा प्रस्ताव नियम 289 अन्वये का मांडावा लागला आहे याबाबत मी सांगत आहे. या राज्यातील शेतकरी टाचा घासून मरणार अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. राज्यातील 300 तालुक्यांपैकी जवळजवळ 210 ते 212 तालुक्यांमध्ये पावसाचा एक थेंबही पडलेला नाही. मराठवाडा, विदर्भामध्ये देखील गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे. पश्चिम महाराष्ट्रामध्ये सुध्दा समाधानकारक पाऊस झालेला नाही. मात्र तेथे अजिबात पाऊस पडलाच नाही असे नाही. तर थोडा-थोडा का होईना पण शिंपडला आहे. पण मराठवाडा आणि विदर्भ या भागामध्ये पाऊस पडलेला नसल्याने तेथील लोकांच्या कपाळी पुन्हा भयानक परिस्थिती निर्माण झालेली आहे. आम्ही पदवीधर मतदार संघातील निवडणुकीच्या निमित्ताने या भागांमध्ये फिरलो आहोत. त्यावेळी माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील सुध्दा होते. या भागामध्ये पेरण्या झालेल्या नाहीत. फक्त 20 ते 25 टक्के पेरण्या झालेल्या आहेत, पण त्या फुकट गेलेल्या आहेत आणि त्या शेतकऱ्यांवर पुन्हा दुबार पेरण्या करण्याची वेळ आलेली आहे अशी सर्व संकटे शेतकऱ्यांवर आलेली आहेत. हे राज्य निर्माण झाल्यानंतर पहिल्यांदा अशी परिस्थिती आलेली आहे की, शेतकऱ्यांना खत मिळविण्यासाठी या राज्य शासनाच्या पोलिसांच्या लाठ्या खाण्याची वेळ आली आहे, आपले रक्त सांडावे लागलेले आहे आणि हा अत्यंत गंभीर विषय आहे. शासनाचे म्हणणे असेल की, आम्ही पाऊस अडविलेला नाही. राज्यामध्ये अपुऱ्या पावसामुळे जी गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे, तो वेगळा विषय आहे. परवाच्या दिवशी आमच्याबरोबर एक सन्माननीय मंत्री महोदय होते. मी त्यांचे नाव सांगत नाही. त्यावेळी आम्ही त्यांना सांगितले की, जनावरांना चारा उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे. जनावरे जगली पाहिजेत.

. . . .डी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

पण तो उपलब्ध होत नाही. अशा प्रकारे राज्यामध्ये जी गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे, त्या पार्श्वभूमीवर आज अधिवेशन सुरु होत आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील शेतकरी चातका सारखी पावसाची वाट पहात आहे. अशा परिस्थितीमध्ये शासन नक्की कोणती पावले उचलणार आहे याची देखील वाट पहात आहे. अशा प्रकारे शेतकरी वाट पहात असताना सन्माननीय मंत्री महोदयांनी जाहीर केले की, आम्ही अगोदर आणेवारी करु आणि मग दुष्काळ जाहीर करु.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

पेरण्याच झालेल्या नाहीत तर आणेवारीचा प्रश्न कोठे येतो ? त्यामुळे लोक संभ्रमित झालेले आहेत. आम्ही पेरलेच नाही, काही उगवलेच नाही तर शासन आणेवारी कोठे करणार ? लोकांशी आमचे काही देणे घेणे नाही अशा पध्दतीने बेजबाबदारपणे शासन लोकांपर्यंत संदेश पोहोचवित आहे. म्हणून या सदनाचे आजचे इतर कामकाज बाजूला सारुन या प्रस्तावाची चर्चा या सदनामध्ये सुरु झाली पाहिजे आणि त्या चर्चेच्या माध्यमातून जनतेला शासनाकडून समर्पक उत्तर मिळाले पाहिजे. केवळ वेळ मारुन न्यावी अशा पध्दतीचे उत्तर दिले असे होता कामा नये अशी आमची भावना आहे. सरकारला अडचणीत आणण्यासाठी आम्ही हा प्रस्ताव दिलेला नाही. जनतेच्या भावना या ठिकाणी व्यक्त केल्या आणि सरकारने असा असा तोडगा काढला हे लोकांना समजले पाहिजे. सरकारकडून या प्रस्तावाच्या माध्यमातून राज्यातील निरनिराळ्या ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना निश्चितपणे दिलासा दिला गेला पाहिजे या भावनेतून आम्ही हा प्रस्ताव उपस्थित करीत आहोत. या प्रस्तावावर चर्चा करुन शासनाकडून या प्रस्तावाला योग्य प्रतिसाद मिळाला पाहिजे. अन्यथा आम्हाला जनतेच्या भावना उद्विग्नपणे मांडण्यास भाग पाडू नये. त्यादृष्टीने आपण हा प्रस्ताव मान्य करावा अशी मी आपल्याला तसेच सदनाच्या नेत्यांना विनंती करतो.

सभापती : दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील आणि श्री. कपिल पाटील यांनी दिलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी याबाबत थोडक्यात आपले म्हणणे मांडावे. मी या दोन्ही प्रस्तावावर एकत्रितपणे निर्णय देणार आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, कर्जमाफीच्या बाबतीत गेल्यावेळी या सभागृहामध्ये चर्चा करीत असताना मी सांगितले होते की, ही फसवी कर्जमाफी आहे. या ठिकाणी अनेक शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिलेले आहेत. ही कर्जमाफी देत असताना प्रामुख्याने ज्या डेअरी संस्था आहेत, ज्या पोल्ट्री संस्था आहेत, आमच्या कोकणातील ज्या मच्छिमार संस्था आहेत तसेच त्या ठिकाणी असलेले जे मच्छिमार बांधव आहेत ते कर्जमाफीपासून वंचित आहेत. या ठिकाणी महाराष्ट्रातील शेतकरी संभ्रमित आहेत. या ठिकाणी कर्जमाफी कोठे मिळणार आहे, कशी मिळणार आहे ? शासनाने या ठिकाणी वेळोवेळी वेगवेगळी धोरणे जाहीर केली. गेल्या अधिवेशनामध्ये या सभागृहामध्ये या राज्याच्या सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी असे जाहीर केले की, केंद्र

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP

श्री. जयंत प्र. पाटील .....

सरकारची कर्जमाफी येऊ द्या, त्यामध्ये अपुरेपणा असला तर राज्य शासन त्यावर तातडीने निर्णय घेऊन राहिलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देईल. परंतु शासन त्याबाबतीत अजून कोणताही निर्णय घेत नाही. दुष्काळी परिस्थितीबरोबरच ही चर्चा सुध्दा प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन करावी अशी मी आपणास विनंती करतो.

सभापती : या ठिकाणी तिसरा जो प्रस्ताव आलेला आहे तो मी नंतर वाचतो. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये जे दोन प्रस्ताव मांडलेले आहेत त्याअनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांना मी विनंती करीन की, मी जर नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव मान्य केला तर जी चर्चा सुरु होईल त्यामध्ये आपल्याला जरुर भाग घेता येईल. मी सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांना सांगेन की, या ठिकाणी प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन तातडीने चर्चा करावी यासंदर्भात नियम 289 अन्वये जे दोन प्रस्ताव मांडले गेले आहेत त्याबाबत आपल्याला काही सांगावयाचे असल्यास सांगावे.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, जे प्रस्ताव सदनासमोर आहेत ते या राज्यावर आलेल्या एका फार मोठ्या संकटाच्या आणि नैसर्गिक आपत्तीच्या बाबतीतील आहेत. यासंदर्भात चर्चा व्हावी अशी सदनाच्या दोन्ही बाजूची इच्छा आहे. म्हणून शासनाच्या वतीने सुध्दा आम्ही मान्यता देतो. आपण या चर्चेला सुरुवात करावी. पण आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविल्याप्रमाणे काही माजी सदस्यांना तसेच काही मान्यवरांना श्रध्दांजली अर्पण करावयाची आहे. मी सदनाला एवढीच विनंती करतो की, आपण आधी शोक प्रस्ताव घ्यावा आणि श्रध्दांजली वाहावी आणि त्यानंतर लगेचच या चर्चेला सुरुवात करावी.

सभापती : माझ्यासमोर नियम 289 अन्वये आलेले जे दोन प्रस्ताव आहेत ते दोन्ही प्रस्ताव अत्यंत महत्वाचे आणि महाराष्ट्रातील कष्टकरी शेतकऱ्यांच्या अनुषंगाने जीवाभावाचे प्रस्ताव आहेत. या अनुषंगाने सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन तातडीने चर्चा करणे कसे महत्वाचे आहे हे या ठिकाणी विशद केलेले आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि सन्माननीय उपमुख्यमंत्री यांनी सुध्दा नियम 289 मधील विषयावरील चर्चा महत्वाची आहे, शेतक-यांच्या दृष्टीने हा विषय जिव्हाळयाचा असल्यामुळे नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतक-यांना शासनाकडून कोणत्या पध्दतीने मदत केली जाणार आहे हे जाणून घेणे महत्वाचे असल्यामुळे या प्रस्तावावर तातडीने चर्चा सुरु करावी असे प्रतिपादन केलेले आहे. या प्रस्तावासंबंधी मी असा निर्णय देत आहे की, एक अपवाद म्हणून आज प्रश्नोत्तराचा तास तहकूब करण्यात येत आहे. आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेली शोक प्रस्तावाची बाब प्रथम घेऊ. त्यानंतर या प्रस्तावांवरील चर्चेला सुरुवात करु या. या दोन्ही प्रस्तावांवर एकत्रितपणे चर्चा करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझी एक सूचना आहे. हा प्रस्ताव केवळ विरोधी पक्षाने मांडलेला आहे असे समजू नये. कारण दुष्काळाचे संकट संपूर्ण राज्यावर आलेले आहे. त्यामुळे या प्रस्तावावर सविस्तरपणे चर्चा झाली पाहिजे. आजचा संपूर्ण दिवस आणि उद्या देखील या प्रस्तावावर चर्चा झाली पाहिजे. याचे कारण असे की, या अधिवेशनानंतर डिसेंबर महिन्यामध्ये अधिवेशन सुरु होईल. दुर्दैवाने डिसेंबर महिन्यापर्यंत पाऊस आला नाही तर महाराष्ट्रामध्ये भयानक स्थिती निर्माण होणार आहे. राज्याला कोणकोणत्या समस्यांना सामोने जावे लागणार आहे आणि या बिकट परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाच्यावतीने कोणत्या उपाययोजना केल्या जाणार आहेत ते समजण्यासाठी या प्रस्तावावर सविस्तरपणे चर्चा होणे अगत्याचे आहे. त्यामुळे आपण या चर्चेला वेळेचे बंधन घालू नये अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या प्रस्तावावरील चर्चेसाठी पूर्ण वेळ देण्यात यावा. आज आणि उद्या अशी दोन दिवस चर्चा व्हावी. शासन दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकून घेईल. त्याचबरोबर या परिस्थितीबाबत कोणत्या उपाययोजना केल्या जात आहेत ते शासनाकडून सांगितले जाईल. त्यामुळे आज आणि उद्या अशी दोन्ही दिवस या प्रस्तावावर चर्चा करण्यास हरकत नाही.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

सभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी म्हटल्याप्रमाणे या प्रस्तावांवरील चर्चा महत्वाची असल्यामुळे आज संपूर्ण दिवस होईल आणि चर्चा जर अपूर्ण राहिली तर ती उद्या पूर्ण केली जाईल, त्यानंतर या चर्चेला माननीय मंत्री महोदय उत्तर देतील, अशाप्रकारचा याबाबत मी निर्णय देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी देखील नियम 289 चा प्रस्ताव दिलेला आहे. त्यांच्या प्रस्तावाबाबत मी दालनातच निर्णय घेतला असून याबाबत लक्षवेधी सूचना स्वीकारण्यात येईल. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना हा विषय आता उपस्थित करण्याचे कारण नाही.

श्री.कपिल पाटील : ठीक आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

पृ.शी.: शोक प्रस्ताव

मु.शी.: श्री.बाजीराव निवृत्ती शिंदे, माजी वि.प.स. व मंत्री, श्री.दशरथ नरसिंग कांबळे, माजी वि.प.स., फिल्डमार्शल सॅम माणेकशॉ, भारताचे माजी सरन्यायाधीश श्री.यशवंतराव चंद्रचूड, ज्येष्ठ गांधीवादी नेत्या श्रीमती निर्मला देशपांडे, ज्येष्ठ साहित्यिक व सुप्रसिध्द नाटककार श्री.विजय तेंडुलकर, ज्येष्ठ निरुपणकार नाना धर्माधिकारी यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

श्री.आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री) : महोदय, श्री.बाजीराव निवृत्ती शिंदे, माजी वि.प.स. व मंत्री, श्री.दशरथ नरसिंग कांबळे, माजी वि.प.स., फिल्डमार्शल सॅम माणेकशॉ, भारताचे माजी सरन्यायाधीश श्री.यशवंतराव चंद्रचूड, ज्येष्ठ गांधीवादी नेत्या श्रीमती निर्मला देशपांडे, ज्येष्ठ साहित्यिक व सुप्रसिध्द नाटककार श्री.विजय तेंडुलकर, ज्येष्ठ निरुपणकार नाना धर्माधिकारी यांच्या दु:खद निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो :-

"श्री.बाजीराव निवृत्ती शिंदे, माजी वि.प.स. व मंत्री, श्री.दशरथ नरसिंग कांबळे, माजी वि.प.स., फिल्डमार्शल सॅम माणेकशॉ, भारताचे माजी सरन्यायाधीश श्री.यशवंतराव चंद्रचूड, ज्येष्ठ गांधीवादी नेत्या श्रीमती निर्मला देशपांडे, ज्येष्ठ साहित्यिक व सुप्रसिध्द नाटककार श्री.विजय तेंडुलकर, ज्येष्ठ निरुपणकार नाना धर्माधिकारी यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

कै. बाजीराव निवृत्ती शिंदे यांचा जन्म 10 एप्रिल 1951 रोजी बिदर जिल्ह्यात, औराद तालुक्यातील, होकर्णा येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए. पर्यंत झाले होते.

कै. शिंदे यांना विद्यार्थीदशेपासूनच समाजकार्याची आवड होती. मराठवाडा विद्यार्थी चळवळीत त्यांचा सक्रीय सहभाग होता.

कै. शिंदे यांनी नांदेड नगरपालिकेचे सदस्य, नांदेड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सहसचिव, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सल्लागार समितीचे सदस्य तसेच राज्य पातळीवरील संजय गांधी निराधार व स्वावलंबन उच्चस्तरीय समिती व 20-कलमी कार्यक्रमाच्या राज्यस्तरीय समितीचे सदस्य म्हणूनही त्यांनी काम केले होते.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

श्री.आर.आर.पाटील.....

कै. शिंदे 1982 व 1988 असे सलग दोन वेळा महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारे विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. 1983 ते 1985 पर्यंत राज्याच्या मंत्रिमंडळात ग्रामविकास खात्यांचे राज्यमंत्री म्हणूनही त्यांनी कार्य केले होते.

अशा या समाजसेवकाचे शनिवार दिनांक 21 जून 2008 रोजी दु:खद निधन झाले.

नंतर श्री.शिगम

s

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कै.दशरथ नरसिंग कांबळे यांचा जन्म 27 जून 1924 रोजी कोल्हापूर जिल्ह्यात शिरोळ तालुक्यातील घोसरवाड येथे झाला. त्यांचे शिक्षण सातवी पर्यंत झाले होते.

कै. कांबळे यांनी घोसरवाड शिक्षण प्रसारक मंडळ, राहुरी कृषी विद्यापीठ निवड समिती, शिरोळ तालुका दक्षता समिती, जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य तसेच शिरोळ तालुका दूध संघ, सिध्देश्वर पाणी पुरवठा संस्थेचे संचालक व कोल्हापूर जिल्हा सहकारी संघाचे चेअरमन म्हणूनही कार्य केले होते.

कै. कांबळे यांनी 1952 ते 1962 जिल्हा लोकल बोर्ड व 1962 ते 1972 जिल्हा परिषदेचे व जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य म्हणून कार्य केले होते.

कै. कांबळे 1976 मध्ये कोल्हापूर स्थानिक प्राधिकारीसंस्था मतदारसंघातून विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे शनिवार दिनांक 10 मे 2008 रोजी दु:खद निधन झाले.

कै.फिल्डमार्शल सॅम माणेकशॉ यांचा जन्म 3 एप्रिल 1914 रोजी अमृतसर येथे झाला. त्यांनी इंडियन मिलिटरी अॅकडमित पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले होते.

कै. माणेकशॉ यांनी 1932 मध्ये डेहराडूनच्या लष्करी अॅकडमित प्रवेश केला. 1934 मध्ये भारतीय लष्करात सेकंड लेफ्टनंट म्हणून त्यांची नेमणूक झाली. 1937 मध्ये क्वेट्टा येथील लष्करी स्टाफ कॉलेजात काही काळ अध्यापनाचे काम केले. 1945 मध्ये 10 हजार जपानी शरणार्थींच्या पुनर्वसनात त्यांचा मोलाचा वाटा होता. 1946 मध्ये त्यांनी ऑस्ट्रेलियात मिलिटरी ऑपरेशन्स डायरेक्टरेटमध्ये प्रथम श्रेणी ऑफिसर म्हणून अध्यापनाचे काम केले होते.

कै. माणेकशॉ यांचा 1947 च्या भारत-पाकिस्तान फाळणीत प्रशासकीय व नियोजनात महत्वपूर्ण सहभाग होता. 1948 मध्ये जम्मू-काश्मिरमधील परिस्थिती नियंत्रणात आणण्याची महत्वपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली होती.

==2==

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कै. माणेकशॉ यांना त्यांच्या कामगिरीबद्दल भारत सरकारने 1968 मध्ये "पद्मभूषण" पुरस्काराने सन्मानीत केले होते. सन 1969 मध्ये ते भारताचे लष्कर प्रमुख झाले.

कै. माणेकशॉ यांनी 1971 च्या भारत-पाकिस्तान युध्दात अचूक अभ्यास, ध्येयनिश्चिती आणि अप्रतिम युध्द कौशल्य वापरुन भारतीय लष्कराचे यशस्वी नेतृत्व केले आणि ऐतिहासिक असा विजय मिळविला. बांगलादेश निर्मितीच्या या अलौकिक कामगिरीबद्दल भारत सरकारने सन 1972 मध्ये "पद्मविभूषण" पुरस्काराने व 1 जानेवारी 1973 रोजी "फिल्डमार्शल" या सर्वोच्च लष्करी किताबाने राष्ट्रपतींच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला होता.

कै. माणेकशॉ हे चतुरस्त्र, अतिशय हुशार, बुध्दिमान, आणि संवेदनशील कमांडर होते. युध्दातील डावपेच आणि लष्कराला प्रोत्साहित करण्यात ते पटाईत होते.

अशा या अत्यंत शौर्यवान, धाडसी व धडाडीच्या लष्कर प्रमुखाचे शुक्रवार दिनांक 27 जून 2008 रोजी दु:खद निधन झाले.

भारताचे माजी सरन्यायाधीश श्री यशवंतराव विष्णू चंद्रचूड यांचा जन्म १२ जुलै १९२० रोजी पुणे येथे झाला. त्यांचे शिक्षण एलएल.एम्. पर्यंत झाले होते. ते अत्यंत हुशार व कुशाग्र बुध्दीचे होते.

कै. चंद्रचूड यांनी १९४३ मध्ये मुंबई उच्च न्यायालयातून वकिलीस सुरुवात केली. काही काळ त्यांनी शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई येथे अध्यापनाचे काम केले होते.

कै. चंद्रचूड यांनी मुंबई उच्च न्यायालयात वकिली करीत असताना अनेक दिवाणी, फौजदारी आणि घटनात्मक केसेसमध्ये आपल्या ज्ञानाची आणि कल्पक बुध्दीची चमक दाखविली होती. १९ मार्च १९६१ रोजी वयाच्या ४० व्या वर्षी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून त्यांची नियुक्ती झाली.

कै. चंद्रचूड यांनी मुंबई उच्च न्यायालयातील न्यायाधीश पदाच्या कारकीर्दीत अनेक महत्वाच्या खटल्यांत व दाव्यांत त्यांनी जे निवाडे दिले त्यातून त्यांच्या बुध्दिमत्तेची, कायदयाच्या काटेकोर अभ्यासाची, ज्ञानाची आणि न्याय निष्ठुरतेची प्रचिती येते.

..३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर. आर.पाटील...)

कै. चंद्रचूड यांची २८ ऑगस्ट १९७२ रोजी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. घटनात्मकदृष्ट्या अनेक महत्वाचे निर्णय त्यांनी त्यावेळी दिले होते.

कै. चंद्रचूड यांची २२ फेब्रुवारी १९७८ रोजी भारताचे सरन्यायाधीशपदी नियुक्ती झाली. त्यांनी साडेसात वर्षे हे पद भूषविले होते. त्या काळात त्यांनी ब्रिटन, अमेरिका, रशिया, चीन, दक्षिण कोरिया इ.देशांना भेटी देऊन तेथील विविध विद्यापीठांमध्ये विधी विषयांवर अनेक व्याख्याने दिली होती. सरन्यायाधीश पदावरुन निवृत्त झाल्यानंतर त्यांनी केंद्र व राज्य सरकारच्या अनेक चौकशी समित्यांचे प्रमुख म्हणून काम केले होते.

अशा या अभ्यासू, निष्णात कायदेपंडिताचे सोमवार दिनांक १४ जुलै २००८ रोजी दु:खद निधन झाले.

....नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ज्येष्ठ गांधीवादी नेत्या, श्रीमती निर्मला देशपांडे यांचा जन्म १७ ऑक्टोबर १९२९ रोजी नागपूर येथे झाला. त्यांचे शिक्षण एम्.ए. पर्यंत झाले होते.

कै. देशपांडे यांनी काही काळ नागपूरच्या मॉरीस महाविद्यालयात अध्यापनाचे काम केले होते. त्यांच्यावर लहानपणापासूनच महात्मा गांधी यांच्या विचारांचा प्रभाव पडला होता. त्यांनी सन १९५२ मध्ये विनोबांच्या भूदान चळवळीत ४० हजार किलोमीटरच्या पदयात्रेत भाग घेतला होता. गरीब, कष्टकरी, दलित, आदिवासी, अन्यायग्रस्त महिलांच्या उन्नतीसाठी आयुष्यभर काम केले.

कै. देशपांडे यांनी गांधीजींनी स्थापन केलेल्या हरिजन सेवक संघाच्या तसेच अखिल भारतीय रचनात्मक समाज या संस्थेच्या अध्यक्षा, विनोबा जन्मस्थान प्रतिष्ठानच्या विश्वस्त म्हणून कार्य केले.

कै. देशपांडे यांनी नागपूरच्या राष्ट्रीय ग्रामीण विकास केंद्राच्या आणि दिल्लीतील स्त्री-शक्ती प्रतिष्ठानच्या अध्यक्षा तसेच राष्ट्रीय एकात्मता परिषद व केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाच्या सदस्या म्हणूनही काम केले होते. तसेच त्यांनी राष्ट्रीय, एकात्मता आणि जातीय सलोखा निर्माण करण्यासाठी पिपल्स इंटिग्रेशन कौंन्सिलची स्थापना केली होती.

१९९७ मध्ये भारत-तिबेट सीमेवरील सत्याग्रहाचे नेतृत्व केले. जम्मू-काश्मिर आणि पंजाबमधील दहशतवादग्रस्त भागांमध्ये शांतता यात्रांचे आयोजन केले. तसेच भारत-पाक मैत्रीच्या त्या खंद्या पुरस्कर्त्या होत्या. त्यांनी भारत-पाकिस्तान राष्ट्रीय सेवा समितीच्या अध्यक्षा, तसेच दक्षिण आशिया मानवी हक्क ब्यूरोच्या सदस्या म्हणूनही कार्य केले होते.

कै. देशपांडे यांनी केलेल्या जागतीकस्तरावरील सामाजिक कार्याबद्दल रशियन सरकारने "ऑर्डर ऑफ द फ्रेंडशीप रशिया'' हा पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला होता. भारत सरकारने "पद्मविभूषण'' व राजीव गांधी सद्भावना पुरस्काराने त्यांना सन्मानित केले होते. पंजाब, अमरावती आणि काशी या तीन विद्यापीठांनी त्यांना "डॉक्टरेट'' पदवी देवून त्यांच्या कार्याचा गौरव केला होता.

कै. देशपांडे या सन १९९७ व २००४ अशा दोन वेळा राज्यसभेवर निर्वाचित झाल्या होत्या. संसदेच्या माहिती आणि प्रसारण, ग्रामीण विकास आणि महिला सबलीकरण या स्थायी समित्यांवरही त्यांनी काम केले होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील....

जातीय सलोखा, शांतता व अहिंसा यासाठी झटणाऱ्या अशा या ज्येष्ठ गांधीवादी समाजसेविकेचे गुरुवार दिनांक १ मे २००८ रोजी दु:खद निधन झाले.

ख्यातनाम साहित्यिक व सुप्रसिध्द नाटककार कै. विजय धोंडोपंत तेंडुलकर यांचा जन्म ६ जानेवारी १९२८ रोजी कोल्हापूर येथे झाला. त्यांचे शिक्षण मॅट्रीक पर्यंत झाले होते.

कै.तेंडुलकर यांनी १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात सक्रीय भाग घेतला होता. त्यांनी सुरुवातीस नवभारत व मराठाचे उपसंपादक, लोकसत्ताचे सह संपादक म्हणून काम केले. तसेच त्यांनी वृत्तपत्रे व नियतकालिकांमधून विपुल लेखन केले. काही काळ रंगायन व ग्रंथालीचे अध्यक्ष व साहित्य अकादमीच्या राष्ट्रीय एकात्मता समितीचे सदस्य म्हणूनही काम केले होते.

कै. तेंडुलकर यांनी कथा, कादंबरी, एकांकिका, नाटक, पटकथा, संवाद, पत्रकारिता, स्तंभलेखन, व्यक्तिचित्र, अशा विविध प्रकारच्या साहित्याचे विपुल लेखन केले आहे. त्यांच्या "कावळयांची शाळा'', "श्रीमंत'', "शांतता ! कोर्ट चालू आहे'', "गिधाडे'', "सखाराम बाईंडर'', "घाशिराम कोतवाल'' इ. नाटकांना रसिकांनी भरभरुन दाद दिली. "घाशिराम कोतवाल'' या नाटकामुळे कै. तेंडुलकरांच्या प्रतिभेला आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळाली. याशिवाय त्यांची "काचपात्रे'', "द्वंद्व'', "गाणे'', "फुलपाखरु'' हे कथासंग्रह तर "कोवळी उन्हे'', "रातराणी'', "फुगे साबणाचे'' हे ललित लेख प्रसिध्द आहेत. तसेच त्यांच्या "सामना'', "सिंहासन'',"उंबरठा'', "सरदार'' इत्यादी चित्रपट पटकथाही खूप गाजल्या. त्यातील प्रत्येक ओळ विचारपूर्वक आणि मनस्वीपणे लिहिणाऱ्या तेंडुलकरांचा लेखन हाच जणू श्वास होता. गेली सहा दशके मराठी मनावर अधिराज्य गाजविणाऱ्या कै.तेंडुलकरांच्या नाटकांनी मराठी रंगभूमीची कीर्ती सातासमुद्रापार नेली.

कै. तेंडुलकर यांना "संगीत नाटक अकादमी पुरस्कार'', "कमलादेवी चट्टोपाध्याय पुरस्कार'', "राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार'', "फिल्म फेअर कथा व पटकथा पुरस्कार'', "पद्मभूषण पुरस्कार'', "महाराष्ट्र गौरव पुरस्कार'' अशा अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले होते.

कै. तेंडुलकर हे साहित्यिक, नाटककार, पटकथाकार, पत्रकार, सामाजिक समीक्षक, चित्रकार असे बहुआयामी व्यक्तिमत्व होते.

अशा या ज्येष्ठ साहित्यिक व सुप्रसिध्द नाटककाराचे रविवार दि.१८ मे २००८ रोजी दु:खद निधन झाले.

३...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील....

ज्येष्ठ निरुपणकार नाना धर्माधिकारी यांचा जन्म १ मार्च १९२२ रोजी रायगड जिल्ह्यात अलिबाग तालुक्यातील रेवदंडा येथे झाला.

कै. नाना धर्माधिकारी यांना संत, साहित्य, वाचन, व्यायाम, प्रवचन निरुपणाची आवड होती. शालेय शिक्षणाबरोबरच आध्यात्मिक शिक्षण घेत असतानाच वयाच्या अवघ्या २२ व्या वर्षी श्री समर्थ प्रास्ताविक आध्यात्मिक सेवा समिती स्थापन करुन समर्थ विचारांचा प्रसार त्यांनी सुरु केला. दासबोधाचे रसाळ निरुपण हे त्यांचे वैशिष्ट्य होते. समर्थ विचारांच्या प्रसारातून त्यांनी व्यसनमुक्तीची अभिनव चळवळ चालवली होती. लक्षावधी तरुणांना व्यसनमुक्त केले. लाखो दासभक्तांवर चांगले आध्यात्मिक संस्कार केले. त्यांचे जीवन सुखी होण्याचा मूलमंत्र त्यांनी दिला. अंतरीच्या समाधानातून नम्रता, सहिष्णुता व सौजन्यशिलता यासारखे गुण प्रस्थापित करुन एका आदर्श मानव समाजाची अखंडपणे सेवा करण्याचा वसा त्यांनी घेतला होता.

कै. नाना धर्माधिकारी यांनी समाजप्रबोधनाच्या तळमळीतून आयुष्यभर अखंडपणे समाजसेवा केली. दासबोध, मनाचे श्लोक, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, तुकाराम गाथा इत्यादी धार्मिक ग्रंथांच्या आधारे सामान्य लोकांना सत्प्रवृत्त केले. अंधश्रध्दा दूर करुन भक्ती आणि उपासना यांचे महत्व समाजाला सांगितले. संस्कारक्षम पिढी घडविण्यासाठी परमार्थाचा उपयोग होऊ शकतो. हे त्यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले.

कै. नाना धर्माधिकारी यांनी आपल्या आध्यात्मिक शक्तीचा उपयोग लोकोध्दारासाठी व समस्त मानव जातीच्या कल्याणासाठी केला. त्यांनी केलेल्या सामाजिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक कामगिरीबद्दल त्यांना "रायगड मित्र पुरस्कार'', महाराष्ट्र शासनाचा "सांस्कृतिक पुरस्कार'', "समर्थ रामदास पुरस्कार'', "शिवसमर्थ पुरस्कार'', "संत ज्ञानेश्वर पुरस्कार'', "बहिणाबाई प्रतिष्ठानचा पुरस्कार'', "समाजभूषण पुरस्कार'', "महर्षी व्यास पुरस्कार'' अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केले होते. तर कै. नाना धर्माधिकारी यांनी समाजप्रबोधनासाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र भूषण'' पुरस्कारासाठी त्यांची निवड केली होती.

अशा या थोर निरुपणकारचे मंगळवार दिनांक ८ जुलै २००८ रोजी दु:खद निधन झाले.

या सगळया महनीय व्यक्तींच्या दु:खद निधनाबद्दल मी शोकप्रस्ताव मांडतो आणि त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

----- यानंतर श्री.कानडे..

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : माननीय सभापती महोदय, या सदनाचे नेते माननीय श्री. आर.आर.पाटील यांनी जो शोक प्रस्ताव सदनामध्ये मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय,या सदनाचे माजी सदस्य व मंत्री श्री.बाजीराव निवृत्ती शिंदे, श्री. दशरथ नरसिंग कांबळे, माजी वि.प.स., फिल्डमार्शल श्री. सॅम माणेकशॉ, भारताचे माजी सरन्यायाधीश श्री. यशवंतराव चंद्रचूड, ज्येष्ठ गांधीवादी नेत्या श्रीमती निर्मला देशपांडे, ज्येष्ठ साहित्यिक व सुप्रसिध्द नाटककार श्री. विजय तेंडुलकर त्याचप्रमाणे आता जी शोक प्रस्तावाची यादी दिली त्यामध्ये कै.नानासाहेब धर्माधिकारी यांचे नांव नव्हते त्यामध्ये दुरुस्ती करुन कै.नानासाहेब धर्माधिकारी यांचे नांव शोक प्रस्तावात टाकण्यात आले आहे ते ज्येष्ठ निरुपणकार कै.नाना धर्माधिकारी, इतक्या लोकांचे महाराष्ट्रामध्ये मध्यंतरीच्या काळामध्ये निधन झाले आहे म्हणून यासंबंधीचा जो शोक प्रस्ताव याठिकाणी मांडलेला आहे त्यावर मी माझ्या सहभावना व्यक्त करतो माननीय सभापती महोदय, रायगड जिल्हयातील रेवदंडयासारख्या लहान गावात राहून निरुपणाद्वारे समाजप्रबोधन करण्याचे कार्य नाना धर्माधिकारी यांनी सुरु केले. वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी पासून सुरु केलेले हे कार्य नानांनी शेवटच्या श्वासापर्यंत सुरु ठेवले.

शिक्षण घेणे, नोकरी करणे अथवा व्यापार धंदा करणे या साच्यात ते सुरुवातीपासूनच बसले नाहीत. कुशाग्र बुध्दिमत्तेच्या आधारे त्यांनी अमाप संपत्ती कमविली असती, परंतु त्या मोहात ते कधी पडले नाहीत. प्रसिध्दीच्या मागेही लागले नाहीत.

रेवंदडा या आपल्या गावातच सन 1945 मध्ये 'श्री समर्थ प्रासादिक आध्यात्मिक सेवा समिती'ची त्यांनी स्थापना केली. त्यावेळी त्यांच्यासोबत फक्त सात जण होते. गेल्या साठ वर्षात त्या बिजाचे वटवृक्षात रुपांतर झाले आणि नानासाहेबांची ख्याती देश-विदेशात पसरली. खेडयात राहणाऱ्या खेडूतापासून शहरात राहणाऱ्या उच्चशिक्षितापर्यंत सर्वच थरातले आबालवृध्द नानासाहेबांचे दर्शन घेण्यासाठी, त्यांचे अमृतवचन ऐकण्यासाठी लाखोंच्या संख्येने गोळा होत. अगदी तासा-दोन तासात लाखोंचा जनसमुदाय गोळा होत असे. जमणारी माणसे भाडोत्री नसत किंवा कोणत्या अमिषानेही जमत नसत. तो एक चमत्कार असायचा. त्यांच्या विचारातील-आचारातील प्रभावाचा तो चमत्कार असायचा. माणसे जमविण्यासाठी कोणत्याही प्रसिध्दी माध्यमांची त्यांना गरज भासली नाही. उलट प्रसिध्दीपासून ते सतत दूरच राहिले.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

नानासाहेब जसे प्रसिध्दीच्या मागे गेले नाहीत तसेच कोणत्याही पुरस्काराच्या मागे गेले नाहीत. उलट पुरस्कारच त्यांच्यामागे चालत आले. महाराष्ट्र शासनाने त्यांना दिलेल्या "महाराष्ट्र भूषण" पुरस्काराने त्या पुरस्काराचाच सन्मान झाला.

नानासाहेबांनी स्वत:चा असा कोणताही ट्रस्ट स्थापन केला नाही. स्वत:ला देव,संत,महात्मा वा अवतार म्हणवून घेतले नाही आणि तरीसुध्दा त्यांनी हजारोंची व्यसने घालविली. अंधश्रध्देची पाळेमुळे उखडली, लाखो सुसंस्कृत आणि सुजाण मानव घडविले. कसलीही जाहिरातबाजी न करता कसलाही डंका न पिटता नानांनी केलेली समाजसेवा निश्चितच अजरामर आहे.

सभापती महोदय, या जगामध्ये अशी माणसे कमी जन्माला येतात की....

नंतर श्री. भोगले

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

कुठलाही स्वार्थ न बाळगता निष्काम भावनेने समाजाची सेवा करीत करीत चांगला समाज घडला पाहिजे, चांगली माणसे घडली पाहिजेत, समाजातील वाईट गोष्टी दूर झाल्या पाहिजेत यासाठी संपूर्ण आयुष्य वेचणारी माणसे जन्माला आली त्यापैकी नानासाहेबांचे स्थान सर्वात वरचे असेल असे मला वाटते. ते आज आपल्यातून निघून गेले आहेत.

सभापती महोदय, कायदा क्षेत्रातील सर्वोच्च स्थान प्राप्त करणारे माजी सरन्यायाधीश यशवंतराव चंद्रचूड यांचे दिनांक 14 जुलै, 2008 रोजी निधन झाले. कै.चंद्रचूड यांचा खरे म्हणजे शनिवारी वाढदिवस होता. त्या दिवसापर्यंत म्हणजे दिनांक 12 जुलै, 2008 पर्यंत त्यांची प्रकृती बरी होती. मेंदूमध्ये रक्तस्त्राव झाला म्हणून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले व तेथेच त्यांचे निधन झाले. न्या.चंद्रचूड यांची सरन्यायाधीश म्हणून कारकीर्द त्यावेळी त्यांनी घेतलेल्या अनेक महत्वपूर्ण निकालामुळे गाजली होती. कदाचित त्यांच्याएवढे ऐतिहासिक निर्णय आतापर्यंतच्या कोणत्याही न्यायाधीशांनी दिलेले नसावेत. आणीबाणीच्या काळात अनेक घटनात्मक तरतुदींना हरताळ फासण्यात आल्यानंतर सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. त्यावेळी घटनेच्या मुलभूत चौकटीला किंवा रचनेला धक्का लावणारी कोणतीही घटना दुरुस्ती करता येणार नाही असा जो निर्णय 13 सदस्यीय घटनापीठाने दिला, त्या घटनापीठामध्ये सर्वात तरुण असे जे न्यायमूर्ती होते ते यशवंतराव चंद्रचूड होते. खरे म्हणजे हा एक ऐतिहासिक निर्णय झालेला आहे की, अनेक काळापर्यंत घटनेची पायमल्ली करण्याची कोणी हिंमत करणार नाही एवढे त्या निर्णयाला महत्व दिले गेले.

सभापती महोदय, मुस्लीम महिलांना तलाक दिल्यानंतर तहहयात पोटगीचा अधिकार आहे हे सांगणारा ऐतिहासिक असा निर्णयही न्या.चंद्रचूड यांनीच दिला होता. सरन्यायाधीश पदावरुन निवृत्त झाल्यानंतरही त्यांनी अनेक जबाबदाऱ्या पार पाडल्या. विविध आयोगाच्या कामामध्ये त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. भारतीय जनसंघाचे तत्कालीन अध्यक्ष कै.दिनदयाळ उपाध्याय यांच्या मृत्युची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या एक सदस्यीय आयोगावरही काम त्यांनी केले होते, याचाही उल्लेख मला जाणीवपूर्वक करावा लागेल. अशा प्रकारे आयुष्याच्या अखेरपर्यंत सचोटीने आणि पूर्णक्षमतेने काम करणारे सरन्यायाधीश कै.यशवंतराव चंद्रचूड आज आपल्यात नाहीत. त्यांच्या निधनाने एका दैदिप्यमान कारकिर्दीचा अंत झाला आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

सभापती महोदय, सन 1971 चे पाकिस्तानविरुध्दचे युध्द व त्यातून झालेली बांगलादेशाची निर्मिती या घडामोडीमागील खरे सूत्रधार व हिरो होते ते जनरल जमशेदजी माणेकशॉ. सन 1971 मधील पाकिस्तानविरुध्दच्या युध्दात त्यांची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण होती. दुसऱ्या महायुध्दाच्या काळात देखील त्यांची युध्दभूमीवरील कारकीर्द अजरामर ठरली होती. त्यावेळी ते गंभीर जखमी होऊन मरणातून वाचले. त्या काळात भारतीय लष्करातील दोघांना फिल्ड मार्शल ही सर्वोच्च पदवी बहाल करण्यात आली. त्यापैकी एक जनरल माणेकशॉ व दुसरे जनरल करिअप्पा हे दोन लष्करातील अधिकारी होते. ब्रिटिश काळापासून चार दशके सैन्यदलात त्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली. मिलिटरी क्रॉस, पद्मविभूषण, फिल्डमार्शल असे एकापेक्षा एक असे त्यांना मिळालेले मोठमोठे सन्मान त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीला साजेसेच होते. त्यांच्या निधनाने भारताने खरा देशप्रेमी गमावला आहे. देशासाठी त्यांनी केलेला त्याग व त्यांची अविस्मरणीय कारकिर्द सैन्यात भरती होणाऱ्या सैनिकांना आणि आम भारतीयांना सतत प्रेरणा देईल यात शंका नाही.

सभापती महोदय, खरे म्हणजे महाराष्ट्रामधील प्रत्येक क्षेत्रात काम करणारा एक एक हिरा काळाच्या पडद्याआड गेला आहे. पाच दशकाहून अधिक काळ नाटक, चित्रपट व साहित्य क्षेत्रात आपला आगळावेगळा ठसा उमटविणाऱ्या विजय तेंडूलकरांचे दिनांक 19 मे, 2008 रोजी वयाच्या 80 व्या वर्षी निधन झाले.

मराठी रंगभूमीचा चेहराच बदलून टाकण्याच्या प्रयत्नात त्यांना अनेक वेळा अनेक प्रकारच्या वाद विवादाला सामोरे जावे लागले. घाशीराम कोतवाल, सखाराम बाईंडर, गिधाडे यासारख्या त्यांच्या नाटकांनी वादविवादांचे वादळ उठविले असले तरी रंगभूमी आणि साहित्य क्षेत्रातील त्यांची कारकिर्द चतु:रस्त्र होती. सन 1948 मध्ये आमच्यावर प्रेम कोण करणार ही तेंडूलकरांची पहिली कथा प्रकाशित झाली. नवभारत, मराठा, लोकसत्ता या दैनिकातून तर नवयुग या साप्ताहिकातून व वसुधा या मासिकातून त्यांनी संपादन केले. अनेक इंग्रजी नाटकांची भाषांतरे केली. सामना, घाशीराम कोतवाल, सिंहासन, उंबरठा, अर्धसत्य, मंथन इत्यादी हिंदी-मराठी चित्रपटातील त्यांच्या पटकथा खूपच प्रभावी ठरल्या.

(नंतर श्री.खर्चे...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

श्री. पांडुरग फुंडकर.....

त्यांच्या वादग्रस्त लेखणीप्रमाणे त्यांनी आपल्या निधनापूर्वी व्यक्त केलेले विचारही तसेच होते. माझ या निधनानंतर माझ्या अंत्यविधीचे कोणत्याही प्रकारचे चित्रीकरण करु नये किंवा छायाचित्रे काढू नयेत एवढेच काय तर श्रध्दांजली व शोकसभा असे कार्यक्रमही करु नयेत असे विचार त्यांनी भेटायला येणाऱ्या अनेकांजवळ व्यक्त केले होते. असे हे चतुरंगी व्यक्तिमत्व व साहित्यातील एक नेता काळाच्या पडद्याआड गेला आहे.

कै. निर्मला देशपांडे यांच्या निधनाने गांधीवादी विचारसरणीचा एक दुवा निखळला गेला. आयुष्यभर गांधीवादी विचारसरणीचा प्रचार व प्रसार स्वत: अवलंब केलेल्या निर्मलाताईंनी आपल्यासोबत अनेकांना आपल्या मार्गाने वाटचाल करायला लावली. महत्वाचे म्हणजे सध्या सुरु असलेल्या सत्ता स्पर्धेत, त्यांच्याप्रमाणेच सत्तेचा मोह सोडून गांधीजींप्रमाणेच त्या शेवटपर्यंत सत्तेबाहेर राहिल्या. गांधीजींची कल्पनेतील आदर्श ग्राम निर्माण होण्यासाठी त्यांनी देशाच्या कानाकोपऱ्यात व खेड्यापाड्यात पायपीट केली. विकास हा नेहमी तळापासून वरपर्यंत जायला हवा, अशी त्यांची धारणा होती. दलित, भूमिहीन, आदिवासी यांना विकास प्रक्रियेत सामावून घेण्यासाठी त्या सतत प्रयत्नशील राहिल्या. गांधीजीप्रमाणेच आचार्य विनोबा भावे यांच्या देखील त्या निष्ठावंत अनुयायी होत्या. विनोबाजींच्या पवनार आश्रमात राहून त्यांनी रचनात्मक कार्याला वाहून घेतले. भूदान चळवळीत त्यांनी विनोबाजींसह 40 हजार किलोमीटर पदयात्रा केली होती.

अण्वस्त्र स्पर्धा, युध्दे, जीवसंहारक क्षेपणास्त्रे यांच्या विरोधात त्या लढल्या. देशातच नव्हे तर अखिल जगतात शांती व सद्भाव रहावा यासाठी त्यांनी परदेश दौरेही केले. त्यांच्या निधनाने भारतातला एक शांतीदूत हरपला आहे.

त्याचबरोबर यासभागृहाचे सदस्य असलेल्या श्री. बाजीराव निवृत्ती शिंदे, माजी विधानपरिषद सदस्य व मंत्री तसेच श्री. दशरथ नरसिंग कांबळे, माजी विधानपरिषद सदस्य या दोन्ही सदस्यांचे या काळात निधन झालेले आहे. श्री. बाजीराव शिंदे यांच्यासंबंधी मला थोडीशी माहिती अशी आहे की, ते विधानपरिषदेत कमी बोलत परंतु समितीवर काम करीत असताना आजकालच्या पध्दतीप्रमाणे नुसतीच सही न करता कामकाजात सक्रिय सहभाग घेत असत. त्यांनी पंचायती राज समिती, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या माध्यमातून चांगले काम केलेले आहे. समित्यांच्या कामकाजात त्यांचे योगदान फार महत्वाचे असायचे. समितीच्या साक्षीसाठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

येणाऱ्या सचिव मंडळींना धारेवर धरत, त्यामुळे आय.ए.एस. अधिकारी सुध्दा त्यांना वचकून असत.

महोदय, माजी विधानपरिषद सदस्य श्री. दशरथ कांबळे यांचेही सभागृहातील काम अतिशय चांगल्या प्रकारचे होते. या दोन्ही सदस्यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक व्यक्त करतो आणि सभागृहाच्या नेत्यांनी आणलेल्या प्रस्तावाला पाठिंबा व्यक्त करतो व दिवंगत नेत्यांना माझ्या पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अपर्ण करुन माझे भाषण पूर्ण करतो.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री यांनी ज्या मान्यवरांबद्दल शोक प्रस्ताव मांडला आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी माझ्या शिवसेना पक्षाच्या वतीने मी उभी आहे. त्यामध्ये श्री. बाजीराव निवृत्ती शिंदे, माजी विधानपरिषद व मंत्री, श्री.दशरथ नरसिंग कांबळे, माजी विधानपरिषद सदस्य, फिल्डमार्शल सॅम माणेकशॉ, भारताचे माजी सरन्यायाधीश श्री. यशवंतराव चंद्रचूड, ज्येष्ठ गांधीवादी नेत्या श्रीमती निर्मला देशपांडे, ज्येष्ठ साहित्यिक व सुप्रसिध्द नाटककार श्री. विजय तेंडुलकर आणि ज्येष्ठ निरुपणकार श्री. नाना धर्माधिकारी यांच्या दु:खद निधनाबद्दलच्या शोक प्रस्तावावर माझे विचार मला मांडावयाचे आहेत.

श्री. बाजीराव शिंदे हे आपल्या सदनातील सदस्य होते. राजकारणात प्रवेश करणारी व्यक्ती, जिल्हा परिषद, नगरपालिकांपासून स्वत:च्या कार्याचा ठसा उमटवून राज्य स्तरावर पोहचते त्याच पध्दतीने तळागाळातील पीडित लोकांबरोबर काम करीत असताना दोन वेळा म्हणजेच सन 1982 आणि सन 1988 मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले. तसेच सन 1983 ते 1985 या काळात मंत्रिमंडळात ग्रामविकास राज्य मंत्री म्हणून देखील त्यांनी काम केले होते. मराठवाड्यातील मागास भागात त्यांचे शिक्षण झाल्यावर विधानपरिषदेचे सदस्य म्हणून येईपर्यंत त्यांनी जे कार्य केले, त्यासंदर्भात खास करुन अतिशय दु:खद अशी भावना त्यांच्याबद्दल मी या ठिकाणी व्यक्त करते.

यानंतर श्री. दशरथ कांबळे हे माजी विधानपरिषद सदस्य, पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्हयात वेगवेगळ्या सहकारी संस्थांवर काम करीत असताना सुरुवातीला त्यांनी लोकल बोर्डावर काम केले. त्यानंतर जिल्हा परिषदेवर काम केले आणि कोल्हापूरमधील स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत विधानपरिषदेवर निवडून आले होते. त्यांच्या निधनाबद्दल मी शोक व्यक्त करते. तसेच समाजातील इतर मान्यवर .....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे..

व्यक्तिंचे जे निधन झालेले आहे त्या मान्यवरांच्या संदर्भात आपण शोक प्रस्ताव व्यक्त करीत आहोत. आज आपण ज्यांचा शोक व्यक्त करीत आहोत त्यांच्या कार्याची जागतिक स्तरावर, राष्ट्रीय स्तरावर दखल घेतली गेली आहे. संपूर्ण दक्षिण आशियामध्ये ज्यांच्या विचाराचा आणि त्यांनी केलेल्या कृतीच्या परिणामाचे अनेक वर्ष विश्लेषण केले जाईल त्यामध्ये आज आपण ज्यांचा शोक व्यक्त करीत आहोत त्यांचा देखील समावेश होईल. लष्करी शिस्त असली तरी आत्म्यासाठी इमान ठेवणारे तसेच कडक शिस्तीबरोबर स्वत:ची कार्यक्षमता सिध्द करु शकलेले एक भाग्यवान सेनानी म्हणून माजी लष्कप्रमुख फिल्डमार्शल सॅम माणेकशॉ यांचा मला खास करुन उल्लेख करावयाचा आहे. त्यांचा सैन्यामध्ये प्रदीर्घ अनुभव होता, तसेच सरकारच्या कल्पनेमध्ये त्यांची वेगळी मते असली तरी सुध्दा, सैन्याचे प्रमुख म्हणून आपल्यावर दिलेली जबाबदारी कर्तव्यकठोरपणे पार पाडावयाची, त्यामध्ये यश मिळवून दाखवायचे, तुटपुंज्या साधनसामुग्रीमध्ये सुध्दा न डगमगता वीर व्यक्ती एकटयाने जसे काम करते तेच वीरत्व समुहाबरोबर दिशा देत असतांना करणे ही अतिशय अवघड अशी गोष्ट असते. त्यांनी भारत-पाकिस्तान युध्दामध्ये यशस्वी नेतृत्त्व करुन ऐतिहासिक विजय मिळवला होता. तसेच बांगला देशच्या युध्दामध्ये त्यांनी जे काम केलेले आहे ते कौतुकास्पद आहे. बांगला देशाच्या सैनिकामध्ये त्यांचा परिचय असला तरी भारतीय सैन्याचे प्रमुख म्हणून त्यांनी त्यांच्या कर्तव्यदक्षतेला कधीही बाधा आणू दिली नाही. अतिशय चतुरस्त्र, बुद्धिमान अशा फिल्डमार्शल आज आपण मुकलो आहोत. आपल्या देशावर दहशतवादाचे आव्हान सातत्याने येत असतांना त्यांच्या सारख्या व्यक्तिंच्या अनुभवाचा आपण कशा प्रकारे उपयोग करुन घेतो ही फार मोठी चिंतेची बाब आहे. कोणत्या भागामध्ये सामाजिक परिस्थितीने दहशतवादाला जन्म देता येतो याबद्दलची त्यांची काही निरीक्षणे होती. त्यांनी असे मत मांडले होते की, ज्यावेळी ईशान्य भारतामधील गरीब माणसे चप्पल घालून काम करावयास लागतील त्यावेळी सामान्य लोकांच्या विरोधात आता जसे सैन्य उभे करावे लागते त्या परिस्थितीमध्ये बदल होईल अशी देखील त्यांनी काही वेळेला मते मांडली होती. याला कारण असे आहे की, त्यांचे समाजाबाबत अभ्यासाबरोबरच चतुरुस्त्र निरीक्षण सुध्दा होते.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे..

सभापती महोदय, भारताचे माजी सरन्याधीश श्री. यशवंतराव चंद्रचूड यांच्या बद्दल मी म्हणेन की, ते वरिष्ठ पदावर गेले असतांना देखील त्यांनी कायद्याच्या आधारे सामान्य माणसाला आधार देण्याचे काम केलेले आहे. त्यांचा जन्म पुण्यामध्ये झाला होता तसेच त्यांचे शिक्षण पुण्यामध्ये झाले होते. सरन्यायाधीश झाल्यानंतर त्यांचे कार्य समाजामध्ये बहुचर्चित आहे. परंतु सरन्यायाधीश होण्याच्या अगोदर ते सरकारी वकील म्हणून काम करीत असतांना सत्र न्यायालयात नानावटी खून खटल्यामध्ये लोक निर्दोष सुटल्यानंतर उच्च न्यायालयामध्ये सरकारी वकील पत्र हाती घेतल्यावर श्री. चंद्रचूडांमुळेच अपराध्याला शिक्षा होऊ शकली. डॉ. लागू खून खटल्यामध्ये सुध्दा त्यांनी सरकारी वकील म्हणून काम केले होते. तसेच वेगवेगळया खटल्यांच्या सोबतच त्यांनी जगण्याच्या अधिकाराच्या संदर्भात उच्च न्यायालयामध्ये स्वत: निकालपत्रे दिलेली आहेत. शहाबानो खटल्यामध्ये त्यांनी मुस्लीम महिलेला सुध्दा पोटगीचा अधिकार आहे याबद्दल निर्णय दिला होता. जेव्हा लोकांमध्ये क्रिया आणि प्रतिक्रियेची चर्चा होत असते परंतु सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्या निकालामुळे जी प्रतिक्रिया उमटली त्या प्रतिक्रियेमधून उमटलेल्या प्रतिक्रियेंचे आजही भारतीय राजकारणावर वर्चस्व आहे. शहाबानोच्या केस मध्ये त्यांनी जे निकालपत्र दिले ते केवळ एका अभ्यासापुरते नव्हते. मला या ठिकाणी उल्लेख करावासा वाटतो की, ते जेव्हा 52 व्या वर्षी सर्वोच्च न्यायालयाच्या पीठासनावर गेले त्यावेळेस त्यांनी जे काम सुरु केले त्यावेळेस सरन्याधिशांच्या टिममध्ये सर्वोच्च न्यायालयातील पीठासनावर असलेले सदस्य या नात्याने ते सगळयात लहान न्यायाधीश होते. श्री. चंद्रचूड हे निवृत्त झाल्यानंतर म्हणजे 1985 सालानंतरही ते क्रियाशील राहिले होते. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या अनेक व्यासपीठावर त्यांचा आणि माझा अनेक वेळा संपर्क आला होता. दैनिक सकाळचे ते एक विश्वस्त होते त्यामुळे पुणेकरांच्या जीवनामध्ये त्यांचा सातत्याने संपर्क होता. कै. यशवंत विष्णू चंद्रचूड यांच्या रुपाने जगण्याचा अधिकार सामान्य माणसे शोधत असतांना त्यांना कायद्याच्या चौकटीतून आधार देणारं व्यक्तिमत्व आपण गमावलेले आहे. मुस्लीम महिलांच्या न्यायाच्या संदर्भात बोलावयाचे झाले तर त्यांचा लढा अजुन देखील अश्वथाम्याच्या जखमेसारखा अपूरा आहे त्याला ख-या अर्थाने कोण न्याय देणार याचे उत्तर नियतीसुध्दा देऊ शकत नाही अशी वस्तुस्थिती आहे.

यानंतर श्री. गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे ..

कै.यशवंतराव चंद्रचूड यांचे दु:खद निधन झाल्यामुळे त्यांना मी श्रध्दांजली अर्पण करते.

सभापती महोदय,ज्येष्ठ गांधीवादी नेत्या श्रीमती निर्मला देशपांडे यांचे दु:खद निधन झालेले आहे. त्यांनासुध्दा मी श्रध्दांजली अर्पण करते. त्या माझ्या ज्येष्ठ मार्गदर्शक होत्या असे मी निश्चितपणे म्हणू शकते. गेल्या 25 वर्षा पेक्षा अधिक वर्षापासून त्याचा व माझा वैयक्तिक परिचय होता. दिल्ली, मुंबई, नागपूर इत्यादी ठिकाणी ज्या काही बैठका होत असतात त्या ठिकाणी अतिशय साधेपणाने परंतु आग्रहाने त्या आपले मुद्दे मांडत होत्या. दक्षिण आशियातील हिंदुस्थान, बांगला देश, नेपाळ वा इतर देशातील मुलींच्या जगण्याच्या अधिकाराबद्दल आणि त्या देशातील महिलांच्या स्थितीबद्दल संपूर्ण दक्षिण आशियामध्ये आपली भूमिका मांडण्याचे काम श्रीमती निर्मला देशपांडे करत होत्या. शांतता या विषयामध्ये त्या खास करुन लक्ष धालत होत्या. ज्यावेळी अफगानिस्तानची निर्मिती झाली होती त्यावेळी अफगानिस्तानमधील महिलांना जगण्याचा अधिकार मिळाला पाहिजे, त्यांच्यावर जी काही चुकीची बंधने घालण्यात आली होती ती काढून टाकली पाहिजेत यासाठी ज्या व्यक्ती अफगानिस्तानमध्ये पोहोचू शकत होत्या त्यामध्ये श्रीमती निर्मला देशपांडे यांचा सुध्दा समावेश होता. त्या दोन चार वर्षानंतर मला भेटावयाच्या त्यावेळी त्या मला असा प्रश्न विचारत होत्या की, "तुझे काय काम चालले आहे ?" या प्रश्नामुळे आमच्या सारख्या व्यक्तिची सद्सदविवेक बुध्दी जागृत राहत असते असे मला वाटते. आपण सुध्दा कोणाला तरी अन्सरेबल आहोत , आपण कोणाला तरी उत्तरे देऊ लागतो असे आम्हाला वाटू लागते. श्रीमती निर्मला देशपांडे या राज्यसभेवर सभासद होत्या त्यावेळी त्यांनी जे कार्य केलेले आहे. त्या कार्यामध्ये त्यांची संपूर्ण बांधिलकी ही गोर गरीब महिलांसाठी होती. बांगला देश मधील नौखाली येथे मी पाच वर्षापूर्वी गेले होते. बांगला देशमधील नौखाली येथे गांधीवादी आश्रम अजूनही चालविला जातो. त्या देशात संपूर्णपणे मुस्लिम राजवट असतांना नौखालीतील आश्रमामध्ये राहणा-या लोकांना इतर लोक कसे काय जगू देतात याचे मला आश्चर्य वाटलने होते. नौखाली येथील आश्रमामध्ये गेल्यानंतर तेथील लोकांनी मला असे सांगितले की, आजही दर सहा महिन्यांनी श्रीमती निर्मला देशपांडे त्या आश्रममामध्ये जाऊन तेथील कारभार पहात आहेत. अनेक महत्वाच्या व जबाबदारीच्या पदासाठी त्यांचे नाव चर्चेमध्ये होते परंतु त्या कोणत्याही राजकीय पक्षाच्या सभासद नसल्यामुळे त्यांचे नाव स्पर्धेमध्ये नेहमीच मागे पडले. त्या कोणत्याही स्पर्धेमध्ये सहभागी होत नव्हत्या. आत्मिक आणि वैश्विक अशा पध्दतीने त्यांची ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वाटचाल सुरु होती. त्यांच्या दु:खद निधनाच्या निमित्ताने मला अशी खंत व्यक्त करावीशी वाटते अनेक खादी ग्रामोद्योग बोर्डामध्ये किंवा गांधीवादी संस्थामध्ये आज अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे की त्या ठिकाणी काम करणारी माणसे वयोमानपरत्वे थकलेली आहेत. त्यामुळे अशा संस्थांचे पुढे काय होणार आहे, त्या संस्थामध्ये काम करणारे जे पदाधिकारी आहेत , कर्मचारी आहेत ,आश्रित लोक आहेत ते आज 80 ते 90 वर्षाचे आहेत . त्यांचा विचार ते कसे पुढे नेणार आहेत, त्याचबरोबर या संस्थांचे पुढचे भवितव्य काय राहणार आहे. हे देखील आपल्यापुढे फार मोठे अव्हान आहे. श्रीमती निर्मला देशपांडे यांनी राज्यसभेचे सभासद म्हणून काम करीत असतांना ज्या काही सूचना केल्या आहेत त्या सूचनांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य सरकारने योग्य तो पाठपुरावा केला पाहिजे.असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, जागतिक विश्व महिला संमेलनाच्या कार्यक्रमांमध्ये त्या मला अनेकदा भेटलेल्या आहेत. त्यांचे दु:खद निधन झालेले असल्यामुळे शिवसेनेची विधान परिषदेची सदस्या म्हणून मी त्यांना आदरांजली व्यक्त करते.

सभापती महोदय, ज्येष्ठ साहित्यिक व सुप्रसिध्द नाटककार कै. विजय तेंडुलकर यांचे दु:खद निधन झालेले आहे. ते आंतरराष्ट्रीय स्तरावरील एक साहित्यिक होते. त्याचबरोबर गेल्या 25 वर्षात त्यांच्या साहित्यामुळे महाराष्ट्रात प्रचंड असा प्रभाव टाकला गेला होता. त्यांच्या निधनाबद्दल श्रध्दाजंली अर्पण करीत असतांना नाशिक येथील दैनिक सकाळचे संपादक श्री. उत्तम कांबळे यांनी असे म्हटले होते की, "माणसाच्या मनातील मंगलता आणि माणसाच्या मनातील गिधाडे यांचे दर्शन कै. विजय तेंडुलकर यांच्या साहित्यातून झाले होते." त्यांनी लिहिलेले सर्व साहित्य मी वाचलेले आहे हे मी अत्यंत नम्रतने सांगू इच्छिते. माणसाच्या मनातील छटा हिंस्त्र रुपाने किंवा विसंगत स्वरुपात बाहेर येतात. त्या पहिल्यांनतर आपल्याला सुध्दा आश्यर्च वाटते खरोखर ही माणसे आहेत की हैवान आहेत, ही माणसे आहेत की राक्षस आहेत आणि खरोखर माणूस अशा पध्दतीने वागू शकतो काय ? अशा प्रकारचे प्रश्न आपल्याला पडतील. अशा प्रकारचे व्दंव्द त्यांनी त्यांच्या साहित्यातून व्यक्त केले होते. काही वेळा त्यांच्या साहित्यातून हिंसाचार समोर येत असावयाचा, " गिधाडे" या नाटकामध्ये मध्ये श्रीमती बेनारे बाईबद्दलची एक भूमिका होती आणि त्या बाईच्या अंगावर एक मनुष्य यावयाचा हे दृश्य इतके भयंकर होते की ते दृश्य बघू नये

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असेच वाटावयाचे. अशा प्रकारची हिंस्त्रता व्यक्त करण्यामध्ये कै. विजय तेंडुलकर कोठेही कचरले नाहीत. " सामना ", "सिंहासन" आणि "उंबरठा" हे चित्रपट जर आपण पाहिले तर चांगल्या मार्गाने चालणारा माणूससुध्दा वाईट मार्गाकडे कसा वळतो हे आपल्याला त्यातून दिसून येईल. मुख्यमंत्री असो, पत्रकार असो त्यांच्या संदर्भात "सिंहासन" या चित्रपटात केलेले वर्णन आणि चित्रीकरण अवीट आहे. विधान सभेचे आणि विधान परिषदेतील कामकाज त्या चित्रपटात दाखविण्यात आलेले आहे 50 वेळा जरी सिहासन हा चित्रपट पाहिला असला तरी तो पुन्हा पुन्हा पहावासा वाटतो.

सभापती महोदय, वेळ मर्यादित आहे याची मला कल्पना आहे. तरी सुध्दा मी सांगू इच्छिते की,

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तेंडुलकरांची मुलगी प्रिया हिच्याशी माझी वैयक्तिक मैत्री होती. अतिशय अकृत्रिम अशा पद्धतीची आणि वेगळ्या अशा प्रकारची या दोघांचीही व्यक्तिमत्त्वे होती. श्री.तेंडूलकरांना दुर्दैवाने त्यांच्या मुलीचा, प्रियाचाही मृत्यू पहावा लागला. प्रियासारखी मनस्वी मुलगी गमावल्यानंतर तेंडुलकर हे खरोखरी तब्येतीने थोडेसे अधिकाधिक अस्वस्थ होत चालले होते. त्यांच्या साहित्याबद्दल अनेकांचे अनेक मतभेद आहेत. शिवसेनेचेही काही मतभेद असले तरी दै. सामना मधून स्वत: शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी तेंडुलकरांना श्रद्धांजली व्यक्त केली आणि नवशक्तीमध्ये असतानाचा त्यांचा एकत्रित काम करतानाचा स्नेह होता त्याला त्यांना उजाळा दिला. स्व. विजय तेंडुलकरांना मी या ठिकाणी शिवसेनेच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करते.

सभापती महोदय, ज्येष्ठ निरूपणकार नानासाहेब धर्माधिकारी यांचे कार्य आपण सारे जाणतो आहोत. संत ज्ञानेश्वरांच्या पठडीतील जे अध्यात्मिक वाङ्.मय आहे ते सामान्य लोकांपर्यंत सोप्या भाषेतून पोहोचविण्याचे फार महान कार्य होणे आवश्यक होते ते कार्य नानासाहेब धर्माधिकारी यांनी केलेले आहे. त्यांचे भक्त वा समर्थक आपण पाहिले तर ती अतिशय सामान्य माणसे आहेत. ज्यांनी कधी मनाचे श्लोक किंवा दासबोध हातात देखील घेतले नसते अशा व्यक्तींपर्यंत जाऊन त्यांचा अर्थ समजावणे आणि त्यांचे एक मानसिक नाते या सगळ्या धर्माबद्दल जोडून देणे असे एक ऐतिहासिक काम नानासाहेब धर्माधिकारी यांनी केलेले आहे. त्यांनी केलेल्या कार्याबद्दल त्यांना अनेक वेगवेगळ्या लोकांनी, संस्थांनी पुरस्कार दिलेले आहेत, पण नानासाहेब धर्माधिकारी यांचे कार्य हे त्या पुरस्कारांच्याही पलिकडचे आहे असे मला येथे सांगावेसे वाटते. सभापती महोदय, परवा गुरूपौर्णिमा आहे. अशा वेळी नानासाहेब धर्माधिकारींचे जे भक्तगण आहेत, समर्थक आहेत, आमच्या सारखे जे त्यांच्या विचारांना मानणारे लोक आहेत ते, तसेच आपण सर्व या सभागृहातील सदस्य परवाच्या गुरूपौर्णिमेच्या निमित्ताने, नानासाहेब धर्माधिकारी यांनी जे समाजात समाज प्रबोधनाचे कार्य केले आहे, ते समाज प्रबोधनाचे काम लोकांना शांतता मिळावी, त्यात कोठेही कोठलाही हस्तक्षेप न होता या भक्तांचे काम चालू रहावे या दृष्टीने अधिक मजबूत करता येईल या बाबत निश्चितपणे विचार केला पाहिजे असे मला वाटते. नानासाहेब धर्माधिकारी यांना मानणारे, त्यांच्या संप्रदायातील जे खास भक्तगण आहेत त्यांच्या दु:खामध्ये मी सहभागी तर आहेच, पण रायगड जिल्ह्यात खास करून त्यांचे एखादे स्मारक ज्यातून त्यांच्या विचारांचा प्रसार

..... एन 2 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे ....

होईल असे उभारले गेले पाहिजे असे मला मुद्दाम सांगावेसे वाटते. सभापती महोदय, या सगळ्या मान्यवरांचे जे समाजात स्थान आहे ते त्यांच्या साहित्यातून, कार्यातून अमर अशाच स्वरूपाचे आहे आणि त्यामुळे महाराष्ट्रावर आलेल्या वेगवेगळ्या संकटातून आपल्याला मार्ग काढण्याची शक्ती मिळावी अशी मी ईश्वराकडे प्रार्थना करते. सभापती महोदय, विजय तेंडुलकर असते तर आता मी ईश्वराकडे जी प्रार्थना करते आहे ती त्यांना आवडली नसती. परंतु बाकीच्यांच्या संदर्भात सद्सद् विवेकबुद्धीला स्मरून देखील तेंडुलकरांचा जो काही वारसा आहे तो नाट्यामधून, साहित्यातून अजून जगभर जावा अशी अपेक्षा मी या प्रसंगी व्यक्त करते. जयहिंद, जय महाराष्ट्र.

***

..... एन 3 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी येथे जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्याला सहभावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, श्री.बाजीराव निवृत्ती शिंदे आणि श्री.दशरथ नरसिंग कांबळे हे दोघेही या सदनाचे माजी सदस्य होते. या दोन्ही माजी सदस्यांबाबत एक गोष्ट मला सांगाविशी वाटते की, या दोघांनाही औपचारिक शिक्षाची फारशी संधी मिळाली नसतानाही सामाजिक जीवनामध्ये त्यांनी धडाडीने काम केले आहे. श्री.बाजीराव शिंदे हे तर ग्रामीण विकास विभागाचे उपमंत्री म्हणून देखील काही वर्षे कार्यरत होते आणि श्री.दशरथ कांबळे हे या सदनाचे एक सदस्य म्हणून विधीमडळाच्या समित्यांमध्ये काम करीत असताना अत्यंत सक्रीयतेने काम करीत असत.

सभापती महोदय, भारताचे माजी लष्कर प्रमुख फिल्डमार्शल सॅम माणेकशॉ यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडत असताना माननीय उपमुख्यमंत्र्यांनी त्यांच्याबाबत 'कै.माणेकशॉ हे चतुरस्त्र, अतिशय हुशार, बुद्धिमान आणि संवेदनशील कमांडर होते..' असे त्यांचे वर्णन केले. त्यांनी केलेल्या वर्णनातील प्रत्येक शब्द अगदी चपखलपणे वापरला आहे. त्यातील 'संवेदनशील कमांडर' या शब्दाने मला आठवण झाली की, 1971 मध्ये भारताने जो विजय मिळविला तो त्यांच्या चतुरस्त्र नेतृत्त्वाखाली मिळविला होता आणि त्यावेळी ढाक्याच्या रेसकोर्स मैदानावर जो शरणागती स्विकारण्यापूर्वीचा लहानसा प्रसंग होता. ढाक्याच्या सैन्याचे पराभूत सैन्याधिकारी श्री.ए.के.नियाझी यांना त्यावेळी एक गोष्ट डाचत होती आणि ती म्हणजे शरणागतीची प्रक्रिया.

(यानंतर श्री. सरफरे .... ओ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख...

शरणागतीच्या प्रक्रियेमध्ये पराभूत कमांडरने त्यांच्यासमोर गुडघे टेकून आपली बंदूक विजेत्या सरसेनापतीला अर्पण करण्याची पध्दत होती. लेफ्टनंट जनरल अे. के नियाजी हे तळमळून गेले आणि त्यांनी त्यावेळचे सेनेचे सरसेनापती जगजितसिंह अरोरा यांच्याकडे केली. त्यावेळी त्यांनी संवेदनशील कमांडर कसा असतो याचे उदाहरण दिले. शरणागतीच्या प्रक्रियेबाबत शासनाबरोबर चर्चा करुन त्यामध्ये थोडा बदल केला. आणि त्यानंतर लेफ्टनंट जनरल अे. के. नियाजी यांनी जगजितसिंह अरोरा यांच्या खंद्यावर मान टेकवून शरणागती आणि पिस्तूल त्यांच्या स्वाधीन करुन शरणागती स्वीकारण्याची प्रक्रिया बदलवली. म्हणजे पराभूतांची खूप मानहानी करुन त्यांना शरण आणण्यामध्ये जो आनंद असतो तो फार योग्य नसतो हे दाखविण्याचे संवेदनशील मन सॅम माणेकशॉ यांच्याजवळ होते. मला वाटते संवेदनशील कमांडर हा शब्द त्यांच्या बाबतीत वापरला गेला म्हणून ही गोष्ट सहज आठवली म्हणून सांगितली.

सभापती महोदय, भारताचे माजी सरन्यायाधीश श्री. यशवंतराव चंद्रचूड हे निष्णात कायदे पंडित होते. त्यांनी वकील म्हणून काम केले. मुंबईच्या शासकीय विधी महाविद्यालयामध्ये प्राध्यापक म्हणून वकिली शिकविण्याचे काम केले. उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून, मुख्य न्यायाधीश म्हणून, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून आणि सर्वात जास्त वेळ सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश म्हणून काम करुन ते निवृत्त झाले. त्यांनी स्वत: सांगितलेली गोष्ट अशी की, उत्तर महाराष्ट्र विद्यापिठाच्या कुलगुरुच्या निवड समितीचे ते अध्यक्ष होते, मी देखील त्या समितीचा सदस्य होतो. त्याबाबत ज्यावेळी सहयाद्री अतिथीगृह येथे बैठक झाली त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, आपल्या कारकिर्दीमधील एखादी महत्वाची गोष्ट सांगा. न्यायाधीश किंवा सरन्यायाधीश म्हणून नव्हेतर वकील म्हणून मला आठवत असलेली आठवण तुम्हाला सांगतो. त्यावेळी त्यांनी नानावटी आणि आहुजा यांच्या संदर्भातील जो खून खटला सुरु होता त्याची आठवण सांगितली. त्यामध्ये आठवण सांगण्यासारखे काय आहे? सभापती महोदय, आपल्याला अचंबा वाटेल. ते म्हणाले की, माझ्या आयुष्यात मी अनेक खटले लढविले. त्या खटल्यामध्ये ते शासनाचे वकील होते. लोकांचा लोकमताचा, नेंत्यांचा, लोकप्रतिनिधींचा, इतक्या प्रचंड सहानुभूतीचा ओघ नानावटी यांना लाभल्यामुळे नानावटी यांच्या हातून आहुजा यांचा खून झाला ही गोष्ट कोर्टामध्ये सिध्द झाली. परंतु त्यामध्ये त्यांना निर्दोष सोडावे अशी जनभावना होती. आणि त्याला कारणही तसेच होते. मानवी व्यवहारात आहुजा यांनी जे कृत्य केले होते. म्हणजे आपण घटस्फोट ध्यायला तयार आहोत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

प्रा. बी. टी. देशमुख...

असे सांगितल्यानंतर सुध्दा ते न करता त्यांनी जे व्यवहार सुरु ठेवले होते त्यातून त्यांची हत्या झाली. हा सारा प्रकार लोकांना तपशिलासकट कळला त्यावेळी लोकांकडून प्रचंड सहानुभूती कॅप्टन नानावटी यांना मिळाली. ही आठवण मला सांगतांना ते म्हणाले की, कोर्टामध्ये बाजू मांडणे सुध्दा कठीण होईल इतकी सहानुभूती लोकमानसातून कॅप्टन नानावटी यांच्या बाजूने होती. वकिलांनी आणि इतर लोकांनी ते कोर्ट खचाखच भरलेले रहावयाचे. त्यावेळी त्यांना सांगावे लागले की, खून केलेला असतांना सुध्दा हेतूकडे लक्ष ठेवून आरोप सिध्द करावयाचे टाळले तर आपण अनारकीला आमंत्रण देत आहोत अशाप्रकारचे त्यांचे युक्तिवाद होते, ते मला याठिकाणी सांगणे शक्य नाही. त्यावेळी सामाजिक स्थिती कशी होती हे त्यांनी सांगितले. सभापती महोदय, त्याठिकाणी त्यांनी केलेला आरोप सिध्द झाला, त्याचे नेतृत्व सरकारी वकील म्हणून श्री. चंद्रचूड यांनी केले. एकदा आरोप सिध्द झाल्याचा निकाल दिल्यानंतर दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी शिक्षेची चर्चा सुरु होते. त्यासाठी एक वेगळा दिवस ठेवला जातो. त्यादिवशी श्री.चंद्रचूड उठून उभे राहिले. आणि त्यांनी न्यायाधीशांना सांगितले की, "न्यायाधीश महोदय, मॅक्झिमम कन्सिडरेशन ज्या प्रकरणात देता येणे शक्य आहे, आणि दिले पाहिजे ते हे प्रकरण आहे हे मी आपल्याला सांगतो." वास्तविक त्या प्रकरणामध्ये फाशीच्या शिक्षेची सुध्दा त्यांना मागणी करता आली असती. या गोष्टी सांगतांना त्यावेळचे चित्र त्यांनी उभे केले. त्यांनी तशाप्रकारचे चित्र उभे करणे ही वेगळी गोष्ट आहे. त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीतील एखादी गोष्ट सांगा असे मी म्हटल्यानंतर त्यांनी ही गोष्ट सांगितली. त्यावेळी त्यांचा न्याय निष्ठुरतेचा परिचय मला झाला.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नाही

प्रा.बी.टी.देशमुख . . . .

सभापती महोदय, याठिकाणी ज्येष्ठ गांधीवादी नेत्या श्रीमती निर्मला देशपांडे यांच्याविषयी सुध्दा माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी शोक प्रस्ताव मांडलेला आहे. त्यांच्या बाबतीत बाकीच्या सर्व गोष्टी सांगण्यासारख्या आहेतच, परंतु आज माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो विषय मांडलेला आहे, त्याला माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी समर्थन दिले आणि सभापती महोदय, आपण या विषयावरील चर्चा मान्य केली आहे. श्रीमती निर्मला देशपांडे अमरावतीला आलेल्या असताना, आम्ही विदर्भातील काही लोकप्रतिनिधी त्यांची भेट घेतली आणि त्यांना सांगितले की, शेतकऱ्यांच्या एका पाठोपाठ इतक्या आत्महत्या होत आहेत. अशा वेळी आपण माननीय पंतप्रधान यांच्याबरोबर आम्ही भेट घडवून आणावी. मग त्यांनी दिल्लीला गेल्या बरोबर माननीय पंतप्रधान यांच्याबरोबर आमची भेट ठरविली. मग विदर्भातील सर्व आमदारांचे, खासदारांचे एक शिष्टमंडळ बरोबर घेऊन माननीय पंतप्रधान यांची भेट घडवून आणली. एवढेच नव्हेतर त्यादिवशी ऑफीस ऑफ प्रॉफिटच्या पदावरुन सत्ताधारी पक्षाच्या माननीय नेत्यांना राजीनामा देण्याच्या संदर्भातील एक मोठा घटनाक्रम सुरु असताना सुध्दा माननीय पंतप्रधान यांना असे सांगितले की, हा अतिशय सेन्सेटीव्ह विषय असून विदर्भामधून 30 आमदार, 5 खासदार येथे आलेले आहेत आणि त्यांनी या विषयाच्या बाबतीत एक उत्तम प्रकारे चर्चा घडवून आणली. एवढेच नाही तर यासंबंधात एक समिती पाठविण्यात आली. तसेच माननीय पंतप्रधान यांना बरोबर घेऊन त्या स्वत: विदर्भामध्ये आल्या आणि या प्रश्नाला महत्तम न्याय देण्याच्या बाबतीत त्यांनी प्रयत्न केला आहे. अशा प्रकारे कोणत्या कामामध्ये लक्ष घालावे आणि कोणत्या कामामध्ये लक्ष घालू नये या संबंधात त्यांचा अंदाज अतिशय बिनचूक असल्याचे त्यांच्या प्रत्येक वर्तनातून दिसून येत असे.

सभापती महोदय, ज्येष्ठ साहित्यिक व सुप्रसिध्द नाटककार श्री.विजय तेंडूलकर हे प्रख्यात साहित्यिक होते, नाटककार होते. तसेच पटकथाकार, पत्रकार, सामाजिक समीक्षक आणि चित्रकार होते. या सर्व गर्दीमध्ये ते स्वातंत्र्य सैनिक सुध्दा होते ही गोष्ट अनेक वेळा विसरली जाते. अंधश्रध्दा हानीकारक आहे आणि विवेकावर आधारित विचारांमध्येच अंतिम हित आहे असे सांगणारे जे मोजके साहित्यिक आहेत, त्या परंपरेतील हे एक अतिशय थोर असे साहित्यिक आहेत.

सभापती महोदय, लोक प्रबोधनामध्ये किर्तन आणि निरुपण या आयुधांचा वापर करुन आयुष्यभर निष्ठापूर्वक काम केलेली जी काही माणसे आहेत. त्यातील एक व्यक्ती म्हणजे श्री.नाना-

. . . .पी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख . . . .

साहेब धर्माधिकारी हे एक आहेत. कै.नानासाहेब धर्माधिकारी यांच्याविषयी काय बोलावे ? पण आमच्या भागामध्ये महात्मा गांधी यांच्या विचारांची पताका जीवनभर खांद्यावर ठेऊन काम करणारी आणि समजाला दिशा देणारी जी मोजकी माणसे झाली आहेत, त्यामध्ये कै.नानासाहेब धर्माधिकारी यांचे अतिशय वरच्या क्रमांकाचे स्थान आहे. मी मनापासून या दिवंगत समाज सुधारकांना श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

. . . .पी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी सुरुवातीला माजी विधानपरिषद सदस्य सर्वश्री. बाजीराव शिंदे व दशरथ कांबळे यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

मी पत्रकार असताना माजी विधान परिषद सदस्य श्री.बाजीराव कांबळे यांच्याशी माझा जवळचा परिचय होता. गोरगरीब समाजाबद्दल तळमळ असलेला एक कार्यकर्ता असे त्यांचे वर्णन करता येईल.

सभापती महोदय, आपल्या देशाच्या अजुबाजूचे देश अनेक वेळा लष्करशाहीला बळी पडले. पण आपला देश कधी बळी पडला नाही याचे श्रेय जसे देशाच्या घटनेला आहे, या देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्यांना आहे, त्याचप्रमाणे या देशातील तीनही सेना दले सांभाळणाऱ्या कप्तानांना देखील द्यावे लागेल आणि ही परंपरा फिल्डमार्शल सॅम माणेकशॉ यांनी सुरु केली हे आवर्जून सांगितले पाहिजे. 1971 मधील युध्द जिंकल्यानंतर माणेकशॉ हे अतिशय लोकप्रिय झाले. ते सर्वशक्तीमान होते, लष्करामध्ये देखील अतिशय प्रिय होते. अशी अफवा उठली होती की, ते काहीतरी करतील. कै.इंदिरा गांधी यांनी त्यांना विचारले. तेव्हा आपले मोठे नाव दाखवत माणेकशॉ म्हणाले की, मी दुसऱ्या कामामध्ये कधी नाक खुपसत नाही. माणेकशॉ यांनी जी परंपरा निर्माण केली म्हणूनच सेनादले भारताचे रक्षण करु शकतात आणि लोकशाहीचेही रक्षण करु शकतात हे आवर्जून सांगितले पाहिजे.

सभापती महोदय, भारताचे माजी सरन्यायाधीश श्री.यशवंतराव चंद्रचूड यांचे त्यांनी वकील म्हणून केलेले काम, त्यांचे खटले अतिशय गाजले. तसेच त्यांचे निकालही ऐतिहासिक ठरले आहेत. पण निवृत्तीनंतर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मार्फत आणि अन्य संघटनांमार्फत त्यांनी समाज कार्याला वाहून घेतले हे देखील या निमित्ताने आवर्जून सांगितले पाहिजे.

सभापती महोदय, थोर गांधीवादी नेत्या श्रीमती निर्मलाताई देशपांडे यांचे अलिकडच्या काळातील महामानव या शब्दातच वर्णन करता येईल अशा त्या विदूषी होत्या.

यानंतर श्री.बरवड . . ..

अशुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

अहिंसा, शांती, प्रेम, सहिष्णुता आणि धर्मनिरपेक्षता हे महात्मा गांधीजींचे तत्वज्ञान त्यांनी आपल्या जीवनाचे तत्वज्ञान मानले आणि त्यासाठी आयुष्यभर काम करीत राहिले. त्यामुळे सीमेपलीकडून सुध्दा त्यांना श्रध्दांजली वाहिली गेली. ज्यांना आपण अतिरेकी म्हणतो त्या अतिरेकी संघटनांच्या नेत्यांना सुध्दा त्यांच्या मृत्यूचा शोक आवरला नाही. यातच निर्मलाताई यांचा मोठेपणा आहे.

सभापती महोदय, कै. विजय तेंडूलकर यांचा व्यक्तिगत स्नेह आणि मार्गदर्शन मला खूप मिळाले. माझ्या आधीच्या पत्रकारितेच्या कामामध्ये मला जे नाव मिळाले त्यामध्ये मोठा वाटा आणि संस्कार कै. विजय तेंडूलकर यांचा आहे. मला हे सांगितले पाहिजे की, आंतरराष्ट्रीय स्तरावर मराठी साहित्याला घेऊन जाणारा हा अर्वाचीन काळातील पहिला महान सारस्वत आहे. त्यांच्या मृत्यूची दखल या देशाच्या कानाकोपऱ्यातील सर्व भाषेतील वृत्तपत्रांनी पहिल्या पानावर घेतली आणि मृत्यूलेख लिहिले. असे भाग्य दुसऱ्या मराठी साहित्यिकाला क्वचितच मिळाले असेल. मानवी मनातील हिंस्त्र श्वापदांचे अतिशय प्रत्ययकारी चित्रण करणारा दुसरा मराठी लेखक झाला नाही. हे त्यांच्या बाबतीत सांगावे लागेल.

सभापती महोदय, थोर निरुपणकार नाना धर्माधिकारी जेव्हा निरुपणाला उभे राहात तेव्हा लाखोचा जनसमुदाय जमत असे. संत गाडगेबाबा, तुकडोजी महाराज यांच्या परंपरेतील, कोणताही चमत्कार नाही, कोणतीही बुवाबाजी नाही, संतांच्या वाङमयाचा रसाळ आणि सोप्या शब्दात अर्थ सांगणे हे त्यांनी निरुपणाचे साधन मानले आणि त्यासाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले. धर्म आणि अध्यात्म हे मानवी जीवनात सौख्याचे सिंचन करण्यासाठी आहेत असे सांगणारा असा हा महान धर्माधिकारी होता. या सर्व दिवंगतांना मी लोकभारतीतर्फे श्रध्दांजली अर्पण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बरवड/पाटील

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते आदरणीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील साहेबांनी मांडलेल्या शोक प्रस्तावाच्या संदर्भात श्रध्दांजली अर्पण करीत असताना माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. या सभागृहाचे माजी सदस्य कै. बाजीराव शिंदे तसेच कै. दशरथजी कांबळे यांना मी या ठिकाणी श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, हिमालयाच्या उंचीची जी माणसे महाराष्ट्रात आणि देशात होऊन गेली त्यामध्ये फिल्डमार्शल सॅम माणेकशॉ होते. त्यांच्या संवेदनशीलतेबद्दल सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी सांगितले. पण लष्करामध्ये शिस्त ही अत्यंत महत्वाची असते. नेपोलियनच्या संदर्भात जे शब्द वापरले जात असत तेच शब्द कदाचित आपल्या फिल्डमार्शल सॅम माणेकशॉ यांच्या संदर्भात सुध्दा वापरता येतील. इंग्रजीमधील 7-8 ओळींचा एक स्टँझ मला आठवतो. डावीकडून गोळ्यांचा वर्षाव, उजवीकडून गोळ्यांचा वर्षाव, समोरुन गोळ्यांचा वर्षाव तरीही लष्करातील माणसे पुढे जातात. "canon to the left of them, canon to the right of them, canon to the front of them, in valley of thunder, in valley of death, road the 600, there not to question why, it is only to do and die." त्या ठिकाणी डू ऑर डाय अशी परिस्थिती असते. मरु, मारु जे काही असेल पण जी शिस्त आहे ती अत्यंत महत्वाची आहे. म्हणून त्यांना फिल्डमार्शल हा किताब मिळाला. शिस्तीच्या संदर्भात, चारित्र्याच्या संदर्भात, संवेदनशीलतेच्या संदर्भात फार मोठे व्यक्तिमत्व आपल्यातून निघून गेलेले आहे.

सभापती महोदय, भारताचे माजी सरन्यायाधीश कै. यशवंतराव चंद्रचूड हे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये येत असत. त्यावेळी माझी त्यांच्याबरोबर जवळीक निर्माण झाली व त्यांच्याशी जवळचा संबंध आला. न्यायाधीशाला अभिप्रेत असलेले भाषेवरील प्रभुत्व, कायद्याची जाण आणि निर्भयता या बाबी अतिशय महत्वाच्या आहेत. सर्वसाधारण जनता कायदा गाढव असतो असे म्हणते परंतु त्यांनी त्याचे हे शब्द असत्य ठरवले. कायदा गाढव नसतो अशा पध्दतीचे निर्णय त्यांनी दिले. त्यांनी दिलेला पोटगीचा निर्णय हा लक्षात राहील असा अत्यंत महत्वाचा निर्णय आहे. नानावटी, आहुजा यांच्यासंदर्भात सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी सांगितले. ती वस्तुस्थिती होती. 20-25 वर्षापूर्वी हिदुस्थानातील सर्व वर्तमानपत्रामध्ये हे आले होते. नानावटी आणि आहुजा यांना कोणी पाहिले असेल किंवा नसेल पण

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी....

त्या निर्णयामध्ये ही दोन नावे होती. एक उचित निर्णय त्यांच्या माध्यमातून देण्यात आला होता.

सभापती महोदय, गांधीवादी विचाराच्या थोर नेत्या श्रीमती निर्मलाताई देशपांडे हया अनेकवेळा माझ्या घरी देखील येऊन गेल्या होत्या. श्रीमती देशपांडे यांनी 40 हजार कि.मी. पायी प्रवास केला होता तो स्वार्थासाठी नाही तर दुस-यांसाठी, भूमिहिनांसाठी केला होता. इतके अप्रतिम श्रेणीचे कार्य श्रीमती निर्मलाताई देशपांडे यांनी केले होते. त्यामध्ये गांधीजींचा विचार होता, त्यात आचार्य विनोबांजींचाही विचार होता. अनेक वर्षे त्या वर्ध्याच्या आश्रमामध्ये राहिल्या होत्या ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, ज्येष्ठ साहित्यिक व सुप्रसिध्द नाटककार श्री.विजय तेंडुलकर यांचे नाव घेतल्यावर "शांतता ! कोर्ट चालू आहे" आणि "सखाराम बाईंडर" अशी दोन नाटके आपल्या डोळयासमोर येतात. त्यावेळच्या परिस्थितीची आपल्या सगळयांना जाणीव आहे. मला जे आवडेल ते मी लिहिणार, ते नाटक तयार करुन प्रेक्षकांसमोर नेणार अशी एक जिद्द त्यांच्यामध्ये होती.

सभापती महोदय, थोर पूज्य नानासाहेब धर्माधिकारी यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडण्यात आला आहे. गंडा, दोरा, अंधश्रध्दा, चमत्कार हे शब्द त्यांचे कधीच नव्हते. त्यांनी व्यसनमुक्ती हा महत्वाचा भाग मानल्यामुळे मानवतेचे उदात्तीकरण झाले. अध्यात्म हा त्यांच्या जीवनातील महत्वाचा भाग होता. धर्म आणि अध्यात्म यामध्ये काय फरक आहे हे सांगण्याची आवश्यकता नाही. रिलिजन आणि स्पिरीच्युॲलिटी यापेक्षा त्यांनी अध्यात्मावर जास्त भर दिला होता.

सभापती महोदय, फिल्डमार्शल माणेकशॉ यांच्याबाबतीत म्हणेन की, मरावे परी शिस्तरुपी उरावे, श्री.यशवंतराव चंद्रचूड यांच्या संदर्भात म्हणेन की, मरावे परी न्यायरुपी उरावे, श्रीमती निर्मलाताई देशपांडे यांच्यासंबंधी म्हणेन की, मरावे परी सेवेरुपी उरावे, श्री.विजय तेंडुलकर यांच्या संदर्भात म्हणेन की, मरावे परी शब्दरुपी उरावे आणि नानासाहेब धर्माधिकारी यांच्याबाबत म्हणेन की, मरावे परी अध्यात्मरुपी उरावे, अशा प्रकारचे थोर आणि उंचीचे व्यक्तिमत्व या देशातून आणि महाराष्ट्रातून निघून गेले आहेत, या सगळयांना आपल्या सगळयांतर्फे श्रध्दांजली अर्पण करुन येथेच थांबतो.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्यासंबंधी माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

माझे मित्र कै.बाजीराव शिंदे हे या सदनाचे सदस्य असताना दोन वर्षे त्यांच्याबरोबर या सदनात काम करण्याची संधी मिळाली होती. ते काही काळ राज्यमंत्री होते. युवक चळवळीपासून ते विद्यार्थी चळवळीपर्यंत त्यांनी काम केले होते. ग्रामीण भागातील आणि विशेषत: मराठवाडा विकासाच्या आंदोलनामध्ये जे नेते त्या काळात पुढे आले त्यामध्ये कै.बाजीराव शिंदे होते. त्यानंतर कै.इंदिरा गांधी यांच्यावर प्रामाणिक निष्ठा ठेऊन काँग्रेसच्या माध्यमातून राजकारण आणि समाजकारण करताना एक निष्ठावंत म्हणून कै.बाजीराव शिंदे यांचा उल्लेख यानिमित्ताने करावा लागेल.

सभापती महोदय, त्याचबरोबर श्री.दशरथ नरसिंग कांबळे यांच्याबरोबरही मला काम करण्याची संधी मिळाली. श्री.दशरथ कांबळे हे कोल्हापूर जिल्हयातील दलित समाजातील होते. ते अत्यंत कमी शिकलेले पण सामाजिक भान असलेले एक राजकीय नेते होते. त्यांच्या शैक्षणिक संस्था होत्या, त्यांनी ग्रामीण भागामध्ये काम केले होते. 1952 ते 1962 पर्यंत जिल्हा लोकल बोर्ड म्हणजे जिल्हा परिषदांच्या अगोदर होता, जिल्हा परिषदांचा अनुभव होता. त्यानंतर 1976 मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेमधून विधानपरिषदेवर निवडून आल्यावर लोकाभिमुख व जागृतपणे काम करणारा सदस्य म्हणून माननीय श्री.दशरथ कांबळे यांची आठवण या सभागृहाला आणि समाजाला सातत्याने राहील.

सभापती महोदय, जनरल माणेकशॉ यांच्याबद्दल अतिशय महत्वाचा उल्लेख करण्यात आला आहे. पद्मभूषण, पद्मविभूषण हे किताब त्यांना मिळाले होतेच. पण जनरल करिअप्पा यांच्यानंतर लष्करातील फिल्डमार्शल हा बहुमानाचा किताब त्यांना मिळाला होता. फिल्डमार्शल हे अतिशय शिस्तप्रिय, थोर देशभक्त सेनानी होते, ज्यांना 94 वर्षांचे आयुष्य लाभले. सगळयात महत्वाचे म्हणजे त्यांना जगाच्या इतिहासातील दुसरे महायुध्दही पाहता आले. त्यामध्ये भाग घेता आला. 8-9 हजार जपानी कैद्यांचे पुनर्वसन करता आले. म्हणून संवेदशनशील माणुसकी असलेला

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार.....

सेनानी म्हणून त्यांची आठवण सदैव राहील. यानिमित्ताने मी एक आठवण सांगू इच्छितो, 1971 साली पाकिस्तानच्या पराभवानंतर बांगला देशाची निर्मिती झाली. जगाच्या इतिहासामध्ये पहिले आणि दुसरे महायुध्द झाले होते. पण एकाच वेळी 1 लाख सैनिक शरणागती पत्करत आहेत अशी जगाच्या इतिहासामध्ये नोंद होणारा तो क्षण होता. ज्यादिवशी पाकिस्तानने शरणागती पत्करली ज्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी केलेला आहे. योगायोग असा की, 16 डिसेंबर, 1971 रोजी मी दिल्लीमध्ये एका मिटिंगसाठी गेलो होतो.

नंतर श्री.शिगम

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि मला स्पिकर गॅलरीचा पास मिळालेला होता. त्यावेळी पार्लमेंट चालू होती. मी स्पिकर गॅलरीमध्ये बसलो होतो. त्यावेळी तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी "पाकिस्तानने माघार घेतलेली आहे, शरणागती पत्करलेली आहे, भारताचा विजय झालेला आहे आणि 1 लाख सैन्य शरण आलेले आहे" अशा प्रकारची घोषणा केली. ती घोषणा मी त्या वेळी योगायोगाने स्पिकर गॅलरीमध्ये बसून ऐकली होती. त्यावेळी सभागृहामध्ये जनरल माणेकशॉ यांचा उल्लेख करण्यात आला होता . इतकेच नव्हे तर भारतातील सर्व वृत्तपत्रामध्ये किंबहुना जगातील सर्व वृत्तपत्रांमध्ये त्यांचा उल्लेख करण्यात आलेला होता. तुम्हा आम्हा सर्वांना वंदनीय असणारे आणि ज्यांच्या पासून स्फूर्ती घेऊन शिस्त, देशभक्ती आणि संवेदनशीलता हे गुण आपल्यामध्ये आत्मसात करावे असे एक अत्यंत भारदस्त व्यक्तिमत्व म्हणून जनरल माणेकशॉ यांना मी माझी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

भारताचे माजी सरन्यायायधीश श्री. चंद्रचूड यांचेही दु:खद निधन झालेले आहे. स्वातंत्र्यानंतर आतापर्यन्त सर्वाधिक काळ, जवळ जवळ 7 वर्षे, सुप्रीम कोर्टाचे मुख्य न्यायाधीश पद ज्यांनी सांभाळले ते न्यायमूर्ती चंद्रचूड हे कायद्याच्या बाबतीतमध्ये आणि कायद्याच्या माध्यमातून न्याय देत असताना कुठल्याही दबावाला नमले नाहीत. आता सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी उल्लेख केल्याप्रमाणे जनक्षोभ आणि सर्व जनतेची भावना असताना देखील कायद्याशी आणि न्यायाशी तडजोड करायची नाही ही भूमिका न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी वकील असताना आणि न्यायाधीश असतानाही अतिशय प्रामाणिकपणे सांभाळली. ते आमच्या पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील होते. त्यांचा जन्म जरी पुणे शहरात झालेला असला तरी केंदूर पाभळ नारायणगांव या ग्रामीण भागात त्यांचे बालपण गेलेले होते. म्हणून ही सर्व गावे न्यायमूर्ती चंद्रचूड यांच्या निधनानंतर एक दिवसाकरिता बंद ठेवण्यात आलेली होती. सर्व कायद्याचे कठोर पालन करीत असताना, समाजामध्ये विविध ठिकाणी विविध घटकांमध्ये काम करीत असताना, मग सकाळ वृत्तपत्र असेल, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान असेल किंवा अनेक सामाजिक शैक्षणिक संस्था असतील या सर्व ठिकाणी काम करीत असताना या माणसाने आपल्या आयुष्यातील, आपल्या मनातील,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. उल्हास पवार....)

आपल्या विचारातील आणि आपल्या जीवनशैलीतील रसिकता जपलेली होती. मी अतिशय प्रामाणिकपणे आणि आठवणीने येथे सांगतो की, महाराष्ट्राचे आताचे माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांना ते एकदा असे म्हणाले की, "विलासरावजी या महाराष्ट्रामध्ये कै. यशवंराव चव्हाण नावाचे मुख्यमंत्री होऊन गेले. ते राजकारण करीत होते. स्वातंत्र्यसेनानी होते. पण संगीत, कला यांना वाव देणारे संगीतप्रेमीही होते. ते अधूनमधून शास्त्रीय संगीताच्या बैठकी आणि मैफिली घ्यायचे आणि आमच्या सारख्याला बोलवायचे. त्यांची मी तुम्हाला फक्त आठवण करुन देतो." मोठ्या मुश्किलीने आणि गमतीने ते असे म्हणाले होते आणि योगायोगाने मी त्यावेळी तेथे हजर होतो. श्री. विलासराव देशमुख हसले आणि त्यानंतर त्यांनी पं. जसराज आणि इतरांच्या शास्त्रीय संगीताच्या 2 मैफिली घडवल्या आणि त्या प्रत्येक ठिकाणी न्यामूर्ती चंद्रचूड हे पहिल्या ओळीमध्ये बसून शास्त्रीय अभिजात संगीताला आणि त्या गीतांना अतिशय भरभरुन दाद देताना मी पाहिलेले आहेत. देशानेच काय, परंतु न्याय जगतामध्ये जगातील अनेक देशांनी ज्यांचा आदर्श आपल्या डोळयासमोर ठेवावा अशा न्यायमूर्ती यशवंतराव चंद्रचूड यांना मी माझी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

त्याचप्रमाणे नाना धर्माधिकारी हे देखील अतिशय थोर व्यक्तिमत्व. या ठिकाणी मला सांगितले पाहिजे की, योगायोगाने अनेक वेळा श्रध्देने त्यांच्या घरी जाण्याची संधी मला मिळाली. सन्माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांच्या बरोबरही ती मिळाली आणि त्याच्या आधी पासून मी सातत्याने त्याठिकाणी जात होतो. माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांना माहीत आहे की, खोपोलीला नाना धर्माधिकारी यांच्या दासांचा एक जाहीर मेळावा झाला. त्या मेळाव्याला जवळ जवळ 9 ते 10 लाख लोक उपस्थित होते. तो मेळावा संपल्याबरोबर आबांनी मला फोन केला आणि सांगितले की, कुठलेही निमंत्रण नसताना श्रध्दा आणि भक्तिभावाने इतके लोक येतात. 9 ते 10 लाख लोक त्या मेळाव्याला आले होते. कातकरी, आदिवासी असे सर्व समाजातील लोक मेळाव्याला आले होते. लौकिक अर्थाने कमी शिकलेली, न शिकलेली माणसे, पण दुस-या एकाही माणसाला त्रास होणार नाही इतक्या शिस्तीने त्यांची वाहने लावलेली होती. माणसे शिस्तीने 8-8 तास बसलेली होती. हालचाल नाही, आवाज नाही, गडबड नाही, गोंधळ

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. उल्हास पवार...)

नाही इतकी शिस्त त्या दासांमध्ये नाना धर्माधिकारी यांनी निर्माण केली. त्यांच्या महाड, खोपोली आणि पुण्याच्या फग्युर्सन कॉलेजमध्ये झालेल्या कार्यक्रमाच्या वेळी व्यासपीठावर त्यांचे दर्शन घेण्याचा आणि माझे मनोगत व्यक्त करण्याची संधी मला मिळाली आणि त्यांचे भरभरुन आशीर्वादही मिळाले. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे बुवागिरी किंवा स्वत:चे काही तरी अवडंबर माजवणे, याही पेक्षा सर्व सामान्य माणसांमध्ये समाजप्रबोधन करणे, व्यसनमुक्ती करणे असे अतिशय अफाट काम श्रध्देय नाना धर्माधिकारी यांनी केलेले आहे. त्यांना जेव्हा महाराष्ट्र भूषण पुरस्कार देण्याचे जाहीर करण्यात आले तेव्हा तो पुरस्कार देण्याचा समारंभ एखाद्या सभागृहात न करता अशाच प्रकारे 10लाख लोकांच्या उपस्थितीमध्ये करावा अशी दासांनी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती केली होती. तो समारंभ नोव्हेंबर महिन्यामध्ये होणार होता. परंतु दुर्दैवाने काळाने त्यांना अगोदरच आपल्यामधून नेलेले आहे. मी नाना धर्माधिकांनी यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार....

ज्येष्ठ गांधीवादी नेत्या श्रीमती निर्मलाताई देशपांडे यांचा आणि माझा परिचय गेल्या तीस वर्षापासून होता. राष्ट्रपिता महात्मा गांधीं यांनी 1932 साली अखिल भारतीय हरीजन सेवक संघ स्थापन केला, त्या संघाचे उपाध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी दीदी आणि कै.बाळासाहेब भारदे यांच्यामुळे मला मिळाली. जवळ जवळ सहा वर्ष या संघाचा मी उपाध्यक्ष होतो. या सदनातील सदस्य व माझे मित्र श्री. मोहन जोशी हे आजमितीला या संघाचे अध्यक्ष आहेत. ते दीदींमुळेच या संघाचे अध्यक्ष आहेत. दीदींनी 1952 मध्ये विनोबांच्या भूदान चळवळीत 40 हजार किलोमीटरच्या पदयात्रेत भाग घेतला होता. त्या विनोबाजींच्या बरोबर पायी फिरल्या. दीदींची बहीण आणि दीदी या दोघीही विनोबाजींच्या मानसकन्या होत्या. दोघी बहिणींनी लग्न केले नाही. दीदींचे पिताजी अतिशय मोठे जमीनदार होते, देशाभिमानी होते, उत्तम साहित्यिक होते, उत्तम विचारवंत होते, त्यांच्या पितांजींकडे या सर्व गोष्टी असताना दीदी विनोबाजी आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्याबरोबर काम करीत राहिल्या. त्यांनी त्यांची एक आठवण मला सांगितली, ती आठवण मी या ठिकाणी सांगू इच्छितो. ज्यावेळी भूदान यज्ञ सुरु झाला, भूदानासाठी विनोबाजी चालू लागले. ज्यावेळी माओत्से तुंगा यांना समजले की, लक्षावधी एकर जमीन लोक विनोबाजींना देत आहेत. त्यावेळी माओत्से तुगांनी विचारले की, मला येथे क्रांती करण्यासाठी रेड आर्मीची मदत घ्यावी लागली आणि वेगळा मार्ग पत्करावयास लागला तेव्हा कुठे चीन देशात क्रांती झाली पण तरी देखील ती क्रांती परिपूर्ण झ ाली नाही. या भारतामध्ये एक अशक्त माणूस, हाडकुळा माणूस, बरगडयाची हाडे मोजता येतील असा माणूस पायी चालला आहे आणि अशा माणसाला लक्षावधी एकर जमीन कशी काय मिळते आहे ? ही गोष्ट मला समजावून सांगा. याबाबत माओत्से तुंग यांनी आश्चर्य व्यक्त केले. ही आठवण आम्हाला दीदींनी सांगितली आहे. दीदी आम्हाला नेहमी सांगावयाच्या की, महात्मा गांधीचा प्रभाव अतिशय मोठा आहे. आजही जगातील 71 देशामध्ये महात्मा गांधी यांचा पुतळा आहे. 100 देशांमध्ये महात्मा गांधी यांचे स्मारक उभे राहिलेले आहे. कै.बाळासाहेब भारदे आणि दीदी नेहमी सांगावयाचे की, कदाचित राष्ट्रपिता महात्मा गांधींचा अहिंसेचा अर्थ जगातील अनेकांना कळला नाही. पण पहिले महायुध्द, दुसरे महायुध्द, त्यानंतर जगात वाढत चाललेला दहशतवाद, हींसावाद, 11सप्टेबर रोजी अमेरिकेत घडलेली घटना यानंतर मात्र त्यांना गांधीचा अहिंसेचा अर्थ कळला. त्यांना अहिंसेचा अर्थ कळला नसेल, पण हिंसेचा अनर्थ

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार...

मात्र त्यांना कळला आणि म्हणून त्यांनी तो मार्ग स्वीकारला असे दीदींनी आम्हाला समजावून सांगितले होते. दीदी नेहमी म्हणावयाच्या की, महात्मा गांधीनी आणि विनोबाजींनी आम्हाला शिकविले आहे की, शांती आणि क्रांती या दोन्ही गोष्टी हातात हात घालून नांदल्या पाहिजेत आणि ख-या अर्थाने मानवतावादाचा उदय झाला पाहिजे. सातत्याने शेवटच्या क्षणापर्यंत असे सांगणा-या श्रीमती निर्मलादीदी आपल्यातून निघून गेल्यात, त्यांना देखील मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

साहित्यकार, नाटककार, पत्रकार, चित्रकार, व्यंगकार अशा विविध माध्यमात काम करणारे व्यक्तिमत्व म्हणून श्री.विजय तेंडुलकर यांचा उल्लेख आपल्याला आवर्जून करावा लागेल. श्री.विजय तेंडुलकरही आपल्यातून निघून गेले आहेत. त्यांना देखील मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे शोकप्रस्तावावरील मनोगत पूर्ण करतो. .

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे (अपारंपारिक ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, या सदनाचे माजी वि.प.स. व मंत्री श्री. बाजीराव निवृत्ती शिंदे, तसेच माझ्या कोल्हापूर जिल्हयातून या सदनात काम करणारे माजी विधान परिषद सदस्य श्री. दशरथ नरसिंग कांबळे, फिल्डमार्शल सॅम माणेकशॉ, भारताचे माजी सरन्यायाधीश श्री. यशवंतराव चंद्रचूड, ज्येष्ठ गांधीवादी नेत्या श्रीमती निर्मलाताई देशपांडे, ज्येष्ठ साहित्यिक व सुप्रसिध्द नाटककार श्री.विजय तेंडुलकर, ज्येष्ठ निरपणकार, ज्यांना आपण महाराष्ट्र भूषण पुरस्कार दिलेले नानासाहेब धर्माधिकारी यांच्या दु:खद निधनाबद्दलचा शोकप्रस्ताव सभागृहात मांडण्यात आलेला आहे. या शोकप्रस्तावावर माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी आणि त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी मी उभा आहे.

श्री. दशरथ नरसिंग कांबळे, माजी वि.प.स. हे कोल्हापूर जिल्हयातील शिरोळ तालुक्यात जन्माला आले. राजश्री शाहू महाराजांचा विचारांचा प्रभाव असणारा एक कार्यकर्ता होता. खरे तर ज्या काळात या समाजातील लोक सामाजिक क्षेत्रात पुढे येत नव्हती, त्या काळात सामाजिक क्षेत्रात सक्रीय होणे, शिक्षणाचा प्रसार करणे, गावातील पाणी पुरवठा संस्था ही सहकारी तत्वावर चालू शकते अशा प्रकारची विचारधारा मांडणे, लोकल बोर्डापासून ते जिल्हयातील सहकारी संघाचे नेतृत्व करण्याचे काम करणे आणि संपूर्ण जिल्हयातून महाराष्ट्राला एक ध्येयवादी विचारधारा देणारा कार्यकर्ता म्हणून स्वत:ची ओळख निर्माण करणे, असे एक आगळे वेगळे काम या कार्यकर्त्याने महाराष्ट्रासाठी केलेले आहे. श्री. दशरथ नरसिंग कांबळे यांच्या दु:खद निधनाबद्दल मी मनापासून श्रध्दांजली अर्पण करतो.

फिल्डमार्शल सॅम माणेकशॉ यांच्याबद्दल सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत....

यानंतर श्री. कानडे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खरे तर फील्ड मार्शल माणेकशॉ यांच्याबद्दल याठिकाणी मी एवढेच म्हणेन की, 10 वर्षापूर्वी वारणानगर येथे आमंत्रित करण्याचा योग आला होता व त्यावेळी त्यांनी वारणानगर मधील सगळया कार्यकर्त्यांच्या आणि मुलांच्यासमोर त्यांचे आयुष्य कशा प्रकारे घडले आणि कशा प्रकारे या देशाचे लष्करप्रमुख म्हणून काम केले याबद्दलच्या भावना त्यांनी व्यक्त कराव्यात अशा प्रकारची विनंती केली होती. सभापती महोदय, मला याठिकाणी सांगितले पाहिजे की, भारत देशामध्ये लष्कराच्या माध्यमातून जेवढया काही गोष्टी झाल्या त्या सगळया गोष्टींचा साक्षीदार असणारा कदाचित एकमेव लष्करप्रमुख या देशाला लाभला असेल. बांग्ला देशाच्या स्वातंत्र्य युध्दाची चर्चा झाली. या युध्दाची चर्चा करीत असताना खरे तर देशाच्या पंतप्रधान कै.श्रीमती इंदिरा गांधी आणि देशाचे लष्करप्रमुख किती संवेदनशील निर्णय कशा प्रकारे त्या काळात घेत असतात आणि किती मोठे विश्वासाचे नाते तसेच प्रामाणिक नाते देशाचे प्रतिनिधीत्व सरहद्दीवर करीत असताना यशस्वीपणे पुढे नेत असते याचा एक मोठा अनुभव घेतलेले लष्करप्रमुख आपल्यातून निघून गेले आहेत.

सभापती महोदय, खरे तर कै.यशवंतराव चंद्रचूड साहेबांचा आणि माझा व्यक्तिगत कामाबद्दल फारसा संबंध आला नाही. परंतु महाराष्ट्राच्या भूमितून कायद्याच्या क्षेत्रात देशाला एक मोठे योगदान देणारा कर्मयोगी आपल्यातून हरपला आहे.

सभापती महोदय, कै.नानासाहेब धर्माधिकारी यांच्याबद्दल बोलले पाहिजे. विशेषत: कोकण परिसरात आगरी समाजात असणारे शिक्षणाचे मागासलेपण,व्यसनाधिनता या माध्यमातून त्यांनी सुरु केलेले काम अखंडपणे चालू ठेवले. खरे तर महाराष्ट्रात दासबोधाच्या माध्यमातून सत्संगाच्या बैठकी निर्माण व्हाव्यात, चांगला समाज घडावा यासाठी लोकांना मोटिव्हेशन दिले पाहिजे याची तुलना कोणत्याही गोष्टीबरोबर करता येत नाही. सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी उल्लेख केल्याप्रमाणे 10-12 लाख माणसे स्वत:च्या वाहनातून शिस्तीने येतात आणि निरुपण संपल्यानंतर त्याठिकाणी कोणता कार्यक्रम झालाच नाही असा प्रश्न पडावा इतकी स्वच्छता करुन पुन्हा शिस्तीने आपल्या घरी जाऊन प्रत्यक्षपणे त्या भागात आणि आपल्या गावात बैठकीच्या रुपाने समाजात आणि जास्तीत जास्त लोकांपर्यंत विचार पोहोचवितात. म्हणजे महाराष्ट्राच्या भूमीला त्यांच्या हातून अर्पण झालेले मोठे आध्यात्मिक कार्य आहे असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. राज्य चालवीत असताना अशा प्रकारे समाजाला दिशा देणारी आणि समाज उभा करणारी माणसे

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जन्माला येतात म्हणून एखादा प्रदेश आणि राज्य प्रगती करतो. महाराष्ट्राच्या सगळया जडण-घडणीत आणि वाटचालीत नानासाहेब धर्माधिकारी यांनी दिलेले योगदान मोजता येणार नाही. असा एक महान कर्मयोगी आपल्यातून निघून गेला आहे. या सगळयाच महनीय व्यक्तिना मी मनापासून श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

सभापती : सदनाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये एक निर्णय एकमताने घेतला आहे की, शोक प्रस्तावाच्या बाबतीत सदनाचे नेते, माननीय विरोधी पक्षनेते, सन्माननीय गटनेते या मर्यादेपर्यंत भाषणे होतील. एखादा अपवाद असेल तर मी त्या अपवादात्मक परिस्थितीमध्ये एखाद-दुसऱ्या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची परवानगी देईन. आज महनीय व्यक्तिसंबंधी शोक प्रस्ताव असल्यामुळे मी 2/3 सन्माननीय सदस्यांना बोलण्याची परवानगी दिलेली आहे. बोलण्याच्या परवानगीसाठी एकच नांव माझ्याकडे आलेले आहे. बोलण्याची परवानगी मागण्यासाठी माझ्याकडे सन्माननीय सदस्याचे नांव येणे महत्वाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री. नवले बोलण्याची परवानगी मागत आहेत असे दिसते. मी त्यांना सांगू इच्छितो की,He is well experienced.

नंतर श्री.भोगले

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (नामनियुक्त) : माननीय सभापती महोदय, सभागृहाच्या नेत्यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावावर माझे विचार प्रकट करावेत आणि सहभागी व्हावे म्हणून मी थोडावेळ बोलावयास घेत आहे. जी मंडळी आज आपल्यामध्ये नाहीत त्यांचे कार्यक्षेत्र जर नजरेसमोर आणले तर एक एक उत्तुंग आकाश, आपल्या नजरेत मावणार नाही इतके मोठे काम या व्यक्तिच्या हातून घडलेले आपल्या लक्षात येईल. एका नाटककाराचे नाटक होते, 'नाटककाराच्या शोधात सहा पात्रे'. या महान व्यक्ती आपल्या सर्वसामान्यांच्या आयुष्यात त्या विविध नाटकातील 6 पात्रांसारख्या आपल्या अवतीभोवती फिरत आहेत असे वाटते. प्रत्येकाच्या कर्तृत्वाचे क्षेत्र वेगळे, त्यांच्यामागे असणारा समूह वेगळा परंतु एकूणच समाज जीवनातील वाईट गोष्टी दूर केल्या पाहिजेत आणि समाज प्रगतीच्या पथावर जाताना तो सन्मार्गी लावला पाहिजे, मग तो मार्ग अध्यात्माचा, लष्करी शिस्तीचा, न्यायदानाचा असेल किंवा साहित्यकृतीचा असेल या सर्व माध्यमातून ज्यांनी अशी कामगिरी केली की, ज्यामुळे त्यांच्या जाण्याने कुठेतरी सामान्य माणसाला सुध्दा रुखरुख वाटल्याशिवाय रहात नाही, असे हे व्यक्तिमत्व आपल्या क्षेत्रात तळपत असताना खराखुरा सलाम करावा अशी कामगिरी, अशी सेवा त्यांच्या हातून या देशाची घडलेली आहे म्हणून त्यांच्याबद्दलची भावना व्यक्त करताना आपल्या कृतज्ञतेच्या पलिकडे कोणताही भाव मनामध्ये आणता येत नाही. गांधीवादाचे विचार, लष्करी शिस्त असेल किंवा नाटकाच्या माध्यमातून समाजातील विकृतीवर आसूड ओढण्याची ताकद असेल या सर्व माध्यमांचा, आपल्या हाती आलेल्या साधनांचा अतिशय योग्य पध्दतीने वापर करुन समाज जीवन अधिक चांगले करण्यासाठी आणि सगळ्यांना श्रध्दांजली वाहणे ही महाराष्ट्राचे प्रातिनिधीक म्हणून दोन्ही सभागृहाची कर्तव्यपूर्तता आहे असे मला वाटते. एका अर्थाने हे सगळे त्यांचे कार्य पुढील पिढीला, आपल्यासह सर्वांना मार्गदर्शक असे ठरणारे आहे. हे आकाशातील तारे होते, काही काळ जमिनीवर आले, आपल्यामध्ये वावरले आणि पुन्हा एकदा आकाशस्थ झाले. म्हणून एकदा या सगळ्यांना कृतज्ञतेचा नमस्कार करुन श्रध्दांजली वाहू या, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सभागृहाचे नेते सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील साहेब यांनी श्री.बाजीराव निवृत्ती शिंदे, माजी वि.प.स. व मंत्री, श्री.दशरथ नरसिंग कांबळे, माजी वि.प.स., फिल्डमार्शल सॅम माणेकशा, भारताचे माजी सरन्यायाधीश श्री.यशवंतराव चंद्रचूड, ज्येष्ठ गांधीवादी नेत्या श्रीमती निर्मला देशपांडे, ज्येष्ठ साहित्यिक व सुप्रसिध्द नाटककार श्री.विजय तेंडूलकर व ज्येष्ठ निरुपणकार श्री.नानासाहेब धर्माधिकारी यांच्या दु:खद निधनाबद्दल या सभागृहामध्ये जो शोकप्रस्ताव मांडला आहे आणि विरोधी पक्षनेते व अन्य गटनेते आणि सदनाच्या दोन्ही बाजुच्या सन्माननीय आपल्या भावना व्यक्त करुन याठिकाणी जी श्रध्दांजली वाहिली त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मी माझ्या भावना या ठिकाणी व्यक्त करतो.

सन्माननीय कै.बाजीराव शिंदे आणि मी, दोघेही 1983 ते 1985 या काळात राज्याच्या मंत्रिमंडळामध्ये राज्यमंत्री म्हणून काम करणारे कार्यकर्ते होतो. एक अत्यंत सालस व्यक्तिमत्व, परखड विचाराचा ध्येयवादी कार्यकर्ता, परिस्थिती समोर असताना सुध्दा सामान्य माणसाकरीता सातत्याने असणारी धडपड या अनुषंगाने मी त्यांना अत्यंत जवळून पाहिले होते. 1982 व 1988 मध्ये महाराष्ट्र विधानसभेच्या माध्यमातून ते विधानसभा सभागृहाचे सदस्य म्हणून दोन वेळा निवडून आले होते. महाराष्ट्रामध्ये आणि विशेषत: नांदेड जिल्हयामध्ये त्यांनी काँग्रेसच्या माध्यमातून सातत्याने कार्य केलेले आहे. नांदेड नगरपालिकेचे सदस्य, नांदेड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सहअध्यक्ष या पध्दतीने काँग्रेसच्या नेतृत्वामध्ये काम करीत असताना एक सामान्य कार्यकर्ता किती मोठा होऊ शकतो याचे एक आगळेवेगळे व्यक्तिमत्व यादृष्टीने त्यांच्याकडे आम्ही अनेक कार्यकर्ते पहात होतो.

(नंतर श्री.खर्चे...

अशुध्दीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

सभापती .....

कोल्हापूर जिल्ह्याचे सुपूत्र आणि ज्यांचा उल्लेख अभिमानाने करीत असताना माननीय मंत्री महोदय, श्री. विनय कोरे साहेबांनी येथे सांगितले. सन 1950,1952,1954 या काळात मी कोल्हापूर जिल्ह्यातील विद्यार्थी होतो. त्यानंतर सांगली जिल्ह्यातील विद्यार्थी होतो. श्री. दशरथ कांबळे हे सन 1952 मध्ये लोकल बोर्डाचे सन्माननीय सदस्य होते. त्यानंतरच्या काळात जिल्हापरिषदेचे सदस्य म्हणून त्यांनी काम केले. माननीय मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व नेते मंडळींचा अत्यंत जिवाभावाचा कार्यकर्ता यादृष्टीने ज्या व्यक्तिला आपण पाहत होतो ते श्री. दशरथ कांबळे किमान 40 वर्षे अत्यंत परखड विचारांचे, ध्येयनिष्ठ, अत्यंत प्रामाणिक, गरीब परिस्थिती असताना सुध्दा स्वाभिमानाला यत्किंचितही धक्का न लागू देणारे अशा प्रकारचे कार्यकर्ते आयुष्याच्या शेवटपर्यंत जसे होते तसेच राहिले. दोन वर्षापूर्वी श्री. कांबळे माझ्याकडे आले होते. त्यांनी माझ्याकडे दोन-तीन कामे दिली होती. त्यातील दोन कामे झाली. दुर्दैवाने एक किरकोळ काम, जे त्यांच्या दृष्टीने, त्यांचा विचार करता एवढे कठीण सुध्दा नव्हते ते काम मात्र होऊ शकले नाही. ते काम म्हणजे असे होते की, श्री. कांबळे यांची "दलित मित्र" होण्याची इच्छा होती, अशा स्वरुपाचे होते. ते मात्र मला पूर्ण करता आले नाही ही अगतिकता आज सुध्दा माझ्या मनात आहे. ज्या कोल्हापूर जिल्ह्याने सन 1952 पासून श्री. दशरथ कांबळे यांचे लालनपालन केले, वाढविले परंतु आजतागायत ते दलित मित्र होऊ शकले नव्हते, ही खंत आहे.

त्याचबरोबर फिल्डमार्शल सॅम माणेकशॉ यांच्याबद्दल बोलत असताना लढवय्या परंपरेतील महाराष्ट्र आणि या अनुषंगाने ज्या विभुतींच्या बाबतीत संपूर्ण देशाला अभिमान वाटतो अशा प्रकारचे माणेकशॉ यांचे व्यतिमत्व होते. माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर किंवा उल्हास पवार यांनी सांगितल्यानुसार फिल्डमार्शल हे सन 1932 मध्ये एक तरुण भारतीय लष्करी अधिकारी म्हणून नियुक्त झाले होते. सन 1939-40 च्या दरम्यान दुसऱ्या महायुध्दात श्री. माणेकशॉ जबरदस्त जखमी झाले होते, त्यांना पोटात किमान आठ-दहा गोळ्या लागल्या होत्या. त्यावेळेस अनेक लोकांना असे वाटत होते की, हा अधिकारी वाचण्याची शक्यता नाही. माझ्या माहितीप्रमाणे त्यावेळेस त्यांना सर्व आघाड्यांवरुन परत पाठवून उपचारासाठी एका चांगल्या लष्करी दवाखान्यात आणले. तीन-चार महिने ते दवाखान्यात राहिले आणि सुदैवाने वाचले म्हणूनच श्री.माणेकशॉ हे

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

भारताच्या लष्करातील अत्यंत उत्कृष्ट पध्दतीचे फिल्डमार्शल होऊ शकले. बांगला देशाबरोबर झालेल्या युध्दाच्या वेळची परिस्थिती सांगताना माननीय उप मुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील, माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख आणि माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी अनेक गोष्टींचा उल्लेख केला. जनरल अरोरांचे नाव सुध्दा माझ्या कानात सातत्याने आहे. खऱ्या अर्थाने त्यांनी ती लढाई लढली आणि त्या हल्ल्यासाठी फिल्डमार्शल श्री. माणेकशॉ यांच्या अष्टपैलू नेतृत्वाखाली अत्यंत चांगल्या प्रकारची आखणी केली. अत्यंत कमी वेगात ज्या ठिकाणी हल्ला करावयाचा आहे अशा ठिकाणी चांगल्या प्रकारे आखणी करुन बांगला देशावर हल्ला करुन ती मोहीम पूर्ण केली. त्यावेळी ज्या पध्दतीची युध्द आखणी त्यांनी केली ती अत्यंत चांगली झाली होती. त्याचबरोबर स्व. इंदिरा गांधींचे धीरोदात्त नेतृत्व त्यावेळच्या पेपरमध्ये अनेक वेळा आपण वाचत होतो. त्यावेळेस एक दृढनिश्चय करुन एक निर्णायक अशा प्रकारचा हा हल्ला केला होता.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ....

एक लाख पाकिस्तानी सैन्याला गिरफ्तार करण्याचा पराक्रम भारतीय सैन्याने करुन दाखवलेला आहे खरे म्हणजे ते जगातील एक आश्चर्यच आहे. या विजयाला जागतिक आणि ऐतिहासिक किर्तीचा विजय म्हणावा लागेल. अशा या विजयाचे मानकरी फिल्डमार्शल सॅम माणेकशॉ आज आपल्यातून निघून गेलेले आहे. भारतामध्ये एकूण दोन फिल्डमार्शल झालेले आहेत असा या ठिकाणी जो उल्लेख झालेला आहे तो बरोबर आहे. भारताचे पहिले सरसेनापती फिल्ड मार्शल के.एम. करिअप्पा होते. ते 1952 मध्ये निवृत्त झाल्यानंतर प्रत्यक्ष आघाडीवर लढणारे फिल्डमार्शल सॅम माणेकशॉ झाले. फिल्डमार्शल सॅम माणेकशॉ हे एक खरे लढवय्ये होते. अशा या लढवय्या फिल्डमार्शलला आपण या ठिकाणी श्रध्दांजली वाहत आहोत. ही श्रध्दांजली वाहत असतांना माझी महाराष्ट्रातील तरुण पिढीला विनंती आहे की, महाराष्ट्राची एक लढवय्यी परंपरा आहे. त्यामुळे या पुढील काळात महाराष्ट्राची लढवय्यी परंपरा अशीच चालू रहाणे आवश्यक आहे.

स्वर्गीय यशवंतराव चंद्रचूड यांच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. ते अतिशय कुशाग्र बुध्दीचे होते. त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केल्यानंतर मुंबई उच्च न्यायालयामध्ये, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश नंतर सर्वोच्च न्यायालयाचे सर न्यायाधीश म्हणून त्यांनी सात-साडेसात वर्षे काम केले होते. देशातील न्याय व्यवस्थेसंदर्भात अतिशय परखडपणाने वळण लावण्याच्या दृष्टीने आणि सर्वसामान्य समाजाला, गरीब जनतेला न्याय मिळण्याच्या दृष्टीने काय करणे गरजेचे आहे याचा सातत्याने ध्यास घेतला होता. असे एक थोर व्यक्तिमत्व 14 जुलै, 2008 रोजी आपल्यातून निघून गेले आहेत. कुशाग्र बुध्दिमत्ता आणि न्यायदानाच्या क्षेत्रात संपूर्ण देशासाठी त्यांनी अत्यंत उत्कृष्ट काम केले होते. अशा थोर व्यक्तीला मी श्रध्दांजली वाहतो.

ज्येष्ठ गांधीवादी नेत्या श्रीमती निर्मला देशपांडे यांच्याशी माझी अनेक वेळा एकत्रित चर्चा होत होती त्यामध्ये आम्ही अनेक विषयावर चर्चा करीत होतो. काम करीत असतांना ध्येयवादाने प्रेरित झाल्यानंतर कोणत्या पध्दतीने कार्यकर्त्यांनी काम करावे असे एक आदरणीय व्यक्तिमत्व म्हणून निर्मलाताई देशपांडे यांच्याकडे पाहणे गरजेचे आहे. भूदान चळवळीमध्ये त्यांनी सातत्याने स्वर्गीय विनोबा भावे यांना साथ दिली होती, त्याच पध्दतीने त्यांनी नंतरच्या काळात सुध्दा अखंड

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

पध्दतीने त्यांनी देशामध्ये आणि अन्य ठिकाणी शांततेच्या माध्यमातून महात्मा गांधीजींचे जे काम होते ते सातत्याने केलेले आहे. महाराष्ट्राच्या कन्येने अशा प्रकारे केलेले काम संपूर्ण देशाला अभिमानास्पद आहे. त्यांच्याकडून जी कामे अपूर्ण राहिलेली आहेत ती पूर्ण करावी लागणार आहेत. निर्मलाताईंचे दु:खद निधन 1 मे, 2008 रोजी झाले त्यांनाही मी श्रध्दांजली वाहतो.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय सभापती ..

ज्येष्ठ साहित्यिक आणि सुप्रसिध्द नाटककार स्वर्गीय विजय धोंडूपंत तेंडुलकर यांचा जन्म कोल्हापूर येथे 6 जानेवारी 1928 रोजी झाला होता. 1942 सालच्या स्वातंत्र्य लढयात सक्रिय भाग घेतलेले ते एक व्यक्तिमत्व होते व त्या अनुषंगाने त्यांनी आपल्या जीवनास सुरुवात केली होती. अशा प्रकारे त्यांच्या संदर्भातील एका गोष्टीचा मला अभिमानाने उल्लेख करावासा वाटतो. नंतरच्या काळात "नवभारत " व "मराठा" या वृत्तपत्राचे उपसंपादक , "लोकसत्ता" या वर्तमानपत्राचे सह संपादक म्हणूनही त्यांनी काम केलेले होते. महाराष्ट्रातील अत्यंत परखड विचारांचे व्यक्तिमत्व म्हणून कै. तेंडुलकर यांच्याकडे पहावे लागेल. एक ज्येष्ठ साहित्यिक, सुप्रसिध्द नाटककार, पटकथाकार, पत्रकार, सामाजिक समीक्षक अशा वेगवेगळया माध्यमातून कै. विजय तेंडुलकर यांना संपूर्ण महाराष्ट्र ओळखत होता. संगीत - नाटक अकादमी पुरस्कार, कमलादेवी चटोपाध्याय पुरस्कार, राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, फिल्म फेअर कथा व पटकथा पुरस्कार, पद्मभूषण पुरस्कार, महाराष्ट्र गौरव पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले होते. या ज्येष्ठ साहित्यिक आणि सुप्रसिध्द नाटककाराचे दु:खद निधन 18 मे 2008 रोजी झाले आहे. त्यांना मी श्रध्दांजली वाहतो.

ज्येष्ठ निरुपणकार आणि ज्येष्ठ संतश्रेष्ठ नानासाहेब धर्माधिकारी यांचे दु:खद निधन झाले आहे. त्यांनी महाराष्ट्रात विशेषत: कोकणातील रायगड जिल्हयात सर्व सामान्य समाजात व्यसनमुक्तीचे काम केले , ते क्रांतिकारक काम होते असेच म्हणावे लागेल. तरुणांमधील शक्ती विधायक दृष्टीने वापरण्यात आली पाहिजे, ध्येय गाठण्याच्या दृष्टीने सातत्याने त्यानी प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे, अध्यात्माच्या माध्यमातून त्या तरुणांना अचूक पध्दतीने मार्गदर्शन मिळाले पाहिजे यासाठी कै नानासाहेब धर्माधिकारी यांनी समाजावर, विशेषत: तरुण पिढीवर चांगल्या प्रकारचे संस्कार केले होते. सात आठ लाख भाविक त्यांच्याकडे येत असत आणि अनेक तास तेथे राहत असत. त्याचबरोबर कै. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या विचाराबरहुकूम आपले जीवन व्यतीत करण्याचा प्रयत्न करीत असत. हेच कै. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जीवनाचे सार होते असे मानावे लागेल. या सर्व महनीय व्यक्तिंना मी व्यक्तिगत श्रध्दांजली वाहतो . सन्माननीय सभासदांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा, अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय सभापती ..

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबियांकडे पाठविण्यात येईल.

सभागृहाचे कामकाज मी पंधरा मिनिटांकरिता स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक 3.03 ते 3.18 स्थगित झाली)

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर ....)

सभापतीस्थानी - माननीय उपसभापती

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सभागृहाची बैठक सुरू होत आहे. परंतु सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत. ... खरे तर राज्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा विषय येथे चर्चेला येत आहे ...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, दुष्काळा सारख्या महत्त्वाच्या प्रश्नावर आम्ही येथे चर्चा उपस्थित करताना शासनाचा एकही कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित राहू नये यातूनच शासनाची या प्रश्नाकडे पाहण्याची दृष्टी कशी आहे ते दाखवून देत आहे. शासनाला या विषयाचे गांभीर्य नाही हेच यातून दिसून येते आहे. ...

उपसभापती : दुष्काळासारख्या महत्त्वाचा प्रश्न सभागृहात चर्चेला येत असताना शासनाचे मंत्री सभागृहात उपस्थित राहणे आवश्यक आहे. सभागृहात कोणीही कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्याने मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक 3.22 वाजता 10 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

(यानंतर श्री. सरफरे .... एए 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

हरकतीच्या मुद्दयासंबंधी

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहामध्ये काय चालले आहे? राज्याच्या दृष्टीने अत्यंत गंभीर अशा विषयावरील प्रस्तावावर आता चर्चा सुरु होणार आहे. संपूर्ण राज्यामध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली आहे. अशा परिस्थितीत सभागृहामध्ये ज्यावेळी चर्चा उपस्थित करण्यात येते त्यावेळी राज्याचे महसूल मंत्र्यांनी सभागृहात उपस्थित असणे आवश्यक आहे. या चर्चेमधून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उपस्थित होणार असल्यामुळे ग्राम विकास मंत्र्यांनी सुध्दा उपस्थित असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण होणार आहे, रोजगाराचा प्रश्न निर्माण होणार आहे.त्यामुळे संबंधित सर्व खात्याच्या मंत्र्यांनी चर्चेच्या वेळी सभागृहात उपस्थित असणे आवश्यक आहे. तेव्हा सरकार जर या विषयामध्ये गंभीर राहणार नसेल तर या प्रस्तावावर आम्ही भाषण करणार नाही. आज तरी हा प्रस्ताव आम्ही मांडू इच्छित नाही. तेव्हा याठिकाणी संबंधित सर्व खात्याच्या मंत्र्यांना बोलाविण्यात आले पाहिजे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, अधिवेशनातील आजचा कामकाजाचा पहिला दिवस आहे. आणि आज माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीसंबंधी जो प्रस्ताव मांडला आहे तो शासनाने स्वीकारला आहे. आणि त्या प्रस्तावावर आजच चर्चा होणार आहे. सभापती महोदय, मघाशी सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या मागणीवरुन सभागृहाचे कामकाज स्थगित करण्यात आले. त्यावेळी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी कॅबिनेट मंत्र्यांचा आग्रह धरला होता. आणि आता सभागृहामध्ये माननीय कॅबिनेट मंत्री श्री. रामराजे नाईक निंबाळकर उपस्थित असतांना प्रस्तावाशी संबंधित असलेल्या खात्याच्या मंत्र्यांनीच उपस्थित असले पाहिजे अन्यथा आजची चर्चा उद्या ठेवावी अशाप्रकारचा आग्रह त्यांच्याकडून धरला जात आहे. याचा अर्थ असा की, त्यांची या प्रस्तावावरील चर्चेला तयारी नाही. एकीकडे सरकार चर्चेला तयार होत नाही अशाप्रकारचा आरोप केला जातो. आणि आता तर विरोधी पक्षाची चर्चा करण्याची तयारी दिसत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आम्ही चर्चा करण्यास तयार आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी आता जे वक्तव्य केले ते चुकीचे आहे. या सभागृहामध्ये किमान एकही कॅबिनेट मंत्री उपस्थित नसेल तर सभागृहाचे कामकाज चालत नाही. त्याचप्रमाणे या प्रस्तावाशी संबंधित असलेल्या मंत्र्यांनी सभागृहात उपस्थित राहिले पाहिजे यासाठी आमचा आग्रह आहे. तेव्हा याबाबतची कार्यपध्दती माननीय सदस्यांना माहित असली पाहिजे. सरकारची बाजू कधी घ्यावयाची आणि कधी घ्यावयाची नाही याचे तारतम्य आपण बाळगावे. दुसरे असे की, या राज्यामध्ये मंत्री बनण्यासाठी गल्लीपासून दिल्लीपर्यंत सारखी घासफूस चालू आहे. सारख्या विमानाने दिल्लीवाऱ्या केल्यामुळे विमाने सुध्दा झिजली आहेत. मंत्रिमंडळामध्ये केव्हा वाढ होणार आहे याकडे सर्वजण डोळे लावून बसले आहेत. आणि माननीय मुख्यमंत्री मंत्रिमंडळामध्ये वाढ करण्यास घाबरत आहेत. तेव्हा एकीकडे मंत्री होण्यासाठी स्पर्धा लागलेली असतांना या सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री आणि राज्यमंत्री उपस्थित नाहीत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . ..

विधानसभेमध्ये निम्म्या कॅबिनेट मंत्री महोदयांनी उपस्थित रहावे आणि निम्म्या मंत्री महोदयांनी विधान परिषदेमध्ये उपस्थित रहावे. मी या विषयाशी संबंधित असलेल्या मंत्री महोदयांबद्दल बोलत आहे. काही माननीय राज्यमंत्र्यांनी उपस्थित रहावे. पण तुम्ही जर विधान परिषदेला गृहीत धरणार असाल आणि या सदनातील चर्चेला किंमत देणार नसाल तर ते बरोबर नाही. या चर्चेच्या संबंधात आम्ही सामुदायिक जबाबदारी वगैरे ही बाब स्विकारण्यास तयार नाही. महाराष्ट्रामध्ये भीषण प्रश्न निर्माण झालेला आहे आणि राज्यकर्त्यांना त्याची जाणीव आहे. जेव्हा अधिवेशन सुरु होईल, त्या दिवशी या प्रश्नाच्या बाबतीत निश्चितपणे विरोधी पक्षाकडून चर्चेची मागणी केली जाणार आहे आणि सभागृह सुरु होत असताना शासनाने स्वत:ची तशा प्रकारची मानसिकताही तयार केली होती की, आपल्याला ही चर्चा स्विकारावी लागणार आहे. हा अतिशय गंभीर विषय आहे आणि त्याबाबतीत शासनाचीही मानसिकता तयार झालेली असताना जर येथे सन्माननीय मंत्री महोदय उपस्थित रहात नसतील आणि केवळ आपली मंत्रीपदाची झूल सांभाळावयाची आहे, त्यांना जर जबाबदारी वाटत नसेल तर त्यांनी आपल्या पदाचे राजीनामे द्यावेत. त्यांची या सभागृहामध्ये येऊन आपली जबाबदारी स्विकारण्याची इच्छा नसेल तर हे बरोबर नाही. हा या सदनाचा, जनतेचा अपमान आहे आणि मंत्रिमंडळाचा देखील अपमान आहे.

श्री.रामराजे नाईक निंबाळकर : सभापती महोदय, विधानसभेमध्ये याच विषयावर आता चर्चा सुरु आहे. त्यामुळे सर्व मंत्री महोदय तेथे अडकलेले आहेत.

श्री.दिवाकर रावते : मग संबंधित माननीय राज्यमंत्री कुठे आहेत ?

श्री.रामराजे नाईक निंबाळकर : सभापती महोदय, जर सरकारला हा विषय गांभीर्याने घ्यावयाचा नसता तर ही चर्चा घेण्यासाठी मान्यता दिलीच नसती. सरकारनेच या विषयावर आज चर्चा घेण्यासाठी मान्यता दिलेली आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, नियम 289 अन्वये दोन प्रस्ताव देण्यात आले होते आणि ते आपण क्लब केलेले आहे. मी या विषयावर एक प्रस्ताव दिला होता आणि माननीय विरोधी पक्षनेते, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी दुसरा प्रस्ताव दिला होता. याठिकाणी कर्जमाफीच्या बाबतीत मागच्या अधिवेशनामध्ये जे धोरण जाहीर केले आणि त्याबाबतीत जबाबदारी

. . . .2 बी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

देखील स्विकारली होती, त्यासंबंधात मी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला होता. परंतु सहकार विभागाशी संबंधित कोणीही मंत्री येथे उपस्थित नाहीत. माननीय मंत्री श्री.रामराजे नाईक निंबाळकर हे सहकार खात्याच्या बाबतीत उत्तर देऊ शकणार नाहीत. राज्यामध्ये कर्जमाफीच्या बाबतीत गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे, शेतकऱ्यांची फसवणूक होत आहे. त्यामुळे आपण आज सभागृहाचे कामकाज येथेच थांबवावे, ही चर्चा थांबवावी. याठिकाणी शासनाला समजले पाहिजे. माननीय श्री.पांडुरंग फुंडकर साहेब, शासन ही बाब गांभीर्याने घेत नाही, तशा प्रकारे वागत नाही असा मेसेज कोणत्याही परिस्थितीमध्ये गेला पाहिजे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय,महाराष्ट्रातील दुष्काळाच्या संबंधातील हा प्रस्ताव सर्वव्यापी आहे. याठिकाणी दोन प्रस्ताव क्लब केले आहेत. शेतकऱ्यांची कर्जमाफी, राज्यामध्ये न पडलेला पाऊस आणि त्यामुळे निर्माण झालेली दुष्काळाची परिस्थिती, पिण्याच्या पाण्याची टंचाई, त्याच बरोबर खताची टंचाई निर्माण झालेली आहे. आता सदनामध्ये माननीय कृषी मंत्री उपस्थित नाहीत. अशा वेळी माननीय मंत्री श्री.रामराजे नाईक निंबाळकर हे खताच्या टंचाईच्या बाबतीत काय सांगणार आहेत ? जर आम्ही असा प्रश्न विचारला की, तुम्ही खताचे पैसे कधी भरले ? तर माननीय मंत्री महोदय याबाबतीत उत्तर देऊ शकतील काय ? राज्यामध्ये निर्माण झालेली खताची टंचाई, बियाणांची टंचाई इ. असा सर्वव्यापी प्रस्ताव येथे चर्चेसाठी असताना संबंधित खात्याचा एकही मंत्री उपस्थित नसेल तर या चर्चेला काही अर्थ रहाणार नाही. ही वांझोटी चर्चा होईल. या ठिकाणी असे कारण देण्यात आले की, विधानसभेमध्ये सुध्दा या विषयावर चर्चा सुरु आहे. जर विधानसभेमध्ये चर्चा सुरु असेल तर मग विधान परिषदेमध्ये या चर्चेच्या वेळी माननीय राज्यमंत्री का उपस्थित रहात नाहीत ? सर्वच मंत्री महोदय विधानसभेमध्ये उपस्थित आहेत काय ? त्यामुळे जर अशा प्रकारे या सदनाला निग्लेट करणार असतील तर मग आम्ही येथे कशासाठी उपस्थित रहावयाचे ? याठिकाणी उपस्थित करण्यात आलेल्या अत्यंत महत्वाच्या प्रश्नावरील चर्चेच्या वेळेस सदनामध्ये संबंधित खात्याचे माननीय मंत्री महोदय उपस्थित रहाणार नसतील तर या विषयावर चर्चा करण्यामध्ये काही अर्थ नाही.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी दिलेला प्रस्ताव आणि माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर व दिवाकर रावते यांनी दिलेला प्रस्ताव असे दोन्हीही क्लब ....

. . . .2 बी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करण्यात आलेले आहेत. या सदनामधील सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना दुष्काळासारख्या महत्वाच्या प्रश्नाच्या बाबतीत अतिशय तीव्र आहेत याची देखील मला कल्पना आहे.आता याठिकाणी कॅबिनेट मंत्री महोदय उपस्थित झाले आहेत. याठिकाणी जी चर्चा होणार आहे, त्यामध्ये उपस्थित झालेल्या मुद्यांची त्यांनी नोंद घेतली असती आणि मग संबंधित माननीय मंत्री महोदय येथे उत्तर देण्यासाठी आले असते. परंतु सन्माननीय सदस्यांनी जी मागणी केलेली आहे, ती देखील रास्त आहे याबद्दल माझे दुमत नाही. आता याठिकाणी सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील उपस्थित आहेत. मला असे वाटते की, ...

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : याठिकाणी सहकार व कृषी विभागाशी संबंधित कोणते मंत्री उपस्थित आहेत.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, याठिकाणी नवीन प्रथा आणि परंपरा पडावयास नको. एक कॅबिनेट मंत्री असेल . . . .

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, असे नाही.

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, माझे ऐकून घ्यावे. सदनामध्ये एक कॅबिनेट मंत्री उपस्थित असेल तर टेक्नीकली सभागृहाचे कामकाज सुरु राहिले पाहिजे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याठिकाणी संबंधित विभागाचे मंत्री महोदय उपस्थित असले पाहिजेत.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, टंचाईच्या प्रश्नाच्या संबंधात जे माननीय मंत्री महोदय उत्तर देणार आहेत, ते माननीय राज्यमंत्री येथे उपस्थित आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आम्ही बाकीचे जे प्रश्न उपस्थित करणार आहोत....

श्री.आर.आर.पाटील : बाकीचे जे प्रश्न उपस्थित होतील, त्याची उत्तरे तेच देतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, कृषी विभागाच्या आणि सहकार खात्याच्या संबंधात कोणते मंत्री उपस्थित आहेत ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, प्रत्येक खात्याशी संबंधित असलेले मंत्री महोदय उपस्थित असण्याचे कारण नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी पहिल्यांदा कॅबिनेटमंत्री श्री. रामराजे नाईक-निंबाळकर हजर झाले. त्यांनी या चर्चेचा तपशील लिहिला असता आणि नेहमीप्रमाणे संबंधित खात्याच्या मंत्रिमहोदयांकडे देऊन त्यांनी उत्तर दिले असते. आता या सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित झालेले आहेत. पाणीपुरवठा विभागाचे राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख उपस्थित आहेत. महसूल विभागाचे माननीय राज्यमंत्री उपस्थित आहेत. हा प्रश्न अत्यंत तीव्र आहे. या प्रस्तावावर आपण तातडीने चर्चा सुरु करावी असे मला वाटते. तत्पूर्वी या ठिकाणी मघाशी चर्चा केल्याप्रमाणे....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सभागृहाच्या प्रथेप्रमाणे सभागृहाचे कामकाज चालविण्यासाठी एक कॅबिनेट मंत्री उपस्थित असले तरी कामकाज चालू शकते. परंतु या प्रस्तावामध्ये स्पेसिफिक विषय दिलेले आहेत. मंत्रिमहोदयांनी जर लिहून दिले असते की आम्ही सभागृहात हजर राहू शकत नाही तर आम्ही समजू शकलो असतो. विधानसभा सभागृहामध्ये दोन्ही मंत्रिमहोदय उपस्थित असतील तर त्यांच्यापैकी एका मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी येण्यास काय हरकत आहे ? या सभागृहाला या पध्दतीने दुर्लक्षित करणार असाल तर या सभागृहाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न निर्माण होणार आहे. यामध्ये आम्ही स्पेसिफिक विषय दिलेले आहेत. यामध्ये कर्जमाफीचा विषय आहे पण त्याच्याशी संबंधित माननीय सहकार मंत्री या ठिकाणी उपस्थित नाहीत. यामध्ये खताचा विषय आहे पण माननीय कृषी मंत्री या ठिकाणी उपस्थित नाहीत. या ठिकाणी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आहे पण माननीय ग्रामविकास मंत्री उपस्थित नाहीत.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, आपण चर्चेला सुरुवात करावी. संबंधित माननीय मंत्रिमहोदय सभागृहात येतील आणि चर्चेला उत्तर देतील.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मघाशी आपण या सदनामध्ये शोक प्रस्ताव संमत केला. शोक प्रस्ताव गंभीर असतो. त्यावेळी एखादी गोष्ट सांगणे हे औचित्याला धरुन होणार नाही तसेच ज्यांच्याबद्दल शोक प्रस्ताव मांडतो आणि आदर व्यक्त करतो तो राहणार नाही. या सदनामध्ये एक गोष्ट मला कळली नाही. सन्माननीय मंत्रिमहोदय

..2...

अशुद्धीत पत्र / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

श्री. विनय कोरे यांनी या सभागृहामध्ये श्रध्दांजली वाहिली. ते या सदनाचे सदस्य नाहीत. त्यांना त्यांच्या भावना व्यक्त करण्याकरिता त्यांचे स्वत:चे विधानसभेचे सभागृह आहे.

श्री. आर. आर. पाटील : मी तरी या सभागृहाचा सदस्य कोठे आहे ?

श्री. दिवाकर रावते : आपण अधिकृत या सभागृहाचे नेते म्हणून जाहीर झालेले आहात. या सदनात मांडलेल्या शोक प्रस्तावावर माननीय मंत्रिमहोदयांनी मत व्यक्त करणे बरोबर नाही.

श्री. आर. आर. पाटील : तसे असेल तर या सदनातील सर्व कामकाज माननीय मंत्रिमहोदय ॲड. प्रितमकुमार शेगावकर यांनाच करावयास सांगावे लागेल. सगळी उत्तरे तेच देतील. ते आपल्याला चालेल काय ?

श्री. दिवाकर रावते : या सदनामध्ये जे कामकाज चालते त्याला मंत्रिमंडळाचे उत्तरदायित्व असते आणि ते घटनादत्त आहे. माननीय आबांनी एवढ्या टोकाला जाऊन ॲड. प्रितमकुमार शेगावकर यांचे नाव घेतले. त्यांचा असा जोकर वगैरे बनविण्यासारखा हा विषय नाही. मी असे म्हटले की, माननीय मंत्रिमहोदयांना श्रध्दांजली वाहण्याचा अधिकार आहे पण त्यासाठी त्यांचे स्वत:चे सभागृह आहे. त्यांना त्यांच्या भावना व्यक्त करण्यासाठी दुसरे सभागृह आहे. मला आठवते की, मी या सभागृहामध्ये असताना विधान सभागृहाच्या सदस्या सन्माननीय मंत्री असताना श्रीमती शोभाताई फडणवीस यांना त्यावेळचे सन्माननीय सदस्य श्री. अरुण मेहता यांनी अडविले होते. त्यांना त्या ठिकाणी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी वाव आहे. हा एक भाग आहे. सभापती महोदय, माझा दुसरा महत्वाचा मुद्दा असा आहे की, आपण श्रध्दांजली वाहात असताना याचा कोठे तरी क्रम करावा. आपण कै. विजय तेंडुलकर यांना श्रध्दांजली वाहिली. त्यांना श्रध्दांजली का वाहिली असे मी म्हणणार नाही. पण मग कै. चंद्रकांत गोखले यांना श्रध्दांजली का वाहिली नाही ? यांच्यापेक्षा त्यांचे योगदान जास्त होते. आपल्याकडे यांना का नाही, त्यांना का नाही अशी मागणी येत राहील. कोण ज्येष्ठ आणि कोण श्रेष्ठ हे सदन कसे ठरविणार ? हा लेखक कनिष्ठ, हा लेखक ज्येष्ठ, याला श्रध्दांजली वाहिली, त्याला श्रध्दांजली वाहिली नाही, याबाबत आपण कसे ठरविणार ?

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ SBT/

श्री. दिवाकर रावते .....

म्हणून मी आपल्या माध्यमातून विनंती करतो की, यासंदर्भात निश्चित स्वरुपाचा डेकोरम ठरवावा. फिल्डमार्शल सॅम माणेकशॉ यांच्या बाबतीत प्रश्नच येत नाही, माजी सरन्यायाधीश श्री. चंद्रचूड यांच्या बाबतीत प्रश्नच येत नाही पण आपण कोणत्या व्यक्तिमत्वापर्यंत जाणार आहोत ? नाही तर ही यादी फार वाढत जाईल. एक वेळ अशी येईल की, किती नावे येतील याबाबत सीमा राहणार नाही माझी विनंती आहे. मला कोणाबद्दलही अनादर नाही

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी चांगली सूचना केली आहे. शोक प्रस्तावाबाबत काही तरी निकष असावयास पाहिजेत. कामकाज सल्लागार समितीमध्ये निकष निश्चित करण्यात येतील. आज याबाबत काहीच निकष नाहीत. त्यामुळे एकाला श्रध्दांजली वाहिली, दुस-याला वाहिली नाही असा आरोप होईल हे म्हणणे 100 टक्के मी स्वीकरतो. याबाबत निश्चितपणे निकष ठरविण्यात येतील.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी उपस्थित केलेल्या मुद्याबाबत सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले आहे. नुकतीच कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली होती, त्या बैठकीत शोक प्रस्तावाबाबत चर्चा झाली होती. त्या बैठकीत गट नेत्यांनीच आपल्या पक्षाच्यावतीने शोक प्रस्तावावर भाषण करावे असे ठरले होते. पण ज्या पक्षाचा एकच सदस्य आहे, त्या पक्षाच्या सदस्यांना गट नेता म्हणून सभागृहात भाषण करण्याची संधी देण्याची भूमिका घेतली जात आहे. एखाद्या पक्षाचा सभागृहात एकच सदस्य असताना ते सभागृहात भाषण करु शकतात. पण ज्या पक्षाचे या सभागृहात 24 सदस्य आहेत त्या पक्षातील सदस्यांना शोक प्रस्तावावर बोलण्याची संधी मिळत नाही हे योग्य नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : या सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेस क्रमांक 1 वरील पक्ष आहे.

उपसभापती : सन्माननीय सदस्यांच्या भावना मला कळल्या आहेत. या निमित्ताने मला मुद्दाम स्मरण करुन द्यावेसे वाटते की, मागे एकदा सभागृहामध्ये शोक प्रस्ताव चालू होता. त्यावेळी श्री.प्रमोद नवलकर सभागृहात बसले होते. शोक प्रस्तावावरील भाषणे बराच वेळ लांबल्यामुळे त्यांनी मला चिठ्ठी पाठवून कळविले की, शोक प्रस्तावावरील भाषणे अजून लांबली तर आणखी कोणी तरी गेल्याचा निरोप येईल. आता हे सांगण्याचा उद्देश असा शोक प्रस्तावावर बोलताना गांभीर्य राखले गेले पाहिजे, अतिशय मर्यादित स्वरुपात शोक प्रस्तावावर भाषणे झाली पाहिजेत. यामध्ये इतर कोणाच्याही भावना दुखावण्याचा प्रश्न नाही. यामध्ये आपण जो औपचारिकपणा पार पाडतो तो सामोपचाराने पार पडावा, चांगल्या पध्दतीने पार पडावा अशी यामागची भावना आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज चालू असताना कोणत्या विषयावर कोणाला किती वेळ द्यावयाचा असतो ते सुध्दा स्पष्ट झाले पाहिजे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य कोणत्या मुद्यावर बोलत आहेत ? या सभागृहात काय चालले आहे ?

उपसभापती : मी सभागृहाला सांगतो की, माझ्या निधनानंतर मला कोणीही श्रध्दांजली वाहू नये. सभागृहाचे कामकाज सुरु ठेवावे हीच मला खरी श्रध्दांजली होईल.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे

डॉ.सुनील देशमुख (वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 213 (2) (अ) अन्वये सन 2008 चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक 4 - महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश, 2008 अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, सभापती महोदय, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 213 (2) (अ) अन्वये सन 2008 चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक 3 - महाराष्ट्र कापूस बी-बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) अध्यादेश, 2008 सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सन 2008-09 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करणे.

डॉ.सुनील देशमुख (वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008-09 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे आणि तसे करीत असताना मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 आणि 203 (3) मधील तरतुदींना अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सन 2008-09 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहास शिफारस केली आहे.

उपसभापती : सन 2008-09 मधील खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर झाले आहे. सदरहू खर्चाच्या पूरक विवरणपत्राच्या प्रती माननीय सदस्यांसाठी राखून ठेवलेल्या टपालखणांमध्ये ठेवण्यात येत आहेत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सभापती तालिका नामनिर्देशित करणे

उपसभापती : मी महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम 8 (1) अन्वये खालील सभासदांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित करतो :-

1) श्री. उल्हास पवार
2) श्री. भास्कर जाधव
3) श्री. जगदीश गुप्ता
4) श्री. अरविंद सावंत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: पावसाअभावी तसेच बियाणे व खते यांचे नियोजनबध्द पध्दतीने वाटप न झाल्याने शेती व्यवसायाला निर्माण झालेला गंभीर धोका

मु.शी.: पावसाअभावी तसेच बियाणे व खते यांचे नियोजनबध्द पध्दतीने वाटप न झाल्याने शेती व्यवसायाला निर्माण झालेला गंभीर धोका या विषयावर सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, जयंत प्र. पाटील व दिवाकर रावते, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

उप सभापती : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. सूचना देणारे सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर हे आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : उपसभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"राज्यात मान्सूनपूर्व पावसावर शेतक-यांनी बियाणांचे लावणीसाठी केलेली पेरणी पावसाअभावी मोडीत निघणे, परिणामी लागवडीखालील शेत पेरणी केलेल्या बियाणांची झालेली परवड, पावसाने दडी मारल्यामुळे व बेभरवशामुळे शेतकरी वर्ग चिंतातूर होणे, शेतीसाठी असलेली बियाणे व खते यांचे वाटपही नियोजनबध्द पध्दतीने न झाल्यामुळे, शेती कामात शेतक-यांचा उत्साह मावळणे, काही ठिकाणी दुबार पेरणीचे संकट उभे राहणे, अशातच भेसळयुक्त खतांचा आणि कीटकनाशकांचा शेतक-यांना होत असलेला पुरवठा, त्यामुळे रोपांना पोहोचलेला धोका, निविष्ठानुसार युरिया, डीएटी, विक्रंडे इत्यादी खतांचा वापर वेळीच न होऊ शकल्याने शेतक-यांच्या शेती विषयीचे आयोजन निष्प्रभ ठरणे आणि त्यामुळे शेती व्यवसायाला निर्माण झालेला गंभीर धोका, याबाबत शासनाने कृषी विषयी उचित पर्याय शोधण्याची आवश्यकता व शेतक-यांना दिलासा देण्याची निर्माण झालेली गरज, फेब्रुवारी, 2008मध्ये शेतक-यांसाठी कर्जमाफी व कर्ज परतफेड सवलत जाहीर केली आहे. शेतक-यांची कर्जमाफी व कर्ज परतफेड सवलत पात्रता ठरविताना "8 अ" चा निकष लावण्यात आल्याने अनेक शेतक-यांना या योजनेपासून वंचित रहावे लागणे, याबाबत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...)

उपसभापती महोदय, खरे म्हणजे अशा प्रकारचा ठराव या अधिवेशनामध्ये या सभागृहामध्ये मांडण्याची पाळी आमच्यावर येईल असे आम्हाला सुरुवातीला वाटले नव्हते. या देशामध्ये आणि राज्यामध्ये पावसासंबंधीची नक्षत्रे ठरलेली आहेत. या वर्षीचा पावसाळा हा रोहिणी नक्षत्रापासून सुरु होतो आणि हे रोहिणी नक्षत्र 21 मे पासून सुरु होते. 15 दिवसाचे एक नक्षत्र या पध्दतीने मृग नक्षत्रापासून पेरणीला सुरुवात होते. ज्या भागामध्ये जी पिके जास्त होतात त्याप्रमाणे त्या त्या भागामध्ये कापूस, ज्वारी, मूग, उडीद, सोयाबीन इत्यादी पिकांची पेरणी केली जाते. या वर्षी राज्यामध्ये साधारणत: 85 टक्के पासून पडेल असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला होता. हवामान खात्याचा एकही अंदाज आतापर्यन्त खरा ठरलेला नाही. आज 16 जुलै तारीख आहे. आतापर्यन्त पावसाची 4 नक्षत्रे निघून गेलेली आहेत. आतापर्यन्त पेरणी होऊन चांगले पीक यावयास पाहिजे होते. परंतु पावसाअभावी राज्यातील सव्वादोनशे तालुक्यातील काळीशार जमीन कोरडी पडलेली आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, शासनाने एका आठवडयापूर्वी मंत्रिमंडळाची बैठक घेतली, त्या बैठकीमध्ये महाराष्ट्रात टंचाईसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे ही गोष्ट मान्य केली व त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील शेतक-यांच्या बाबतीत बोटावर मोजता येतील एवढया सवलती जाहीर केल्या. परंतु त्या सवलतींच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारची अंमलबजावणी मात्र शासनाकडून केली गेली नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे. या राज्यात बाबा आदामच्या काळापासून दुष्काळ जाहीर करण्याची पध्दत शासन अवलंबिते आहे. दुष्काळ जाहीर करण्याची पध्दत इंग्रजाच्या काळात जशी होती, तशीच पध्दत आज या राज्यात सुरु आहे. पूर्वी या देशात इंग्रजाचे राज्य होते, त्या काळात डिसेंबर महिन्यानंतर आणेवारी काढली जावयाची आणि त्या आणेवारीच्या अनुषंगाने दुष्काळी परिस्थिती आहे किंवा नाही हे ठरविले जावयाचे. आज या देशाला स्वातंत्र्य मिळून साठ वर्षाचा कालावधी होऊन गेलेला आहे. तरी देखील त्या वेळची आणेवारी काढण्याची आणि दुष्काळ जाहीर करण्याची पध्दत आजही सुरु आहे. इंग्रजांच्या काळातील निर्णय पिढयान्पिढया चालू राहिल्यामुळे राज्यातील शेतक-यांवर आत्महत्या करण्याची वेळ आली आहे असे मला खेदाने या ठिकाणी नमूद करावेसे वाटते. राज्यातील आणेवारी काढली नसल्यामुळे दुष्काळ कसा जाहीर करणार अशा प्रकारचे या चर्चेला माननीय मंत्री महोदयांकडून उत्तर दिले जाईल. या राज्यात टंचाईसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे ही गोष्ट शासनाने मान्य केली आहे व तसे जाहीरही केले आहे. राज्यात आणेवारी काढण्याची पध्दत ठरली आहे, ती पध्दत अतिशय जुनी आहे, त्या पध्दतीमध्ये शासनाने अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारचा बदल केलेला नाही. ती पध्दत का बदलली गेली नाही यासंबंधीचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात करावा. 1978 या वर्षी या राज्याचे मुख्यमंत्री माननीय श्री. शरद पवार होते. 1978 च्या कालावधीत मी विधानसभा सदस्य म्हणून कार्यरत होतो. त्यावेळी राज्यात आणेवारी काढण्याची पध्दत बदलली पाहिजे अशी मागणी विधानसभा सदस्यांनी माननीय श्री. शरद पवार यांच्याकडे केली होती. त्यावेळी श्री. शरद पवार यांनी आणेवारी काढण्याच्या पध्दतीत काय बदल करता येतील यासंबंधीचा अभ्यास करण्यासाठी श्री. भगवंतराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. त्या समितीने आपला अहवालही सादर केला आहे. परंतु त्या अहवालाच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची दखल राज्य शासनाकडून घेतली गेली

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

नाही. 1978 ते 2008 या कालावधीत या विषयाच्या बाबतीत स्वामीनाथन समिती स्थापन केली केली, त्या समितीने देखील आपला अहवाल शासनास सादर केला आहे. परंतु या अहवालाच्या बाबतीत देखील शासनाकडून कोणत्याही प्रकारची दखल घेतली गेली नाही. आणेवारी काढण्याची पूर्वी जी पध्दत होती, तीच पध्दत आजही सुरु आहे. म्हणून माझी या चर्चेच्या निमित्ताने मागणी आहे की, आणेवारी काढण्याच्या पध्दतीत तातडीने बदल केला गेला पाहिजे आणि हे अधिवेशन संपण्यापूर्वी शासनाने दुष्काळ जाहीर करावा. महाराष्ट्रात दुष्काळ का जाहीर करावा यामागचे कारण असे आहे की, शेतकरी पावसाळा सुरु झाल्याबरोबर प्रमुख पिके घेतात, ती प्रमुख पिके घेण्याची वेळ आता निघून गेलेली आहे. ऑगस्ट अथवा सप्टेंबर महिन्यात पाऊस पडला तर त्या पावसाचा उपयोग खरीप पिकासाठी होऊ शकत नाही. त्या पावसाचा उपयोग रब्बी पिके घेण्यासाठी होऊ शकतो. महाराष्ट्रात ज्या ज्या विभागात खरीपाची पिके घेतली जातात तो विभाग पावसा अभावी ड्राय झालेला आहे. विदर्भ, मराठवाडा, खानदेश, पश्चिम महाराष्ट्रातील काही भागात आज तागायत पाऊस पडलेला नाही. तेथील शेतकरी कोणत्याही प्रकारचे पीक घेऊ शकत नाही. येत्या दोन-चार दिवसात पाऊस पडला तर त्या पावसाचा उपयोग रब्बी पिके घेण्यासाठी होऊ शकतो. राज्यातील शेतक-यांना खरीपांची पिके घेता आली नसल्यामुळे त्यांच्यामध्ये अतिशय चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या ठिकाणी माननीय उप मुख्यमंत्री उपस्थित आहेत. माननीय उप मुख्यमंत्री हे अतिशय प्रामाणिकपणे निर्णय घेत असतात. यावेळी देखील माननीय उप मुख्यमंत्र्यांनी दुष्काळासंबंधी प्रामाणिकपणे निर्णय घेऊन महाराष्ट्रात परिवर्तन आणून दाखवावे अशी माझी विनंती आहे. त्याचप्रमाणे आणेवारी काढण्याची बाबा आदमच्या काळातील पध्दत आहे, ती पध्दत आजही अस्तित्वात असल्यामुळे महाराष्ट्र राज्याला वेळोवेळी गंभीर समस्येला तोंड द्यावे लागते. म्हणून या पध्दतीत तातडीने बदल करावा अशी माझी माननीय उप मुख्यमंत्र्यांना विनंती आहे. 1972 या वर्षी महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला होता, त्यावेळी श्री. वसंतराव नाईक हे या राज्याचे मुख्यमंत्री होते. त्यावेळचे सरकार ज्या पध्दतीने दुष्काळाला सामोरे गेले होते, त्याच पध्दतीने या सरकारने सामोरे जावे अशी अपेक्षा मी या शासनाकडून व्यक्त करतो. या राज्यात अतिशय कमी पाऊस पडलेला आहे. पश्चिम महाराष्ट्रात 36 टक्के, विदर्भात 23 टक्के पाऊस झालेला आहे.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

मराठवाडयात सरासरीपेक्षा 62 टक्के पाऊस कमी पडलेला आहे. महाराष्ट्रातील काही भागात उन्हाळा जाणवतो आहे. त्या भागात पावसाळा सुरु झाल्याचे चिन्ह सुध्दा दिसून येत नाही. मी विदर्भातील काही रस्त्यावरुन 200-200 कि.मी.अंतरापर्यंत प्रवास केला....

यानंतर श्री. कानडे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

एकाही शेतात पेरणी झालेली दिसली नाही. सभापती महोदय, मी परवाची घटना याठिकाणी सांगू इच्छितो. मी पंढरपूर-बार्शी-येरमाळा परिसरातून येत असताना एका शेतामध्ये एक शेतकरी वखरची गाडी ओढत होता. म्हणजे उन्हाळयामध्ये जे काम करावे लागते तेच काम यावेळी करावे लागत आहे अशी स्थिती महाराष्ट्रामध्ये निर्माण झालेली आहे. तरीसुध्दा शासन दुष्काळसदृश परिस्थिती आहे असे म्हणत आहे. आता पाऊस होऊन सुध्दा काहीही उपयोग होणार नाही. कारण मराठवाडा आणि विदर्भामध्ये कापूस पिकणार नाही, ज्वारी पिकणार नाही. मूग आणि उडीद येऊ शकणार नाही. तेलबियांचे पीक येऊ शकणार नाही अशा प्रकारची स्थिती निर्माण झालेली आहे. एका बाजूला महागाईने शेतकरी त्रस्त झालेला आहे तर दुसऱ्या बाजूला दुष्काळाचे संकट गरीब माणसावर येऊन पडले आहे. 2003-04 मध्ये राज्यात दुष्काळ होता त्यावेळी 71 तालुके दुष्काळी म्हणून जाहीर केले होते. यावेळी त्यापेक्षा कितीतरी पट अधिक तालुक्यांमध्ये दुष्काळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे. आम्ही पूर्वी सांगत होतो की, कोकणामध्ये प्रचंड पाऊस पडतो. परंतु यावेळी कोकणातील लोकांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. कोकणामध्ये सुध्दा पावसाचा पत्ताच नाही. मान्सून सुरु होण्यापूर्वी आकडेवारी समाधानकारक होती. यावेळेला महाराष्ट्रात प्रचंड पाऊस पडणार आणि महाराष्ट्र सुजलाम्-सुफलाम् होणार असे सांगितले जात होते. परंतु दिवसेंदिवस शेतकरी पावसाच्या प्रतिक्षेत राहिला. शेतकऱ्याचे डोळे पाऊस पडेल म्हणून आकाशाकडे लागले आहेत. पाऊस कधी पडेल अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. आता गावात फिरणे कठीण झालेले आहे. शेतकरी शेतात जाऊ शकत नाही, मजुराच्या हाताला काम नाही. किती संकट येणार आहे ? दुष्काळी परिस्थितीची घोषणा केली तरी मजुराला काम मिळणार नाही, गावात पिण्याचे पाणी नाही. पिण्याच्या पाण्याच्या ज्या योजना आहेत त्या योजनांची विजेची बिले ग्रामपंचायतीला भरता आली नाहीत तर वीज कनेक्शन कापून टाकणार आणि गावात पिण्याचे पाणी मिळणार नाही. जनावरांना चा-यासाठी हिरवे टोक देखील दिसत नाही. जनावरे पटापट मरत आहेत. अशा प्रकारचे भीषण दृष्य दिसत आहे. हा राजकीय प्रश्न नाही. सर्वांनी मिळून विचार करण्याचा प्रश्न आहे. सुरुवातीला पाऊस झाला म्हणून आमच्या विभागामध्ये धूळपेरणी झाली. कोरडया शेतात बियाणे टाकले गेले. परंतु त्यावेळी गरीब बिचाऱ्या शेतकऱ्याला खत मिळाले नाही. खताची टंचाई निर्माण झाली. यासाठी

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ KGS/ MMP/ MMP/ पूर्वी श्री.गिते

श्री. पांडुरंग फुंडकर ....

शेतकरी जबाबदार नाही. कृषीमंत्र्यांनी ज्याप्रमाणे सांगितले की, पाऊस येण्याला मी जबाबदार नाही त्याचप्रमाणे खताच्या टंचाईला सुध्दा शेतकरी जबाबदार नाही. खताच्या बाबतीत दर वर्षाला सरकारची आढावा बैठक होते. जिल्हयाजिल्हयातून आकडेवारी मागाविली जाते. प्रत्येक विभागातून बैठका घेऊन त्यातून आकडेवारी एकत्र करावयाची आणि मग केंद्र सरकारला ही आकडेवारी कळवून खताची मागणी करावयाची. बियाणे महामंडळाकडे बियाण्यांची मागणी नोंदवायची. पाण्याची टंचाई, खतांची टंचाई, पिण्याच्या पाण्याची टंचाई. रोजगार हमी योजनेवरील कामे बंद कारण रोजगार हमी योजना बंद झाल्यामुळे शेतकरी आणि मजुराला कोणतेही काम मिळत नाही. केंद्र सरकारची एमआरइजीएस ही नवीन योजना इतकी क्लिष्ट आहे की त्याच्यामध्ये दुरुस्ती करण्याची गरज आहे. या योजनेवर काम करणाऱ्या मजुराला त्याची मजुरी पासबुकातून घ्यावी लागणार आहे. त्याच्या चेकचे पैसे त्याला पासबुकात जमा करावे लागतील. इतका वेळ शेतकऱ्याला कुठे आहे ? उद्या त्याला खायला मिळेल किंवा नाही हे सांगू शकत नाही. त्याला उद्याच काम हवे आहे. तो नोंदणी केव्हा करणार ? पासबुक केव्हा काढणार ? पैसे केव्हा काढणार ? धान्य कुठून आणणार इतकी गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे.

नंतर श्री. भोगले

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनाची नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

म्हणून हा प्रस्ताव आणण्याचे मूळ कारण हेच आहे की, पहिल्यांदा महाराष्ट्राच्या दृष्टीने काही गोष्टींचा विचार करण्याची गरज आहे. काही गोष्टी 50-60 वर्षापासून परंपरेने चालत आलेल्या आहेत.

महाराष्ट्र हा देशात अग्रेसर आहे असे आपण म्हणतो. 1972 च्या दुष्काळामध्ये कै.वसंतराव नाईक यांनी रोजगार हमी योजना आणली. खऱ्याअर्थाने ती योजना देशात नावाजली गेली. काही राज्यांनी ती योजना उचलली. रोजगार हमी योजनेत प्रत्येक मजुराला काम मिळण्याचा हक्क प्राप्त झाला होता. मी त्या काळात कॉलेजमध्ये शिकत होतो. महाराष्ट्रात चित्र असे होते की, लाखो मजूर खडी फोडायला गिट्टी खदानीवर रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून जात होते. लाखो मजुरांना त्याठिकाणी काम मिळत होते. ती योजना आता बंद झाली आहे. एमआरइजीएस अंतर्गत किती कामे सुरु आहेत हे मंत्रीमहोदयांनी सांगितले पाहिजे. ही योजना लागू झाल्यानंतर महाराष्ट्रात या योजनेंतर्गत किती मजूर कामावर आहेत? किती कामे सुरु आहेत? त्या कामांवर मजुरांना किती मजुरी दिली जाते हे सांगण्याची गरज आहे. जनावरांच्या चाऱ्याची अवस्था काय आहे? जनावरांना चारा कुठून आणणार? कसा आणणार? संपूर्ण ग्रामीण भागामध्ये जनावरे वैरणीसाठी वणवण फिरत आहेत. जनावरांना प्यायला पाणी नाही अशी दयनीय अवस्था आहे. या दयनीय स्थितीमध्ये सरकार गंभीर नसेल तर काय बोध घ्यायचा? काल माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले की, दुष्काळसदृश परिस्थिती आहे. सभागृहात हा विषय चर्चेला येणार हे सरकारला माहिती होते. शासनाचे मंत्री किती गंभीर आहेत? चर्चा सुरु होऊनही संबंधित खात्याचे मंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक दहा मिनिटे तहकूब करावी लागते, यावरुन सरकार किती गंभीर आहे हे लक्षात येईल. सरकार खतासंबंधी किती गंभीर आहे? यावर्षी महाराष्ट्रात काय चित्र आहे? माझ्याकडे अनेक जिल्हयांची आकडेवारी उपलब्ध आहे. बुलढाणा जिल्हयात खताची चढ्या भावाने विक्री. जिल्हयासाठी खताची मागणी 2,04,850 मे.टन असताना 11 जून, 2008 पर्यंत फक्त 1.71 लाख मे.टन एवढे खत प्राप्त झाले. अकोला जिल्हयात खताचा प्रचंड तुटवडा. यवतमाळ जिल्हयात खतासाठी शेतकरी रस्त्यावर उतरले. भंडारा जिल्हयात खत उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांचा आक्रोश. गोंदिया जिल्हयासाठी मागणीच्या निम्मे खत. वर्धा जिल्हयात फक्त 25 टक्के खत उपलब्ध झाले. गडचिरोली जिल्हयात 20 टक्के

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

खताचा पुरवठा. अमरावती जिल्हयात खताचा तुटवडा. नागपूर जिल्हयात डीएपी खत दिसतच नाही. औरंगाबाद जिल्हयात मिश्र खताचा तुटवडा. सिंधुदुर्ग जिल्हयात खत पुरवठ्यास कर्जमाफी धोरणाचा फटका. सांगली जिल्हयात डीएपी खताची टंचाई. सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदय, आपल्या जिल्हयात खताची टंचाई आहे. सातारा जिल्हयात सर्वत्र खताचा तुटवडा. कोल्हापूर जिल्हयात 73 हजार मे.टन खताचा तुटवडा. जळगाव जिल्हयात 1.25 लाख मे.टन खताचा तुटवडा. फक्त धुळे जिल्हयात 17 हजार मे.टन खत पुरविले गेले. नंदूरबार जिल्हयात 10 टक्के जादा खत मागविणार. खरे म्हणजे सुरुवातीपासून नंदूरबार जिल्हयात खताची टंचाई होती. गुजराथ-मध्यप्रदेश राज्याच्या सीमेवर हा जिल्हा असल्याने बहुतांश शेतकऱ्यांनी मध्यप्रदेशातून खत आणले. परभणी जिल्हयात फक्त 31 हजार मे.टन खत मिळाले. बीड जिल्हयात केवळ 15 टक्के खत पुरवठा. उस्मानाबाद जिल्हयात मागणीच्या 3 टक्के खत पुरवठा. लातूर जिल्हयात 3 हजार मे.टन खत उपलब्ध. लातूर हा माननीय मुख्यमंत्र्यांचा जिल्हा आहे. सांगली हा माननीय उपमुख्यमंत्र्यांचा जिल्हा असताना तेथे फक्त 3 हजार मे.टन खत उपलब्ध झाले. खत मागायला शेतकरी रस्त्यावर उतरले. ही माहिती 17 जून, 2008 ची आहे. खत मागण्यासाठी शेतकरी रस्त्यावर उतरतात. शासनाने खत देऊ नये. परंतु कमीत कमी लाठ्या तरी मारु नयेत. अकोला जिल्हयात पिंजर गावात खत मागायला गेले, तेथे खताचे दोन ट्रक आले होते.

(नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

ट्रक अडविण्याचा प्रयत्न केला असता शेतकऱ्यांवर लाठीमार केला जातो, लातूरमध्ये खत मागणीसाठी शेतकरी गेले, रास्ता रोको आंदोलन केले व हे शेतकरी रस्त्यावर बसले असता सुरुवातीला कुठल्याही शेतकऱ्याने दगड मारला नाही, काच फोडली नाही, फक्त खत मागणीसाठी महात्मा गांधींप्रमाणे अहिंसक मार्गाने आंदोलन करीत असताना या शेतकऱ्यांना लाठ्यांनी मारहाण केली जाते. या राज्यात शेतकऱ्यांना खत तर देतच नाही वरुन लाठीमारही केला जातो. खताच्या संदर्भात मी फेब्रुवारी महिन्यातच सांगितले होते. तसेच बजेट सेशनमधील प्रोसिडींग देखील माझ्याकडे आहे. त्यावेळेस मी विचारले होते की, भारत सरकारची एक आयपीसीएल नावाची कंपनी आहे. त्या कंपनीकडे खताच्या पुरवठ्यासाठी शासनाने किती पैसे भरले आहेत ? त्यावेळेस माननीय कृषी मंत्री श्री. बाळासाहेब थोरात यांनी भलतेच उत्तर दिले होते. त्यावेळेस माननीय मुख्यमंत्री देखील सभागृहात उपस्थित होते. त्यांनी सांगितले होते की, यासंबंधी शासनाकडून निवेदन करण्यात येईल. त्यावेळेस असे उत्तर देण्यात आले होते की, कृषी क्षेत्रासाठी लागणाऱ्या खताचे नियोजन व वितरण हे प्रामुख्याने केंद्रशासनाच्या अखत्यारितील विषय आहेत. खताच्या नियोजनाचे आणि वितरणाचे प्रामुख्याने नियंत्रित खते आणि अनियंत्रित खते असे दोन प्रकार पडतात. नियंत्रित खतांमध्ये युरिया आणि अनियंत्रित खतांमध्ये डीएपी व पोटॅश. नियंत्रित खतासाठी केंद्रशासनाकडून अनुदान दिले जाते. अनियंत्रित खतामध्ये डीएपी खतासाठी सवलतीच्या दराने विकण्यासाठी अनुदान देण्यात येते. तसेच देशाच्या नवीन धोरणानुसार राज्यशासन खताची आयात सुध्दा करु शकते. केंद्र शासनाने सन 2006-07 मध्ये वरील दोन्ही प्रकारच्या खतासाठी 26 हजार कोटीचे अनुदान दिले. सन 2005-06 मध्ये 45 हजार कोटीचे अनुदान केंद्राने उपब्ध करुन दिले. यापैकी काही रक्कम फर्टिलायझर बॉन्डसच्या रुपाने देण्यात आली आहे. फर्टिलायझर बॉन्डस खत कारखान्यांना देणे उचित आहे काय ? समजा शेतकऱ्याने आत्महत्त्या केली आणि शासनाने मेहेरबानी म्हणून त्याच्या कुटुंबियांना एक लाख रुपये मदत जाहीर केली. त्या रकमेपैकी शेतकऱ्याच्या बायकोला फक्त 30 हजार रुपये नगदी देतो आणि 70 हजार रुपयाचे बॉन्डस 10 वर्षासाठी देण्यात येतात. त्या बॉन्डसवर शेतकऱ्याच्या कुटुंबियांना कर्जही मिळत नाही. तसेच हे बॉन्डस पोस्टातच ठेवून घेतले जातात, परत देत नाहीत. जिल्ह्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

माझ्याकडे एका शेतकऱ्याची बायको आली, तिने सांगितले की, माझ्या मुलीला गंभीर आजार झाला आहे. मला नगदी स्वरुपात 30 हजार रुपये देण्यात आले होते ते औषधांमध्येच खर्च झाले. ती महिला म्हणाली की, शासनाने दिलेले 70 हजाराचे बॉन्डस माझ्याकडे आहेत. मला त्या बॉन्डसच्या बदल्यात बँकेकडून कर्ज मिळावे. परंतु हे बॉन्डस पोस्टातून परत देण्यात आलेले नाहीत. असे बॉन्डस खत कारखान्यांना दिले तर ते खताची निर्मिती करणार आहेत काय ? अशा प्रकारचे माननीय कृषी मंत्र्यांनी स्टेटमेंट केलेले आहे. फर्टिलायझर बॉन्डसच्या स्वरुपात देण्यात आलेले हे बॉन्डस कोणत्याच कामाचे नाहीत. वास्तविक केंद्रशासनाच्या स्थायी आदेश आणि प्रचलित पध्दतीनुसार केंद्रशासनान कृषी विभाग व खत विभाग यांनी खरीप व रब्बी हंगाम सुरु होण्यापूर्वी खताची मागणी करणे शासनाला बंधनकारक असते. याबाबत केंद्रशासनाचे खत मंत्रालय देखील बारकाईने या गोष्टींचा आढावा घेते व खतासंबंधीचे आपले नियोजन अंतिम करते आणि विविध खत उत्पादकांना राज्यांचे तसेच जिल्ह्यांचे उद्दिष्ट देण्यात येते. मी त्यावेळेस असेही विचारले होते की, या मागणीच्या अनुषंगाने आपण किती पैसे भरलेले आहेत ? मी गुजरात, पंजाब आणि उत्तरप्रदेश या राज्यांनी ज्याप्रमाणे खताची मागणी नोंदविली आणि पैसे भरलेले आहेत त्याप्रमाणे आपल्या राज्याने देखील केंद्रशासनाकडे खताची मागणी नोंदविली काय, आणि त्यासाठी पैसे भरले आहेत काय ? त्याला मंत्री महोदयांनी उत्तर दिले की, आपल्या राज्याची खताची मागणी 34.26 लाख मे.टन इतकी असून डीएपीची 2 लाख मे.टन इतकी तूट आहे. ही तूट भरुन काढण्यासाठी राज्यशासन 150 कोटी रुपये बँकेकडून कर्ज घेऊन ती रक्कम आयपीसीएल कडे भरणार आहे, असे 17 एप्रिल, 2008 रोजीच्या उत्तरात मंत्री महोदयांनी सांगितले आहे. एप्रिल महिन्यात बँकेकडून 150 कोटीचे कर्ज घेऊन अपण खत निर्माण करणाऱ्या कंपनीकडे भरणार आणि त्यानंतर ती कंपनी आम्हाला खताचा पुरवठा करणार. एप्रिल महिन्यापर्यंत ही रक्कम भरलेलीच नव्हती. यासंदर्भातील कृषी विभागाच्या सचिवांचे पत्र माझ्याकडे आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, माझ्याकडे कृषी खात्याच्या सचिवांचे दि. 4.7.2008 चे पत्र आहे त्यामध्ये म्हटले आहे की, खताच्या मागणी व पुरवठयाबाबत फक्त 18 कोटी रुपये दिलेले आहेत. पुढे असे म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाने केंद्रशासनाच्या धोरणानुसार, दिलेल्या निर्देषानुसार आमच्या महामंडळाने 1.50 लक्ष मे.टन. डीएपी आयपीसीएलकडून घेण्याबाबत इंडीयन बँक, मुंबई यांच्याकडून 150 कोटी रुपये कर्ज मंजूर करुन घेतले. त्यानंतर केंद्रशासनाने निर्धारीत केलेल्या आयपीसीएलच्या एजन्सीमार्फत 1.5 लक्ष मे.टन आयात केलेल्या डीएपी खताचा खरीप हंगाम 2008 साठी मागणी पत्र नोंदवले आहे. मागणी पत्र नोंदविल्यानंतर दिनांक 5.5.2008 रोजी 18 कोटी रुपये जमा केले व दिनांक 26.6.2008 रोजी 14 कोटी रुपये जमा केले. म्हणजे शासनाने 150 कोटी रुपयांचे कर्ज खतासाठी मंजूर करुन केवळ 33 कोटी रुपये जमा केलेले आहेत. आपण केवळ 33 कोटी रुपये खतासाठी भरणार आहात. आपल्या राज्यात युरीया खताची 14 लक्ष मे.टनाची मागणी होती व शासनाने केवळ 6 लक्ष मे.टन खत उपलब्ध करुन दिले. अमोनिमयम सल्फेट खताची मागणी 32 हजार मे.टन खताची होती, डीएपी खताची मागणी 4.5 लक्ष मे.टन असतांना प्रत्यक्षात 1.62 लक्ष मे.टनाचा पुरवठा करण्यात आला. होता, एसएसपी खताची मागणी 3.5लक्ष मे.टनाची होती, एमओपी खताची मागणी 1.7 लक्ष मे.टनाची असतांना केवळ 74 हजार मे.टनाचा पुरवठा करण्यात आला. संयुक्त खताची मागणी 9.65 लक्ष मे.टनाची असतांना संयुक्त खते केवळ 1.80 लक्ष मे.टन उपलब्ध करुन दिले. 20-20-0 आणि सुफला ही खते तर मार्केटमध्ये दिसतच नाहीत. या सर्व गोष्टीला महाराष्ट्र राज्याचे कृषी मंत्रालय जबाबदार आहे. शेतक-याच्या संदर्भात कृषी मंत्रालयाने दुर्लक्ष केलेले आहे. हा जो प्रकार कृषी मंत्रालयाच्या उदासीनतेमुळे झालेला आहे. कृषी मंत्रालयामुळेच आज महाराष्ट्रातील शेतक-यांवर ही परिस्थिती आलेली आहे. खत मागण्यासाठी शेतकरी गेले तर त्यांच्यावर लाठीमार केला जातो त्यामुळे आता शेतक-यांनी कोठे जावे? शेतकरी आंदोलन करु शकत नाही. शेतक-यांनी रस्तारोको केला तर शासन शेतक-यांवर कलम 135 अंतर्गत कारवाई करते.

श्री.आर.आर.पाटील : (खाली बसून) या सर्व प्रकाराला राजस्थान सरकार जबाबदार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : शेतक-यांच्या संदर्भात कृषी मंत्र्यांनी इतकी उदासीनता दाखवणे योग्य नाही. खतांच्या संदर्भात कृषी मंत्र्यांनी म्हटले आहे की, "श्री.गोपीनाथ मुंडे यांनी महाराष्ट्राला खते आणून द्यावीत." आपण जर माननीय गोपीनाथ मुंडेना मुख्यमंत्री केले तर आपल्याला लागेल तेवढी खते ते आणून देतील. आमच्या काळात कधीही खताची टंचाई झाली नव्हती. आमच्या सरकारचा पायगुणच एवढा चांगला होता की, आजच्या सारखी दुष्काळी परिस्थिती कधीही निर्माण झाली नव्हती, दंगे झाले नव्हते, बॉम्बस्फोट झाले नव्हते.

यानंतर श्री. गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ..

सभापती महोदय, गुज्जरांच्या आंदोलनामुळे खत देता आले नाही असे सांगण्यात आले आहे. परंतु राज्यातील शेतक-यांना खत न देण्याचा व गुजरांच्या आदोलनाचा काय संबंध आहे ? अशा प्रकारचे स्टेटमेन्ट कशासाठी करण्यात येत आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, राज्यातील लोकांच्या तक्रारी आणि अडचणी या ठिकाणी सांगण्याचा सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना पूर्णपणे हक्क व अधिकार आहे. चुकीचे रेकॉर्डवर येऊ नये म्हणून मी वस्तुस्थिती सांगू इच्छितो की, राजस्थानमध्ये गुज्जर समाजाच्या लोकांचे आंदोलन प्रदीर्घ काळ लांबले होते. त्यां आदोलनामध्ये तेथील सरकारकडून लवकर हस्तक्षेप केला गेला नाही. तेथील आदोलकांनी .या ठिकाणची रेल्वे वाहतूक बंद केली होती . नॉर्थला जाणारी सर्व रेल्वे वाहतूक दक्षिणेकडून गुजराथ मार्गाने वळवली होती त्यामुळे कांडला बंदरात आलेले खत महाराष्ट्रात आणण्याकरिता रॅक्स मिळाल्या नाहीत. त्यामुळे सुरुवातीच्या काळात खताची टंचाई निर्माण झाली होती परंतु नंतर टप्याटप्याने राज्यामध्ये खत देण्यात आले आहे. महाराष्ट्रातील खत टंचाईला राजस्थानमधील आंदोलनच कारणीभूत आहे. सगळी वाहतूक बंद असल्यामुळे रेल्वे वाहतूक गुजराथ मार्गे वळविण्यात आली होती. ही वस्तुस्थिती लक्षात घेतली पाहिजे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, आपण जर खताचा पुरवठा करु शकत नसाल तर आपले पाप दुस-यावर ढकलू नका गुंजराथ मधील कांडला आणि मुंदरा या बंदरात खताची जहाजे आली असतील. परंतु तेथील खत महाराष्ट्रात आणण्यासाठी गुजराथ ते महाराष्ट्र ही रेल्वे लाईन राजस्थानातून येत नाही. गुजर समाजाचे आंदोलन गुजराथ राज्यात गेलेले नव्हते. कांडला बंदरातील खत जर महाराष्ट्रात आणावयाचें असते तर ते दुस-या लाईनने आणता आले असते. गुजराथ ते मुंबई ही रेल्वे लाईन कोठेही उखडली गेली नव्हती. तेव्हा आपण हा विषय का डायव्हर्ट करीत आहात ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, किती रॅक्स उपलब्ध झाल्या होत्या. यासबंधीची माहिती रेल्वे ॲथॉरिटीकडून लेखी माहिती घेऊन सदनामध्ये ती देण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, केन्द्रीय मंत्री श्री. राम विलास पास्वान यांनी जाहीर केले की, या खत टंचाईस महाराष्ट्राचे सरकार जबाबदार आहे.केन्द्रीय रसायन मंत्र्यांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ..

असे जाहीर केले होते की, "या खत टंचाईस महाराष्ट्र सरकार जबाबदार आहे, आम्ही जबाबदार नाही." तेव्हा त्या संदर्भात आपल्याकडे काय उत्तर आहे ?

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय.....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांना मी सांगू इच्छितो की, आपण शेतकरी नाही. त्यामुळे मुंबईत राहून आपल्याला शेतक-याच्या अडचणी समजणार नाहीत तेव्हा आपण मध्ये कशाला बोलत आहात ?

श्री.राम पंडागळे : माझीसुध्दा शेती आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : मुंबईमध्ये आपण शेती पिकवत आहात काय ?

श्री.राम पंडागळे : माझा जन्म मराठवाडयात झाला आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर :मराठवाडयात आपला जन्म झाला आहे परंतु तुम्ही येथेच वाढला आहात. 1978 साली सुध्दा मी आपल्याला पाहिलेले आहे. सभापती महोदय, मला एवढेच सांगावयाचे आहे की, खत मिळविण्याच्या बाबतीत अगोदर नियोजन केले असते, अगोदर पैसे भरले असते तर खताची टंचाई निर्माण झाली नसती. 150 कोटी रुपयाचे कर्ज खतासाठी उशिराने मंजूर केले होते ते कर्ज अगोदर मंजूर केले असते आणि फेब्रुवारी महिन्यात वा मार्च महिन्यात खताची नोंदणी झाली असती तर बरे झाले असते. ज्यावेळी खरीपाच्या पिकाच्या दृष्टीने बैठका होत असतात त्याचवेळी जर सगळी आकडेवारी घेऊन केन्द्र सरकारकडे मागणी केली असते तर बरे झाले असते. महाराष्ट्राचा जाणता राजा श्री. शरद पवार हे केन्द्र सरकारमध्ये कृषी मंत्री आहेत त्यांच्या कानावर जर ही गोष्ट वेळीच टाकली असती व त्यांनी एक शब्द टाकला असता तर राज्याला खत वेळेवर मिळाले असते परंतु तेवढी तत्परता राज्याच्या कृषी खात्याने दाखवली नाही, माननीय कृषी मंत्र्यांनी दाखवली नाही.त्यामुळे शेवटी देशातील कृषी मंत्री सुध्दा बदनाम होत आहेत. राज्यातील शेतकरी असे म्हणतात की, महाराष्ट्रातील जाणता राजा ज्यांना म्हटले गेले आहे ते श्री.शरद पवार हे केन्द्रामध्ये कृषी मंत्री असतांना महाराष्ट्रातील शेतक-यांना जर खत मिळत नसेल तर ते खरोखर कृषी खाते चालवतात की क्रिकेटचे खेळ चालवतात याबद्दल शंका येते . खताच्या बाबतीत महाराष्ट्र सरकार अयशस्वी झालेले आहे . सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांच्या निवडणुकीच्या निमित्ताने मी आरमोरी गावात गेलो होतो. त्या ठिकाणी वाटण्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ..

आलेल्या खताचे नमुने माझ्याकडे आहेत. आज या विषयावर चर्चा होईल असे मला वाटले नव्हते. त्यामुळे ते मी आज येथे आणलेले नाही परंतु खताचे नमुने मी आणून ठेवलेले आहेत. मी त्या भागात गेलो असतांना माझी गाडी तेथील शेतक-यांनी अडवली होती. शेतक-यांनी मला सांगितले की, जे मिश्रखत शेतक-यांना दिले जाते त्यात वाळू आणि माती आहे. एका कृषी केन्द्रावर मी गेलो आणि तेथील माणसाला मी सांगितले की, खताची गोणी उघडून दाखव. तेव्हा त्याने नवीन खताची गोणी काढली होती व त्यातील मुठभर खत मी बाहेर काढले असतांना मला असे दिसून आले की, त्यात 80 टक्के माती व वाळू होती. अशा प्रकारचे खत शेतक-यांना विकले जात आहे.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ते सारे मिश्रखत होते. आपल्याकडील मिश्रखतांचे नमुने आम्ही घेतले आहेत. मध्यंतरी 15 दिवसांसाठी आपण खत कारखान्यांचे परवाने रद्द केले होते. पण हे खत मध्य प्रदेश राज्यातून आलेले नव्हते. केवळ नंदूरबारमध्ये आलेले खत हे मध्य प्रदेशमधून आले होते हे मी मान्य करतो. परंतु त्या खताबद्दल कोणतीही तक्रार आलेली नाही. सभापती महोदय, या खताच्या बाबतीत जो काही गोंधळ राज्यामध्ये झाला आहे तो मुख्यत्वे करून मागणी आणि पुरवठा यामध्ये जे अंतर पडले त्यामुळे झाला आहे. परिणामी हे सरकार शेतकऱ्याला खत पुरवू शकले नाही. त्याला जबाबदार कोण आहे ? आपले कृषी खाते याला संपूर्णत: जबाबदार आहे असे मी ठामपणे सांगू इच्छितो. आपण या संदर्भात योग्य प्लॅनिंग केले असते तर राज्यात खत टंचाई निर्माण झाली नसती. एप्रिलमध्ये आम्ही जेव्हा या संदर्भात बोललो होतो तेव्हाच आपण खतासाठी नोंदणी केली असती आणि त्यासाठी आवश्यक असलेले पैसे भरले असते तर आपल्याला योग्य वेळी खते मिळाली असती आणि ही गोंधळाची परिस्थिती निर्माण झालीच नसती. खरे तर यासाठी आपण 1500 कोटी रूपये भरायला पाहिजे होते. त्याऐवजी आपण केवळ 18 कोटी भरले. त्यामुळे देखील राज्यातील शेतकऱ्याला खत मिळाले नाही. सभापती महोदय, राज्यामध्ये बियाणांची परिस्थिती काय होती याची देखील मी या निमित्ताने माहिती देऊ इच्छितो. राज्यात बियाणे किती पाहिजे होते आणि प्रत्यक्षात ते किती पुरविले गेले याची विभागवार माहिती माझ्याकडे आहे. अमरावती विभागामध्ये 3,21,842 क्विंटलची बियाणांची मागणी होती. अमरावती जिल्ह्यात त्या ऐवजी 2,03,743 क्विंटल बियाणे पुरविले गेले. नागपूर विभागामध्ये देखील तीच स्थिती आहे. सभापती महोदय, या ठिकाणी सगळी आकडेवारी देत सभागृहाचा वेळ न घेता मी केवळ एकूण आकडेच देत आहे. नागपूर विभागामध्ये 17,57,903 मे.टन बियाणांची मागणी होती आणि पुरवठा मात्र 15,83,306 मे.टन इतकाच केला गेला. सोयाबिनची काय परिस्थिती या काळात होती ? पंतप्रधान पॅकेज अंतर्गत प्रत्येक सोयाबिनच्या पॅकेटवर दोन थैल्या देण्यासाठी दिल्या गेल्या होत्या. परंतु विदर्भातील 6 जिल्ह्यांमध्ये, ज्या जिल्ह्यांमध्ये आजवर 5 हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत अशा जिल्ह्यांमध्ये एका परमिटवर दोन थैल्या दिल्या गेल्या नाहीत तर केवळ एकच थैली दिली गेली. इतकेच नाही तर ती देताना सांगितले गेले की, या बरोबर पिकांवर फवारणीसाठी आम्ही ही पावडर देतो आहोत ती तुम्हाला घ्यावी लागेल. सभापती महोदय,

..... एलएल 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ....

आत्महत्या झालेल्या जिल्ह्यांमध्ये, पंतप्रधान पॅकेज जाहीर झालेल्या जिल्ह्यांमध्ये हे घडलेले आहे, घडत आहे. या जिल्ह्यांमध्ये आपण पंतप्रधान पॅकेज अंतर्गत सोयाबिनच्या थैल्या देत आहात. पण त्या देत असताना आपल्या सेवा संस्था, कृषी संस्था जर शेतकऱ्यावर जबरदस्ती करणार असतील तर या राज्यातील शेतकरी जगणार तरी कसा ? म्हणून आमची या निमित्ताने सरकारकडे मागणी आहे की, विदर्भातील 6 जिल्ह्यांसाठी पंतप्रधानांनी साडेतीन हजार कोटीचे पॅकेज दिले आहे तर त्या पैकेजचे वाटप कसकसे झाले याची श्वेतपत्रिका सरकारने काढावी. शेतकऱ्यांना या पॅकेज अंतर्गत बैलजोडी द्यायची होती पण त्यांना पंप घेण्यासाठी जबरदस्ती करण्यात आली. त्या शेतकऱ्याच्या शेतात विहीरच नाही तर तो पंप घेऊन काय करणार आहे ? सभापती महोदय, राज्याचे कृषी मंत्री आता येथे उपस्थित नाहीत. पण मी त्यांना सांगेन की, तुमच्या खात्याने यामध्ये मोठा घोटाळा केलेला आहे. शेततळ्यांसाठी पैसा दिला गेला म्हणून सांगितले गेले पण तेथे शेततळी बांधलीच गेली नाहीत. तरीही त्यासाठी पैसे काढले गेले. तेव्हा आपण पंतप्रधान पॅकेज योजना राबविली असेल तर त्याची श्वेतपत्रिका प्रसिद्ध करावी अशी आमची मागणी आहे. सभापती महोदय, मागील अधिवेशनामध शिवसेनेच्या एका आमदाराने तर या योजनेतून शेतकऱ्यांना कशी आणि कोणती मदत दिली गेली, पंप दिले गेले, भाकड गाई-म्हशी दिल्या गेल्या त्याचे प्रदर्शनच भरविले होते. ...

(यानंतर श्री. सरफरे .... एमएम 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

आबासाहेब तुमचे अधिकारी तुम्हाला बदनाम करावयास निघाले आहेत. आपण पंतप्रधान पॅकेजमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करा. पंतप्रधान पॅकेजच्या माध्यमातून राज्यामध्ये सर्वात जास्त भ्रष्टाचार कुठे झाला असेल तर तो विदर्भातील सहा जिल्हयामध्ये कृषी खात्यामार्फत झाला आहे. या कृषी खात्याची आपण सी.आय.डी. मार्फत, सी.बी.आय.मार्फत, ॲटी करप्शन खात्यामार्फत चौकशी करावी. या खात्यामधील प्रत्येक अधिकाऱ्याच्या मालमत्तेची चौकशी करावी. या अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्याच्या टाळूवरील लोणी खाण्याचा धंदा सुरु आहे. अशाप्रकारे जर तुमचे राज्य चालले असेल तर हा शेतकरी तुमच्या राज्यात जगू शकणार नाही.

सभापती महोदय, कर्जमुक्ती आणि कर्जमाफीबाबत माननीय सदस्य श्री. जयंत पाटील बोलणार आहेत. कर्जमाफी झाल्यानंतर 30 मार्च 2007 ची तारीख बदलून ती 31 डिसेंबरपर्यंत करावी म्हणून आम्ही घसा कोरडा होईपर्यंत ओरडत होतो. परंतु आमचे माननीय सहकार मंत्री म्हणजे "ठोकून देतो ऐसाजे" प्रमाणे तारीख 31 डिसेंबरपर्यंत वाढवली असे म्हणाले. त्यामुळे आम्ही सुखावलो. ही मागणी आम्ही याकरिता केली होती की, पंतप्रधान पॅकेज आणि मुख्यमंत्र्यांच्या पॅकेजमध्ये शेतकऱ्याच्या कर्जाचे हप्ते बांधले गेले त्यामुळे मागील थकित कर्जाचे हप्ते सुध्दा पाडले गेले. मुख्यमंत्र्यांच्या पॅकेजमधून ते थकित कर्ज माफ केले आणि त्यामधून पुन्हा नव्याने कर्ज दिले गेले. म्हणजे 25 हजाराच्या कर्जाचे हप्ते पाडून त्यावरील व्याज माफ केले व पुन्हा त्या शेतकऱ्याला नव्याने 25 हजाराचे कर्ज दिले गेले. ते कर्ज जूनमध्ये दिले गेले. त्यामुळे तो शेतकरी 31 मार्च या तारखेमध्ये बसला नाही. म्हणून मी माननीय सहकार मंत्र्यांना विनंती केली की, या योजनेमध्ये विदर्भातील सहा जिल्हयातील शेतकरी बसणार नाही. त्याकरिता ही तारीख 31 डिसेंबरपर्यंत पुढे ढकलावी. त्यामुळे विदर्भातील सर्व शेतकरी या योजनेमध्ये बसतील. ते म्हणाले की, आमची बैठक झाली असून तारीख 31 डिसेंबरपर्यंत पुढे ढकलली आहे. आम्ही त्यांना म्हटले की, त्यामध्ये पतसंस्थांचा समावेश कां नाही? त्यामध्ये सर्व वित्तीय संस्थांचा सहभाग आहे, त्याचे रेकॉर्ड आपण तपासून पहा. तरीसुध्दा माननीय सहकार मंत्री म्हणतात की, त्यामध्ये पतसंस्थांचा सहभाग आहे. सभापती महोदय, अलिकडे रिझर्व्ह बँकेकडून एक परिपत्रक पाठविण्यात आले आहे. त्यामध्ये पतसंस्थांचे नाव नाही. पतसंस्थांकडील कर्ज माफ होईल म्हणून शेतकरी सुखावला होता. परंतु 31 मार्च ही तारीख ठेवल्यामुळे विदर्भाच्या सहा जिल्हयातील 90 टक्के शेतकरी कर्जमाफीपासून वंचित रहाणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री. पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, विदर्भाच्या सहा जिल्हयातील शेतकऱ्यांचे 540 कोटींचे कर्ज माफ झाले तर पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे 5 हजार कोटींचे कर्ज माफ झाले. याकरिता संयुक्त महाराष्ट्रामध्ये विदर्भ सामील झाला नाही. अशाप्रकारे वर्षानुवर्षे विदर्भातील शेतकऱ्यांवर अन्याय व अत्याचार करणार असाल तर विदर्भातील शेतकऱ्याच्या नशिबी आत्महत्तेशिवाय दुसरा कोणताच मार्ग नाही. केंद्र सरकारच्या माननीय वित्त मंत्री श्री. चिदंबरम यांनी 60 हजार कोटींचे कर्ज माफ करण्याची घोषणा केली. सभापती महोदय, ज्यावेळी संसदेमध्ये कर्जमाफीची घोषणा झाली तेव्हापासून आजपर्यंत विदर्भामध्ये 225 आत्महत्या झाल्या. ज्यांच्याकडे 5 एकरावर जमीन आहे त्यांचे कर्ज माफ झाले नाही. बुलढाणा जिल्हयातील चिखली तालुक्यातील धोतराबंजी नावाचे गाज आहे. त्या गावातील शेतकऱ्याने स्वत:ची चिता स्वत:च रचली ही महाराष्ट्राला न शोभणारी गोष्ट आहे. त्या गावातील 65 वर्षाच्या म्हाताऱ्या शेतकऱ्याने लिहून ठेवले की, माझ्याकडे 5 एकर 20 गुंठे जमीन असल्यामुळे माझ्या अंगावरील 15 हजार रुपयांचे कर्ज माफ होऊ शकत नाही. त्याच्याकडे केवळ 20 गुंठे जमीन जास्त असल्यामुळे त्याचे कर्ज माफ झाले नाही. त्यामुळे चिखली तालुक्यातील धोतराबंजी नावाच्या गावातील शेतकऱ्याने स्वत:च स्वत:ची चिता रचली आणि सायंकाळी चार वाजता ती चिता पेटूवन त्यामध्ये उडी घेतली अशी शेतकऱ्याची अवस्था आहे. कर्जमाफी झाल्यानंतर सुध्दा शेतकरी आत्महत्त्या करीत आहेत त्याचे कारण हे आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

याचे कारण असे आहे की, या कर्जमाफीमध्ये एक मेख मारलेली आहे. शासनाकडून असे सांगण्यात आले की, आम्ही 5 एकरावरील शेतकऱ्यांना 25 टक्के सबसिडी देऊ आणि त्यांनी 75 टक्के कर्ज भरावे. पण शेतकरी हे कर्ज कसे भरणार आहे. असे शेतकरी किती आहेत ? याची मी आकडेवारी काढली आहे. संबंधित बँकाकडून सहा जिल्ह्यांमधील आकडेवारी घेतलेली आहे. माझ्या कडे जिल्हा बँकेचे अध्यक्ष श्री.कोरपेसाहेबांचे पत्र आहे. तुमच्याच पार्टीचे ते आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील (खाली बसून) : तशी काही ऑर्डर नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, केंद्र शासनाने एवढे कर्ज माफ केले आहे. विदर्भातील सहा जिल्हयातील शेतकऱ्यांसाठी किमान एक हजार कोटी रुपये लागणार आहेत. या शेतकऱ्यांसाठी तेवढे पैसे द्यावेत. एकदा तरी तेवढा उदारपणा दाखवावा. सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, 25 टक्क्याच्या बाबतीत ऑर्डर नाही. म्हणजे आता तो शेतकरी मरणार आहे. ज्या शेतकऱ्यांनी प्रामाणिकपणे, नियमितपणे कर्ज भरलेले आहे, तो प्रामाणिक आहे. त्या शेतकऱ्याने इमानदारीने कर्ज भरलेले आहे. कर्ज घेतले आणि भरले. आता तो शेतकरी काय म्हणणार ? तुम्हालाही याचा अनुभव येईल. आम्हाला सुध्दा अनुभव येत आहे. शेतकरी असे म्हणतात की, साहेब, आम्ही प्रामाणिकपणे कर्ज घेतो आणि ते परत करतो. जे प्रामाणिक आहेत, त्या लोकांची तुमच्या राज्यामध्ये कदर नाही. "पतिव्रतेच्या गळयात धोंडा, वेश्येला मणीहार" असे हे राज्य सुरु आहे. या राज्यात प्रामाणिक माणसाची कदर नाही आणि ही प्रामाणिक माणसेच . . . .

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांना सांगू इच्छितो की, काही गोष्टी रेकॉर्डवर राहू नयेत. ज्यांचे कर्ज माफ झाले आहे, जे थकबाकीदार होते, जे गरीब आहेत त्यांची वेश्ये बरोबर तुलना करणे हे भविष्याच्या दृष्टीने सुध्दा चुकीचे आहे. . . . .

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, पाच एकराच्या आतील शेतकऱ्यांनी प्रामाणिकपणे कर्ज भरलेले आहे. तुम्ही त्यांना पैसे परत देणार आहात काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, पण ज्यांनी कर्ज भरलेले नाही, त्यांची वेश्ये बरोबर तुलना होऊ नये. तसे रेकॉर्डवर येऊ नये. त्यामुळे माननीय विरोधी पक्षनेत्यांनी ते शब्द मागे घ्यावेत एवढेच मला सांगावयाचे आहे.

. . . .2एन-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ठीक आहे. मी माझे शब्द मागे घेतो. पण ज्या पाच एकर जमीन असलेल्या शेतकऱ्यांनी प्रामाणिकपणे नगद स्वरुपामध्ये पैसे भरलेले आहेत, त्यांना कर्ज माफी देणार आहात काय ? तुम्ही कर्जमाफी जाहीर करुन ढिंडोरे पिटले, आपल्या गळयामध्ये हात घालून घेतले, मेळावे घेतले. पण आता निवडणुकीच्या वेळेला कळेल. मी मागच्या वेळेस देखील बोललो होतो की, शेतकरी . . . .

श्री.आर.आर.पाटील : सन्माननीय सदस्यांनी हत्तीवरुन साखर वाटली.

श्री.पांडुरंग फुंडकर : तसे झाले नाही. आता तुम्ही निवडणुकीच्या काळामध्ये गावा-गावामध्ये गेल्यानंतर समजेल . . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, श्री.योगेश पाटील यांनी हत्तीवरुन साखर वाटली. तुम्ही हॅण्डलूमवाल्यांचे हजारो रुपयांचे वीज बिल प्रामाणिकपणे माफ केले, केवळ त्यांच्या दाढया कुरवाळण्याकरिता केलेले आहे. परंतु केव्हा तरी आग्री लोकांना कर्जमाफी मिळाली म्हणून संबंधितांनी हत्तीवरुन साखर वाटली.

श्री.आर.आर.पाटील : तेच सांगितले.

श्री.दिवाकर रावते : तेच नाही. सभापती महोदय, तुम्ही दाढया कुरवाळण्यासाठी हजारो रुपयांचे बिल माफ केले. परंतु केव्हातरी आग्री लोकांच्या वाटयाला 5-10 कोटी रुपयांची कर्जमाफी आली म्हणून त्यांनी हत्तीवरुन साखर वाटली. बिचाऱ्या आग्री लोकांनी त्यांच्या आयुष्यामध्ये कधी कर्ज माफी अनुभवली नव्हती.

श्री.आर.आर.पाटील : आम्ही तेच म्हटले आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, कर्जमाफीची घोषणा झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी माननीय कृषी मंत्री श्री.शरद पवार साहेबांनी घोषणा केली की, सावकारांची कर्ज फेडू नका. ही बातमी हेडलाईन मध्ये छापली होती. आता शेतकऱ्यांची अवस्था काय आहे ? ते मी सांगू इच्छितो. बँकेकडील कर्ज थकल्यामुळे आता शेतकऱ्यांना बँक उभे करीत नाही. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे 30 जूनची मुदत दिली होती, म्हणजे आम्ही 30 जून रोजी शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करु असे सांगितले होते. पण अजूनही सोसायट्यांची स्टेटमेंट तयार नाहीत. पण तुमचे सुदैव आणि महाराष्ट्र राज्याचे दुर्दैव असे की, पाऊस लांबला. हा पाऊस लांबला नसता तर खत, बियाणे आणि कर्जाच्या बाबतीत सरकारी पक्षाचा माणूस गावात जाऊ शकला नसता अशी महाराष्ट्रामध्ये स्थिती

. . . .2 एन-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होती. पण कधी-कधी परमेश्वरही तुमच्या बाजूने असतो, हे महाराष्ट्राचे दुर्दैवच आहे आणि याबाबतीत कोणाचा इलाज नाही. 30 जून रोजी कर्ज पुरवठा करु असे सांगितले. पण अजूनपर्यंत सोसायट्यांची स्टेटमेंट तयार झालेली नाहीत हे मी मघाशी सांगितले. त्यामुळे बँका शेतकऱ्याला एक नवा पैसा देखील देण्यास तयार नाहीत. माननीय कृषी मंत्री श्री.शरद पवार साहेबांनी सांगितले की, सावकाराचे कर्ज देऊ नका. मग लोक म्हणाले की, ठीक आहे. सावकाराचे कर्ज द्यावयाचे नाही. मग दुसऱ्या दिवशी तुम्हाला पुन्हा एकदा स्फुरण आले. माननीय कृषी मंत्री श्री.शरद पवार साहेबांनी सांगितल्यानंतर आपणही काही सांगावयास पाहिजे. मग आपण असे सांगितले की, सावकारांनी शेतकऱ्यांच्या जमिनी 15 दिवसामध्ये परत कराव्यात. पण त्यानंतर एका शेतकऱ्याला तरी जमीन परत करण्यात आली आहे काय?

श्री.आर.आर.पाटील (खाली बसून) : मी माहिती देतो.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना माहिती देतो. आजही संबंधिताच्या नावाने जमिनीची हक्क नोंदणी होत नाही. आजही 15-15 वर्षे तो शेतकरी पीक घेत आहे. माझे आजही तुम्हाला चॅलेंज आहे. खामगाव तालुक्यातील लासूरा गावामध्ये शिवसेनेचे कार्यकर्ते गेले. त्यांनी जबरदस्तीने जमीन पेरली आणि सावकाऱ्याने तेथे जाऊन संबंधित शेतकऱ्याला मारले. अजूनही तुमचे अधिकारी, एस.डी.ओ. हे सावकारांच्या दबावाखाली आहेत आणि महाराष्ट्रातील सर्वात मोठा सावकार तर तुमच्या सत्ताधारी पक्षामध्येच बसतो.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

हक्क नोंदणी, पेरे पत्रकाबाबत सांगू इच्छितो. जमीन मी पेरतो, जमीन माझी आहे. काही सन्माननीय सदस्य नाव विचारत आहेत. ते कोण आहेत हे सर्वांना माहीत आहे. सर्व महाराष्ट्राला ते माहीत आहे. ते पंढरपूरच्या गाडीला हिरवी झेंडी दाखवतात. हक्क नोंदणी, पेरेपत्रक याबाबत सांगू इच्छितो. आबासाहेब, ते कधीच त्या शेतात गेले नाहीत. फक्त रजिस्ट्री करण्यासाठी गेले. शेतकरीच जमीन पेरतो, शेतकरीच सर्व करतो आणि पटवारी हक्क नोंदणी, पेरे पत्रक यांच्या नावाने करतो. आबासाहेब, मागच्या अधिवेशनामध्ये मी आपल्याला आव्हान दिले होते की, बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यातील असिस्टंट रजिस्ट्रारच्या कोर्टासमोर जेवढ्या सावकारीच्या केसेस दाखल झाल्या त्यातील एकाही केसचा निकाल शेतकऱ्याच्या बाजूने लागला नाही. इतका पैसा त्या असिस्टंट रजिस्ट्रारने खाल्ला. एकाही केसचा निकाल शेतकऱ्यांच्या बाजूने लागला नाही. सर्व निकाल या सावकारांच्या बाजूनेच लागले. माननीय मंत्रिमहोदय श्री. शिंगणे साहेब, मी आपल्याला हात जोडतो. आपण त्यांना डी.डी.आर. म्हणून प्रमोशन देऊन बक्षीस दिले. त्यांना आपण डी.डी.आर म्हणून बुलढाणा येथे पाठवले. आबासाहेब, आपण मान्य केले होते की, वेगळ्या अधिकाऱ्यामार्फत खामगाव तालुक्यातील असिस्टंट रजिस्ट्रार कार्यालयातील सावकारांच्या सर्व प्रकरणांची मी फेर चौकशी करीन. आता तीन महिने गेले. एप्रिल महिन्यामध्ये आपण बोलला होता. आता जुलै महिना सुरु आहे. त्या प्रकरणांची फेर चौकशी झाला काय ? त्या केसेस पुन्हा काढल्या काय ? केसेस काढल्या जात नाहीत. जैसे थे परिस्थिती आहे. ते डी.डी.आर म्हणून आता बुलढाणा येथे जाऊन बसले. आता आपण काय चौकशी करणार आहात ? ज्या असिस्टंट रजिस्ट्रारने ते सर्व केले त्यांचे प्रमोशन झाले. ते डी.डी.आर म्हणून बुलढाणा येथे जाऊन बसले. आता त्यांच्या खालचा जो असिस्टंट रजिस्ट्रार आहे तो त्या केसेसची फेरचौकशी कशी करणार ? शेतकरी अशा या सर्व चक्रव्युहामध्ये अडकलेले आहेत. आपण सावकारी कायदा कसा आणणार आहात हे तो कायदा सभागृहासमोर आल्यानंतर समजेल. परंतु आबासाहेब, मी आपल्याला सांगू इच्छितो. शेतकऱ्यांची अवस्था अशी आहे की, आपल्या राज्यामध्ये अन्नदाता शेतकरी सुखी झाला नाही. आज या राज्यामध्ये शेतकऱ्यांची अत्यंत वाईट परिस्थिती झालेली आहे. या वर्षी दुष्काळाचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/ KGS/ MMP/

श्री. पांडुरंग फुंडकर .....

भीषण संकट दिसत आहे. पिण्याचे पाणी मिळणार नाही. मजुरांच्या हाताला काम मिळणार नाही. आणि एखादवेळी 50-50 एकर शेती करणाऱ्या शेतकऱ्याला सुध्दा खदानीवर जावे लागेल इतकी भयानक परिस्थिती आहे. या राज्यावर 1 लाख 58 हजार कोटी रुपयांचे कर्ज आहे. आता पैसे कोठून आणणार असे आपण सांगणार. या दुष्काळाचा सामना करण्यासाठी आपण पैशाची काय व्यवस्था केलेली आहे ? आज मी स्टेटमेंट वाचले की, आम्ही केंद्राला कळवू. मी त्याबाबत बोलत नाही. कारण नंतर आपण मला शब्द काढावयास लावता. आपण केंद्राच्या भरवशावर राज्य चालविता काय ? माननीय उपमुख्यमंत्री बसून सांगत आहेत की, केंद्राची मदत मिळते. मागच्या वेळी केंद्राचे पथक आले होते. त्यावेळी आपल्याला किती मदत आली ? या दुष्काळाचा सामना करीत असताना पिण्याचे पाणी, चारा, शेतमजुरांच्या हाताला काम, पाऊस जर पडला तर रब्बी पिकासाठी शेतकऱ्यांना बियाणे आणि खते देणे, कारण आता जर पाऊस पडला तर जेवढे शेतकरी रब्बीचे पीक घेतील त्यांच्या खिशात आता दमडी सुध्दा नाही. घरातील दागिने विकले गेले. घरातील महिलेच्या अंगावर एक साधा दागिना नाही अशी आज 50 एकरवाल्या शेतकऱ्यांची अवस्था झालेली आहे. अशा शेतकऱ्याला कसे जगविणार हा प्रश्न आहे. म्हणून मी या ठिकाणी मागणी करणार आहे. इंग्रजाचा जमाना, बाबा आदमचा जमाना जाऊ द्या. आणेवारी डिसेंबरमध्ये काढण्याची पध्दत आहे. कापूसच पेरला गेला नाही तर आपण आणेवारी कशी काढणार ? आपण कापसाचे झाड कोठे शोधणार ? आपण कापूस कोठे पाहणार ? आपल्याला कापसाचे बोंड कोठे दिसणार ? ज्वारीच पेरली गेली नाही तर आपल्याला कणीस कोठे दिसणार आणि कसणाचे दाणे मोजून आपण आणेवारी कशी काढणार ? म्हणून माझी अशी मागणी आहे की, आता ही आणेवारीची पध्दत बदलावी. हे अधिवेशन संपण्याच्या आत दुष्काळ जाहीर करा. मध्ये एक स्टेटमेंट आले होते की, कर्ज नव्हे थकबाकी माफ. माननीय श्री. पवार साहेबांचे हे स्टेटमेंट होते. शेतकरी पुन्हा संभ्रमात पडला. खरे काय आहे ? कर्ज नव्हे थकबाकी माफ म्हणजे कर्जमाफी नाही तर थकबाकी माफ आहे. शेतकऱ्यांनी काय समजावयाचे ? शेतकऱ्यांना संभ्रमात तरी टाकू नका. नक्की काय केले आहे ते सांगावे. पण वेळोवेळी वेगवेगळे निर्णय केले जातात.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..

वेळोवेळी वेगवेगळे निर्णय केले जातात. वेळोवेळी वेगवेगळी स्टेटमेंटस केली जातात. एक स्टेटमेंट केंद्राकडून केल्यावर राज्य सरकारकडून दुसरे स्टेटमेंट केले जाते. त्यामुळे सरकारने खाजगी सावकारीविरुध्दचा कायदा सभागृहासमोर आणावा. खामगावच्या केसेसच्या पुन्हा चौकशी केली जाईल. खामगावच्या सहाय्यक निबंधकाकडे जेवढया केसेस दाखल झाल्या होत्या त्याची फेरचौकशी केली जाईल आणि खरेच तो दोषी असेल तर त्यांच्याविरुध्द ताबडतोब कारवाई केली जाईल असे सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी खामगावच्या सहाय्यक निबंधकासंबंधी सभागृहामध्ये आश्वासन दिलेले आहे. ज्या शेतक-यांच्या जमिनी स्वत:च्या ताब्यात आहेत पण नावावर मात्र सावकाराच्या असतील आणि जर तहसीलदाराने आणि एस.डी.ओ.ने खोटे 7/12 तयार करुन ते सावकाराच्या नावे केले असतील तर त्यांच्यावरही कारवाई करण्याची गरज आहे, ती कारवाई आपण करणार आहे काय हे सांगितले पाहिजे. माझी आपल्याला हात जोडून विनंती आहे की, यामध्ये काहीही तांत्रिक बाबी पाहू नका. शेत मजूर हाताला काम मागत आहे, पाऊस नसल्यामुळे शेतकरी हवालदिल झालेला आहे. ग्रामपंचायतीने विजेचे बिल न भरल्यामुळे वीज मंडळाने गावातील विजेची कनेक्शन्स तोडली आहेत. त्यामुळे गावामध्ये विहिरीत पिण्यासाठी पाणी नाही. आज अनेक गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा सुरु आहे. आता महाराष्ट्रात नव्याने पाणी टंचाई निर्माण झाल्यामुळे टँकर्सद्वारे कसा पाणीपुरवठा केला जाणार आहे ते सांगितले पाहिजे. केवळ टँकरने पाणीपुरवठा करुन चालणार नाही, गावागावात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी लागणार आहे. रब्बीसाठी बियाणे आणि खताची व्यवस्था केली पाहिजे. गावामध्ये रोजगार हमी योजनेमधून मागेल त्याला काम दिले पाहिजे. सगळयात शेवटचा मुद्दा मी सांगतो की, लोकांना खाण्यासाठी धान्य द्यावे. लोकांना सडका गहू देऊ नका. केंद्र सरकारने ऑस्ट्रेलियातून सडका गहू आणला आहे. त्या गव्हाने राज्यातील गोदामे भरलेली असल्यामुळे आम्ही ती तपासली आहेत. प्रत्येक गोदामातील गव्हाचे नमुने आणून ते प्रयोगशाळेमध्ये पाठविले होते. त्यांनी असे सांगितले की, हा गहू जनावरांना सुध्दा खाण्यालायक नाही. आता सन्माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री.सुनील तटकरे यांच्या डोक्यामध्ये योजना सुरु आहे की, हा गहू बेकरीवाल्यांना द्यावयाचा.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

श्री.पांडुरंग फुंडकर..

बेकरीवाल्यांना हा गहू दिल्यावर त्यापासून ब्रेड तयार केला जाईल. कदाचित तो ब्रेड माननीय श्री.आर.आर.पाटील यांच्या प्लेटमध्ये सुध्दा येऊ शकतो. तो गहू फेकून द्यावा. अन्यथा दुष्काळाच्या नावावर तो सडका गहू गोरगरीबांना दिला जाईल. या लोकांसाठी धान्य कोठून आणणार आहात ? दुष्काळाच्या परिस्थितीमध्ये रोजगार हमी योजनेवरील मजुरांना स्वस्त दरात धान्याचा पुरवठा इ ाला पाहिजे, शासनाने ताबडतोब दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी करतो आणि मी माझे वक्तव्य संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

यानंतर श्री.शिगम...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : उपसभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी ब्रिटीशकालीन आणेवारी पध्दत बदलण्याची मागणी केलेली आहे. परंतु मी ब्रिटीशकालीन रब्बी आणि खरीप पिकांच्या बैठकांची पध्दत बदलण्याची प्रामुख्याने मागणी करीत आहे. खरिपाची बैठक घेतली जाते. त्या बैठकीला माननीय महसूल मंत्री आणि 500 अधिकारी जमतात. मात्र बैठकीतील आऊट पूट झिरो असते. नाममात्र बैठक घेण्याचे काम केले जाते. परिणामी अशा प्रकारचे गंभीर प्रश्न राज्यापुढे उभे राहातात. खरिपाची बैठक रेकॉर्डवर घेण्याचे काम केले जाते. या बैठकीमध्ये शेतीच्या प्रश्नावर आणि शेती उत्पादनावर किती चर्चा झाली असा प्रश्न कोणी विचारला तर त्याचे उत्तर "काहीही नाही" असेच द्यावे लागेल. आमच्या कोकण विभागाची खरिपाची बैठक दापोली कृषी विद्यापीठामध्ये भरली होती. कोकणचे सुपूत्र आणि महसूल मंत्री श्री. नारायण राणे हे त्या बैठकीला उपस्थित होते. आम्ही तीन-चार आमदारही त्या बैठकीला उपस्थित होतो. मी त्या बैठकीमध्ये राज्यात खतांची तीव्र टंचाई निर्माण होणार आहे, खतांचे नियोजन बरोबर नाही, असे ठासून सांगितले होते. कृषी मंत्री श्री. बाळासाहेब थोरात हे त्या बैठकीला हजर होते आणि त्यांनी सांगितले होते की, आपल्याकडे गरजेपेक्षा जास्त खत उपलब्ध आहे. उपसभापती महोदय, मी खात्रीपूर्वक सांगू इच्छितो की, खते आणण्याचे जे नियोजन करायला पाहिजे होते ते शासनाने केलेले नाही. ही खते एप्रिल महिन्यामध्ये आणून चालत नाहीत. खरे म्हणजे जानेवारी महिन्यापासून खतांच्या बाबतीत नियोजन करण्याची गरज असते. परदेशातून खतांची आयात करणे, त्यांचे बॅगिंग करणे आणि त्यांची वाहतूक करणे यासाठी 3-4 महिन्यांचा कालावधी लागतो. हा कालावधी अधिका-यांनी गृहीत धरलेला नाही. सन्माननीय विरोधी पक्षनेते यांनी शेतक-यांची बाजू चांगल्या पध्दतीने या सभागृहामध्ये मांडलेली आहे. मी शासनाकडे प्रामुख्याने अशी मागणी करीत आहे की, ह्या खरीप आणि रब्बीच्या बैठका किमान 4 महिने आधी घ्याव्यात. ह्या बैठकीच्या कामकाजाची पध्दत देखील बदलली पाहिजे. मी 8 वर्षे आमदार आणि त्याआधी 6 वर्षे बँकेचा चेअरमन म्हणून या बैठकांना हजर रहात आलो आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर हे देखील माझ्या पेक्षा जास्त वर्षे अशा बैठकांना हजर राहिलेले आहेत. अशा बैठकीमध्ये शेतीच्या नियोजनासंबंधी चर्चा होते काय असे जर कुणी विचारले तर

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयंत प्र. पाटील...)

त्याचे उत्तर "नाही" म्हणून मिळेल. यामुळेच आज राज्यामध्ये ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील हे सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. या चर्चेच्या वेळी ते सभागृहामध्ये उपस्थित राहिले असते तर बरे वाटले असते. ते असे म्हणाले होते की, "सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी हत्तीवरुन साखर वाटली होती." त्यांनी हत्तीवरुन साखर वाटणे योग्यच होते. कारण शासनाने सर्व 7/12 कोरे करु असे सांगितले होते. राज्याच्या सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि देशाच्या कृषी मंत्र्यांनी, शेतक-यांचा 7/12 कोरा झाला, सर्व शेतक-यांचे कर्ज माफ झाले असे सांगितले होते. आता आम्ही कोणाच्या शब्दावर विश्वास ठेवायचा ? त्यामुळे हत्तीवरुन साखर वाटायची की विमानातून वाटायची हे सत्ताधारी पक्षाने सांगण्याची गरज नाही. उपसभापती महोदय, या सभागृहामध्ये आणि सभागृहाच्या बाहेर शासनाचे प्रतिनिधी कर्ज माफ झाल्याचे सांगतात. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी मच्छिमारांची कर्ज वसुली ताबडतोब स्थगित करा असे सांगितले. परंतु बँकांच्या बैठकीमध्ये असे सांगितले गेले की ज्या बँकांचे प्रशासन नाबार्ड आणि रिझर्व्ह बँकेशी संलग्न आहे अशा बँकाचे आणि संस्थांचे कर्ज माफ करण्यात येईल. नियोजनाप्रमाणे मी माझ्या बँकेची 16 कोटीची कर्जमाफीची प्रकरणे दिली असताना केवळ दीड कोटी प्रकरणी कर्ज माफी मिळालेली आहे. ही ख-या अर्थाने शासनाने केलेली फसवणूक आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांना माझे म्हणणे पटेल.

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्री. जयंत प्र.पाटील....

सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे हया माझ्या मताशी सहमत असतील. सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांना सांगू इच्छितो की, महाराष्ट्रातील शेतक-यांकडे जेव्हा तुम्ही मते मागण्यासाठी जाल, त्यावेळी राज्यातील शेतकरी तुम्हाला दारासमोर उभा करणार नाही ही गोष्ट आपण लक्षात ठेवावी. या शासनाने सरळ सरळ राज्यातील शेतक-यांची फसवणूक केलेली आहे. या सभागृहात माननीय उप मुख्यमंत्री उपस्थित रहावयास पाहिजे होते. कोणी टोपी घालून, कोणी पगडी घालून, कोणी घोडयावर बसून मिरवणुकीत सामील होऊन शेतक-यांना कर्ज माफ झाले असे सांगत होते. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले हे देखील माननीय श्री. शरद पवार यांच्या मिरवणुकीत मागे उभे होते. सत्ताधारी पक्षाकडून वारंवार शेतक-यांच्या कर्जमाफीच्या घोषणा केल्या गेल्या. परंतु खरोखरच राज्यातील शेतक-यांना कर्ज माफी देण्यात आली आहे काय?या गोष्टीचा शोध घेण्याची आवश्यकता आहे. शासनाने कर्ज माफीची घोषणा करुन राज्यातील शेतक-यांची फसवणूक केली आहे, ही अतिशय गंभीर गोष्ट आहे. 1997 पूर्वी शेतक-यांनी कर्ज घेतलेले आहे, अशा शेतक-यांना या शासनाने कर्जमाफी दिलेली नाही. महाराष्ट्रात 1997 पूर्वी कर्ज घेतलेल्या शेतक-यांची संख्या 2 लाख 28 हजार एवढी आहे. 2 लाख 28 हजार शेतकरी शासनाच्या कर्जमाफीच्या सवलतीपासून वंचीत राहणार आहेत. 1997 पूर्वी घेतलेल्या शेतक-यांकडे 220 कोटी रुपयांची कर्जाची थकबाकी आहे. ती थकबाकी हे शासन माफ करणार नसल्यामुळे त्या शेतक-यांवर एक प्रकारे अन्याय केला जात आहे असे माझे म्हणणे आहे. 1997 पूर्वी कर्ज घेतलेल्या शेतक-यांवरील देखील कर्ज माफ करण्यात यावे अशी माझी शासनास विनंती आहे. या विषयाच्या अनुषंगाने माननीय विरोधी पक्ष नेते यांनी सहकार तसेच सिंचन विभागाच्या बाबतीत अतिशय चांगले विचार मांडले. मी या सभागृहात सहकार विषयावर ज्या ज्या वेळी बोललो, त्या त्या वेळी माननीय सहकार मला बोलले की, तुम्ही शेतक-यांची काळजी घेऊ नका. शेतक-यांकडे असलेले सर्व कर्ज माफ केले जाणार आहे. या सभागृहात माननीय सहकार मंत्र्यांनी कर्ज माफीच्या अनेक घोषणा केल्या. आज सभागृहात शेतक-यांच्या जिव्हाळयाची चर्चा होत असताना माननीय उप मुख्यमंत्री, सहकार मंत्री, सहकार राज्यमंत्री उपस्थित नाही. 1997 पूर्वी ज्या शेतक-यांनी कर्ज घेतलेले आहे, अशा सर्व शेतक-यांचे कर्ज माफ करण्यात यावे अशा प्रकारची मी या निमित्ताने

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील....

मागणी करतो. राज्यातील अनेक शेतक-यांनी नियमितपणे कर्ज फेडलेले आहे, त्या शेतक-यांना देखील शंभर टक्के कर्जमाफी दिली पाहिजे. माझ्या जिल्हयात 32 हजार शेतकरी कर्जदार आहेत. त्या कर्जदारांनी आपले कर्ज नियमितपणे फेडलेले आहे. माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, जर या शेतक-यांना कर्जमाफीचा लाभ दिला नाही तर पुढील वर्षी हे शेतकरी कर्ज फेडणार नाहीत. आपण बँकचे संचालक आहात. शेतक-यांच्या कर्जमाफीच्या बाबतीत काय परिस्थिती निर्माण झाली आहे याची आपणास देखील कल्पना आहे. शेतक-यांच्या कर्जमाफीच्या बाबतीत वस्तुस्थिती काय आहे ? त्याबाबतची माहिती सभागृहाला देण्यात यावी अशी माझी विनंती आहे. राज्यातील शेतक-यांच्या कर्जमाफीच्या बाबतीत ठोस निर्णय घेऊन त्यांना शासनाने दिलासा दिला पाहिजे. या सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांनी, माननीय सहकार मंत्र्यांनी सांगितले की, शेतक-यांवरील कर्जमाफीचा केंद्र सरकारचा निर्णय येऊ द्यावा. केंद्र सरकारचा निर्णय जर समाधानकारक नसेल तर बाकीच्या माफीची रक्कम राज्य सरकार भरेल. सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, शेतक-यांवरील कर्जमाफीच्या बाबतीत सभागृहात गप्प बसलात तर तुम्हाला काहीही मिळणार नाही. उलट तुम्हाला जे काही दिले आहे ते सुध्दा कॉंग्रेस पक्ष घेऊन टाकेन. कॉंग्रेस पक्ष कसा आहे यासंबंधी काही सत्ताधारी पक्षातील सदस्यांना कल्पना नाही. राज्यातील शेतक-यांवरील कर्जमाफीच्या संदर्भात शासनाने या सभागृहात आश्वासन दिले आहे. याच सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, केंद्र शासनाने कर्जमाफीची पूर्तता पूर्ण केली नाही तर ती पूर्तता करण्यास राज्य शासन कटीबध्द आहे. कटीबध्द असलेले शासन काय करीत आहे ? परंतु शासन आज तोंड लपवीत आहे. आज राज्यातील शेतक-यांसमोर जाण्यास या शासनास भीती वाटते आहे. शेतक-यांना पाहून हे शासन तोंड लपवीत आहे ही वस्तुस्थिती आहे. माझी या निमित्ताने मागणी आहे की, या राज्यातील शेतक-यांचा 7/12 उतारा कोरा करण्याची भूमिका या अधिवेशनापूर्वी जाहीर केली पाहिजे. राज्यातील शेतक-यांवरील कर्जमाफीच्या बाबतीत शासनाने किती बैठका घेतल्या ? माननीय विरोधी पक्ष नेते यांना सांगू इच्छितो की, आपण आता सहकारी राज्य बॅन्केवर संचालक म्हणून नाहीत. तुम्ही जिल्हा सहकारी बँकेवर संचालक आहात की नाही याची मला माहिती नाही. परंतु मी सांगू इच्छितो की,.....

यानंतर श्री. कानडे....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंद

(**सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. भास्कर जाधव**)

श्री. जयंत प्र.पाटील.....

एप्रिलपासून आजपर्यंत राज्य शासन दर आठवडयाला बैठका घेत आहे. मंत्रीमहोदय, जिल्हा उपनिबंधक, सचिव बैठकी बोलावितात आणि कर्जमाफी कशी द्यावयाची हे सांगतात. परंतु त्याठिकाणी नाबार्डचे अधिकारी येऊन सांगतात की, हे कोणत्याही नियमात बसणारे नाही. कर्जमाफी देणार नाही, आम्ही देऊ शकत नाही, तुम्हांला संमती देणार नाही ही खरी वस्तुस्थिती आहे.....

तालिका सभापती : सभागृहाची वेळ 5.00 वाजता संपत आहे. सभागृहाची वेळ 6.00 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, जो शेतकरी 75 टक्के कर्ज भरेल त्याला 25 टक्के सबसिडी शासन देणार आहे असे सांगितले जाते. प्रत्यक्षात नाबार्ड याला संमत्ती देत नाही. नाबार्डचे अधिकारी सांगतात की आम्ही अशी परवानगी देणार नाही. 75 टक्के आणि 25 टक्के फरक आम्हांला मान्य नाही. या चर्चेच्या निमित्ताने माझी प्रमुख मागणी अशी आहे की, 5 एकरावरील शेतकऱ्यांचे 100 टक्के कर्ज माफ झाले पाहिजे. माननीय सभापती महोदय, आपण कोकणातील आहात. मच्छिमारांचे प्रश्न आपणांस माहीत आहेत. 300 कोटींचे आणि 500 कोटींचे पॅकेज मच्छिमारांसाठी जाहीर करण्यात आले. परंतु प्रत्यक्षात मच्छिमारांना 5 रुपये सुध्दा मिळालेले नाहीत. मच्छिमार समाज कर्ज घेण्यापासून वंचित राहिला आहे. मच्छिमारांचे 100 टक्के कर्ज माफ करण्याची घोषणा करण्यात आली. परंतु ती घोषणा फसवी होती असे मला वाटू लागले आहे. राज्याच्या वतीने कारभार करीत असताना शासन याठिकाणी घोषणा करते. मंत्री आश्वासने देतात. मुख्यमंत्री याठिकाणी घोषणा करतात. कर्ज माफ झाले असे सांगितल्यानंतर मच्छिमार शेतकरी पैसे भरील काय? अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. शासनाने रेकॉर्ड पहावे. मच्छिमार आहेत, शेळया-मेंढया पाळणारे मेंढपाळ आहेत, डेरी, उपसा सिंचन सोसायटया आहेत. या सोसायटया शेतकऱ्यांच्या आहेत की नाबार्डच्या आहेत ? प्रत्यक्ष डायरेक्ट शेतकऱ्यांना कर्ज दिले असेल तरच कर्जमाफीचा विचार केला जाईल असे म्हणतात. सोसायटया चालविणारे शेतकरी आहेत की नाबार्डचे अधिकारी आहेत? असा प्रश्न निर्माण होतो. या सर्व प्रश्नांचा निर्णय या अधिवेशनात झाला

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.....

पाहिजे. सर्व शेतकऱ्यांच्या वतीने हे अधिवेशन या विषयापुरतेच चालवू. शासनाकडून याबाबतीत ठोस निर्णय घेऊन येथून घरी जाऊ. या अधिवेशनात शेतकऱ्याला दिलासा मिळावा असे मला वाटते. तीन दिवस चर्चा् चालली तरी चालेल. माझी विरोधी पक्षनेत्यांना आणि सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांना याबाबतीत विनंती आहे. सहकारमंत्री डॉ. पतंगराव कदम याठिकाणी उत्तर देतात आणि आपण निघून जातो. परंतु या अधिवेशनात असे होता कामा नये. या अधिवेशनात ठोस निर्णय घेऊन गावाला गेले पाहिजे आणि अशी भूमिका याठिकाणी मांडली पाहिजे. सभापती महोदय, मध्यंतरीच्या तीन वर्षाच्या काळात आपण सदनामध्ये नव्हता. तीन वर्षापूर्वी सहकार मंत्र्यांनी जाहीर केले होते की, पतसंस्थांनी सुध्दा शेतकऱ्याला कर्ज पुरवठा केला पाहिजे. अर्बन बँकांनी कर्ज पुरवठा केला पाहिजे आणि जर या संस्थांनी कर्जपुरवठा केला नाही तर त्यांच्यावर ॲक्शन घेऊ.

नंतर श्री. भोगले

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

तुमचे बोर्ड बरखास्त करु, तुम्हाला संचालक म्हणून आम्ही ठेवणार नाही हे शासनाने जाहीर केले. आता शासन म्हणते की, पतसंस्थांनी शेतकऱ्यांनी दिलेली कर्जे माफ होणार नाहीत. ते नाबार्ड व रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणाखाली नाही. मग राज्य शासन कोणती भूमिका घेणार आहे? राज्य शासन नाबार्डला कळविणार आहे की नाही? राज्य शासनाने स्वत:च्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची तरतूद करणार की नाही? यासंबंधीचे धोरण हे अधिवेशन संपण्यापूर्वी सभागृहाला कळले पाहिजे. रोज धरसोडीचे धोरण स्वीकारायचे, नवीन निर्णय घ्यायचा, घेतलेला निर्णय बदलण्याचे काम करायचे, निर्णय घेतल्यानंतर त्याची अंमलबजावणी करायची नाही. हे सरकार शेतकऱ्यांसाठी आहे की नाबार्डसाठी आहे? शेतकऱ्यांचे आहे की धनदांडग्यांचे आहे हे याठिकाणी प्रामुख्याने सांगितले पाहिजे. कर्जमाफीचा निर्णय होत नाही, त्यामुळे महाराष्ट्रातील हजारो शेतकरी कर्ज घेण्यापासून वंचित ठरले आहेत. आज परिस्थिती काय आहे? महाराष्ट्रातील 32 जिल्हयांमध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आहेत. त्यातील 5 बँका वगळता इतर बँकांकडे इक्विटी ठेवण्यासारखी सुध्दा परिस्थिती नाही. कर्जमाफी जाहीर केली. प्रत्यक्ष बँकांना पैसा पाठविला का? बँकांकडे एक रुपया देखील पाठविलेला नाही. आता शासन काय म्हणते? माझ्याकडे जी.आर.ची प्रत उपलब्ध आहे. नाबार्डने कळविले की, आम्ही तुम्हाला बॉण्ड देऊ, ते इक्विटीसाठी भरावेत. ज्यांच्याकडे पैसा नाही ते कर्जमाफीसाठी कुठून पैसा देणार? म्हणून माझी मागणी आणि विनंती आहे की, शासनाने अभ्यासपूर्वक उत्तर द्यावे. एक दिवस विलंबाने उत्तर दिले तरी चालेल. परंतु अभ्यासपूर्वक ठोस निर्णय या कर्जमाफी आणि दुष्काळाबाबत दिले पाहिजे.

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने या महाराष्ट्रातील तमाम शेतकऱ्यांच्या वतीने आणि कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या वतीने मी मागणी करतो की, हे शेतकरी कर्जमुक्त कसे होतील यादृष्टीने शासनाने धोरण स्पष्ट करावे एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आताच मला माननीय अवर सचिव श्री.विलास आठवले यांच्याकडून एक पत्र प्राप्त झाले आहे. विधानपरिषदेचा वर्धापन दिन साजरा होणार आहे. या वर्धापन दिनाच्या निमित्ताने 'संसदीय लोकशाहीमध्ये वरिष्ठ सभागृहाचे स्थान, जबाबदारी आणि भूमिका' या विषयावर चर्चा होणार आहे. कशासाठी चर्चा करायची? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. एक तर एवढ्या गंभीर विषयावरील आमची सभागृहातील उपस्थिती आणि सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी जे काही सांगितले ते सभागृहाला अवमानित करणारे आहे असे अधिकृतरित्या जाहीरपणे बोलतो. या सदनाच्या काही प्रथा आणि परंपरा आहेत. या सदनामध्ये किमान एक तरी मंत्रीमहोदय हजर असावेत. बाकी राज्यमंत्री महोदयांनी काम निभावून नेले तरी चालते. परंतु ज्यावेळेला विशिष्ट प्रकारची चर्चा या सदनामध्ये सुरु होते त्यावेळेला त्या त्या विभागाच्या मंत्रीमहोदयांनी उत्तर देणे हे बंधनकारक आहे. घटनात्मक आहे. घटनेने त्यांच्यावर ती जबाबदारी आहे. त्यांनी घेतलेली शपथ आहे त्या शपथेची बांधिलकी आहे.

(नंतर श्री.खर्चे.....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

आणि ज्यांना हा विषय मांडण्याची वेळ येईल, त्या त्या वेळी ते मांडतील की, सेकंड चेंबर किती महत्वाचे आहे, त्या सेकंड चेंबरमध्ये स्वीकारले आहे आणि हे दुसरे सभागृह असावे की नसावे, यासंबंधीची चर्चा दिल्लीपर्यंत झाली आहे. त्यावेळी असे सांगण्यात आले की, बाकी राज्यांमधील सेकंड चेंबर नसले तरी महाराष्ट्रातील दुसरे सभागृह हे राहिलेच पाहिजे. माननीय कृषी मंत्री, भारत सरकर यांचा लेख माझ्याकडे आहे परंतु तो मी सोबत आणलेला नाही. परवा तो लेख मी सभागृहात वाचून दाखविन. माननीय कृषी मंत्री हे सुध्दा याच सभागृहात बसत होते, विरोधी पक्षनेता म्हणून त्यांनी काम सुध्दा केलेले आहे. अशी या सभागृहाची परंपरा असताना या सभागृहात मंत्रीच येणार नसतील, उपस्थित राहणार नसतील तर भाषण तरी कशाला करावयाचे ? नियमाप्रमाणे एक मंत्री बसला आणि बाकीचे राज्यमंत्री असले तरी चालतील, आम्ही देखील मान्य केले. मला वाटते स्व. सुधाकरराव नाईक या राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांनी मंत्रिमंडळामध्ये उपमंत्र्यांची पदेही निर्माण केली होती. पण लाल दिव्याकरिता जीव खालीवर करणारे, सर्वस्व पणाला लावणारे पद मिळाल्यानंतर मात्र काम करण्यासाठी कुचराई का करतात हे मला समजत नाही. वास्तविक या अधिवेशनाचा दहा-बारा दिवसांचाच तर प्रश्न आहे. बाकीचे दिवस मजाच करायची आहे. मग आपण हरीण मारा, मासे मारा, काय खायचे ते खा, काय प्यायचे ते प्या. पण या सभागृहाचा अवमान करण्याचा अधिकार आपल्याला कोणी दिलेला आहे ? आम्ही कोणासमोर भाषणे करावयाची ? कोण त्याची नोंद घेत आहे. ही जबाबदारी कृषी मंत्र्यांची असताना ती जबाबदारी कोणी घेणार आहे की नाही ?

श्री. अनिल देशमुख : शासनाचा एक मंत्री म्हणून मी या ठिकाणी उपस्थित असून सन्माननीय सदस्यांच्या भाषणातील मुद्यांची नोंद घेण्यात येत आहे.

श्री. दिवाकर रावते : महोदय, यासभागृहाची हीच शोकांतिका आहे. असे असेल तर एकाच मंत्र्याने यथे बसाव, एकानेच पुरवणी मागण्या मांडाव्यात, बाकीचे येऊ सुदा नका. ज्यावेळेस मंत्री पदाची शपथ घेतली जाते त्याचा सरळसरळ विसर पडतो. म्हणून निदान जनाची नसेल तर मनाची तरी वाटली पाहिजे. माननीय मंत्र्यांनी मुद्दे घेत असल्याचे सांगितले, त्यांचा आम्ही आदर करतो. परंतु श्री. अनिल देशमुख यांना सभागृहात बसलेले पाहून बाकीचे मागच्या मागे निघून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

गेले. अगोदर माननीय वन मंत्री उठून गेले, त्यांच्या मागे बसलेले मंत्री महोदय नंतर निघून गेले, अशा प्रकारे एक एक करुन सर्वच मंत्री सभागृहातून निघून गेले. हाच सभागहाचा सन्मान ओ काय ? त्यानंतर आबा बोलले की, आले...आले...पण मलाकळत नाही, या सदनात आम्ही महत्वाच्य विषयाबाबत चर्चा करीत आहोत, शेतीच्या पाण्याचे व्यवस्थापन, परिस्थिती गंभीर त्यामुळे खताचा पुरवठा, बी-बियाणे, ज्या ठिकाणी विहिरीला पाणी असेल तेथे वीज पुरवठा आणि कर्ज पुरवठा यासंदर्भातील ही आजची चर्चा आहे. पण चर्चेशी संबंधित कोणीच मंत्री नाहीत. माननीय मंत्री श्री. अनिल देशमुख म्हणाले की, मी मुद्यांची नोंदघेतो. परंतु माझी त्यांना अशी विनंती आहे की, आपण यासंदर्भात काय निर्णय घेऊ शकणार आहात ? या खात्याच्या संदर्भात आपल्याला कोणता अधिकार आहे ? आपण डोंबिवलीचा रस्ता केला आणि तो वाहून गेला, त्याकडे लक्ष द्या.

श्री. अनिल देशमुख : महोदय, सन्माननीय सदस्यांच्या भाषणातील प्रत्येक मुद्याची गांभीर्याने नोंद घेण्यात येत आहे.

श्री. दिवाकर रावते : खालच्या सदनात माननीय मंत्री महोदय उपस्थित असतील परंतु माननीय राज्यमंत्री कोठे आहेत ? वास्तविक मंत्र्यांना असिस्ट करण्यासाठी राज्यमंत्री असतात परंतु अशा प्रकारे ते असिस्ट करतात काय ? ज्याप्रमाणे आम्हाला असिस्ट करण्यासाठी आमचे पी.ए. असतात त्याप्रमाणे मंत्र्यांचे असिस्टंट राज्यमंत्री ओत काय ? माननीय राज्यमंत्री महसूल यथे बसलेले आहेत, त्याच्यासमोर मी उघडपणे बालत आहे, आपल्याला कोणते अधिकार आहेत ?

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री. भास्कर जाधव) : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकरजी रावते हे या सदनातील ज्येष्ठ सदस्य आहेत, माजी मंत्री आहेत. त्यांना जे अनुभव आलेले आहेत ते अनुभव या ठिकाणी मांडत आहेत. त्यांचे मुद्दे महाराष्ट्राच्या हिताचेच असतात त्यामुळे सन्माननीय सदस्यांचे मुद्दे माननीय मंत्रीमहोदयांनी अधिक गंभीरपणे लिहून घ्यावेत. सन्माननीय कृषी मंत्रीमहोदयांनी सभागृहात उपस्थित रहावे म्हणून त्यांना निरोप देण्यात आलेला असल्यामुळे कृपया सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

श्री. पाशा पटेल : महाराष्ट्रातील शेतक-यांच्या जीवनमरणाच्या संदर्भात या ठिकाणी चर्चा सुरु असतांना माननीय कृषी मंत्र्यांनी अनुपस्थित राहणे योग्य नाही.

तालिका सभापती : सन्माननीय कृषी मंत्रीमहोदयांनी सभागृहात उपस्थित रहावे म्हणून त्यांना निरोप देण्यात आलेला आहे त्यामुळे कृपया सन्माननीय सदस्यांनी चर्चेस सुरुवात करावी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी सन्माननीय अनिल देशमुख यांना सांगू इच्छितो की, कल्याण शिळफाटा रस्ता वाहून गेलेला आहे. त्यासंदर्भात मी या ठिकाणी काही बोलत नाही परंतु कृषी विभागावरील चर्चेचे मुद्दे माननीय अनिल देशमुख कसे काय लिहून घेऊ शकतील. या ठिकाणी मी माननीय शरद पवार साहेबांचे नाव काढले तर काहींना इंगळया डसतात. मी जर कुटुंबाचा प्रमुख असेल तर कुटुंबावर जे काही आघात होतील, ज्या काही समस्या उत्पन्न होतील त्याला कुटुंब प्रमुख म्हणून मीच जबाबदार असतो त्यामुळे कृषी खात्याचा प्रमुख म्हणून कृषी मंत्र्यांनी या ठिकाणी उपस्थित राहणे आवश्यक आहे. विदर्भाचा घात झालेला आहे. यासंदर्भात माझी प्रतिक्रीया छापून आलेली आहे. शेतक-यांना कर्जमुक्ती मिळावी म्हणून आम्ही जीवाचे रान केले होते आणि कर्ज माफ केले जाईल या केंद्रशासनाच्या घोषणेमुळे शेतक-यांनी आनंद व्यक्त केला होता तसा आनंद आमच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनीही आनंद व्यक्त केला होता. परंतु खरा प्रकार काय आहे हे जसे नंतर कळते तसाच प्रकार शेतक-यांच्या कर्जमुक्तीच्या संदर्भात झालेला आहे. लहानांच्या चुका मोठयांनी पदरात घ्यावयाच्या असतात. कर्जमुक्तीची घोषणा झाल्यानंतर राष्ट्रवादी पक्षाने माननीय शरद पवार साहेबांची सभा आयोजित केली होती म्हणून काँग्रेस पक्षाने माननीया सोनिया गांधीची सभा आयोजित केली होती. शेतक-यांना कर्जमुक्ती मिळेल, सातबारा कोरा होईल म्हणून शासनाने डांगोरा पिटला होता परंतु माननीय शरद पवार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

साहेबांनी सांगितले की, "कर्ज माफी केली जाणार नसून थकबाकी माफ केली जाणार आहे." नवीन कर्ज शेतक-यांना मिळू शकेल. कर्जमुक्तीच्या संदर्भात आपले ज्येष्ठ नेते एक सांगतात तर आपण दुसरेच सांगतात. मुलगा चुकत असेल तर बापाला मुलाला समजून सांगावे लागत असते तोच प्रकार याही ठिकाणी झालेला आहे. सभापती महोदय, मी कर्जमुक्तीच्या संदर्भात या ठिकाणी काही बोलणार नाही. या चर्चेच्या वेळी सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील उपस्थित राहिले असते तर अधिक चांगले झाले असते. या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती दराडे यांनी 5 एकराच्या आतील कर्जमुक्तीच्या संदर्भात बरीच आकडेवारी सांगितलेली आहे. बीड जिल्हयाला एवढी एवढी कर्जमाफी मिळालेली आहे असे त्यांनी सांगितलेले आहे. खरे म्हणजे कर्जमुक्तीच्या संदर्भात त्यांनी जी काही आकडेवारी दिलेली आहे ती माझ्याकडील आकडेवारीशी टॅली होत नाही. त्यांनी मराठवाडयाच्या संदर्भात आकडेवारी दिली परंतु आकडेवारी नीट कोणालाही माहिती नाही. मग नाबार्डने सांगितले आहे की, आपण आकडेवारी जाहीर करु नका ही आकडेवारी पुन्हा चेक करावी लागणार आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

सभापती महोदय, कर्ज माफीच्या संदर्भात केन्द्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी जे काही वक्तव्य केलेले आहे ते फार मोलाचे आणि महत्वाचे आहे. तसेच ते कर्ज माफीसंबंधी नक्की उलगडा करणारे आहे. ही कर्ज माफी अशा प्रकारची आहे की, बॅन्कांना पहिला हप्ता नोव्हेंबर महिन्यात मिळणार आहे आणि उरलेले पैसे तीन वर्षात मिळणार आहे. आदरणीय केन्द्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी असे सांगितले आहे की, नोव्हेंबर महिन्यात बॅन्कांना पहिला हप्ता मिळणार आहे. शेतकरीसुध्दा पैसे भरत नसल्यामुळे महाराष्ट्रातील वित्तीय संस्थांकडील तिजोरीत पैसे शिल्लक नाहीत त्यामुळे एक हजार 980 कोटी रुपये आता ॲडव्हान्स द्यावेत व नोव्हेंबर महिन्याचा जो पहिला हप्ता मिळणार आहे त्यातून ही रक्कम वळती करुन घ्यावी अशा प्रकारचे अधिकृत निवेदन. केन्द्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी केले होते. शेतक-याविषयी वाटणा-या काळजीतून त्यांनी हे निवेदन केलेले आहे. हा विषय टीका करण्यासारखा नाही. ही गोष्ट त्यांच्याही लक्षात आली होती. कर्ज माफीचा विषय फक्त कृषी मंत्र्यां पुरताच मर्यादित नाही. कर्ज माफी जरी जाहीर केलेली असली तरी त्यासंबंधीची रक्कम कशी द्यावयाची हे केन्द्रीय वित्त मंत्री श्री.चिदंबरम यांच्या हातात आहे. त्यामुळे या कर्ज माफीचे पैसे बॅन्कांना ताबडतोब मिळणार नाहीत. त्यासाठी पहिला हप्ता नोव्हेंबर महिन्यात मिळणार असून उरलेले हप्ते पुढच्या तीन वर्षात मिळणार आहेत. त्यामुळे एक हजार 890 कोटी रुपये किंवा एक हजार 860 कोटी रुपये ॲडव्हॉन्स म्हणून द्यावेत व ते पैसे नंतर वळते करुन घ्यावेत. अशा प्रकारचा कर्ज माफीसबंधी असलेला ठणठणपाळ त्यांनीच स्वतः सांगून टाकला आहे. कर्ज माफीसंबंधीची ही दुर्दशा आहे. शेतक-यांना नवीन कर्ज देण्यासाठी पैसे उपलब्ध करुन द्यावयाचे असेल तर त्यासाठी बॅन्कांकडे आज पैसे उपलब्ध नसल्यामुळे ते द्यावेत अशी विनंती त्यांनी नाबार्डला केलेली आहे.

सभापती महोदय, कर्जमाफीसंबंधी आज अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. आज शेतक-यांना कर्ज देण्याकरिता बॅन्काकडे पैसे नाहीत. कर्ज माफीसंबंधीच्या याद्या लावण्यात आल्या आहेत. तत्पूर्वी अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे की, पत पुरवठा संस्थांनी 31 मार्च 1997 पूर्वी दिलेले कोणतेही कर्ज माफ करण्याच्या संदर्भात केन्द्र सरकारने अर्थसंकल्पाच्या वेळी निर्णय जाहीर केला होता. अशा प्रकारे एकूण 220 कोटी रुपयाच्या संदर्भातील विषय मांडण्यात आला आहे.या चर्चेच्या निमित्ताने मला एक प्रश्न विचारावयाचा आहे. आम्ही या ठिकाणी विरोधी पक्ष

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

म्हणून सरकारवर टीका करण्यासाठी उभे राहत आहोत. व्यक्तिगत आकसाचा देखील येथे प्रश्न येत नाही. आज मी विरोधी पक्षात आहोत परंतु उद्या कदाचित मी सत्ताधारी पक्षात असू शकेल आणि तुम्ही कदाचित येथे असाल. तेव्हा विरोधी पक्षाने केलेली टीका सत्ताधारी पक्षाने सहन केली पाहिजे. कारण त्यासंबंधीची जबाबदारी आपण स्वीकारलेली आहे. एकदा पालकत्व स्वीकारल्यानंतर गुण दोषासहित सर्व जबाबदारी स्वीकारली पाहिजे. शेतक-यांकडील कर्ज माफ करण्यासंबंधी त्यावेळी सांगण्यात येत होते. तेव्हा या चर्चेच्या निमित्ताने सभागृहातील उभय सन्माननीय सदस्यांना एक प्रश्न विचारावयाचा आहे त्या प्रश्नाचे जर त्यांनी उत्तर दिले तर मला आनंद होईल. 1997 पूर्वी शेतक-यांना छोटे छोटे कर्ज देण्यात आले होते, नाबार्डकडून काही कर्ज देण्यात आले होत. त्यावेळी दहा हजार रुपयांचे कर्ज देण्यात आले होते हे आपल्याला सुध्दा माहीत आहे. परवा सुध्दा एका शेतक-याने आत्महत्या केली होती. त्याच्याकडे अडीच एकर शेती होती आणि 1997 पूर्वीचे त्याच्यावर कर्ज होते ते कर्ज माफ न झाल्यामुळे त्या शेतक-याने आत्महत्या केली होती. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मघाशी बुलढाणा येथील ज्या शेतक-यांच्या आत्महत्येचा उल्लेख केला होता ती आत्महत्या वेगळी होती. आणि मी जे सांगत आहे ती अकोला येथील शेतक-याने केलेली आत्महत्या वेगळी आहे. ज्यावेळी हा प्रश्न निर्माण झाला होता त्यावेळी कर्जमाफी करुन सुध्दा जर शेतकरी आत्महत्या करीत असतील तर त्याची कारणे काय आहेत याचा राज्यकर्ते म्हणून आपण अभ्यास करावयास पाहिजे होता मी माघे सभागृहात असे म्हटले होते की,

शेतक-याच्या आत्महत्येबद्दल आपण सर्व मिळून चिंतन करावयास पाहिजे होते. सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी वा माननीय मंत्री महोदयांनी केन्द्र सरकारला, माननीय केन्द्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांना तसेच श्रीमती सोनिया गांधी यांना पत्र लिहिले असेल की, महाराष्ट्रातील कर्ज माफीच्या संदर्भातील अशी परिस्थिती असल्यामुळे आपण तातडीने या संदर्भातील पुढची पावले उचलून ही कर्ज माफी द्यावी जेणेकरुन या शेतक-यांची शेती पाच एकराच्या आत असतांनासुध्दा या शेतकयांचे जीवन उद्ध्वस्त होणार नाही. अशा प्रकारचे पत्र पाठविण्यात आलेले असेल तर ते या ठिकाणी वाचून दाखविण्यात यावे ते पत्र जर वाचून दाखविण्यात आले तर त्यामुळे मला खूप आनंद होईल. हे कर्तव्य आपण पार पाडले आहे काय ? आपल्या नेत्याने घेतलेल्या निर्णयाचा आनंद व्यक्त करण्याकरिता या सभागृहामध्ये आमची मुस्कटदाबी करुन

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

स्वत:चे ढोल वाजविण्यासाठी आपण उभे राहिला होता. तेव्हा आपण त्यांना अशा प्रकारचे पत्र पाठविले आहे काय, ? जर आपण पत्र पाठविले नसेल तर तुम्ही तुमच्या कर्तव्याला चुकला आहात असे होईल . या संदर्भात मंध्यतरी मंत्रिमंडळाची एक बैठक झाली होती आणि माननीय श्री. अनिल देशमुख हे त्या बैठकीला उपस्थित होते. ज्या पाच एकर शेती असलेल्या शेतक-याला कर्ज माफी मिळालेली नाही त्यांना काही तरी मदत मिळावी म्हणून आपल्या मंत्री मंडळाने 143 कोटी रुपये देण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यातून दोन प्रश्न निर्माण झाले आहेत. ज्या शेतक-याने कर्ज भरलेले नाही अशा पाच एकराच्या आतील शेतक-याचे संपूर्ण कर्ज माफ होणार आहे परंतु पाच एकराच्या आतील शेती असलेल्या ज्या शेतक-याने कर्ज भरलेले आहे त्यांना किमान मूळ मुद्दल तरी परत दिले पाहिजे. व्याज सोडून द्या.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ...

ज्यांनी कर्ज फेडले, कर्जावरील व्याज भरले ते लोक तुमच्या या कर्जमाफीमध्ये नाहीत, व्याजमाफीमध्ये देखील नाहीत. मात्र आता तुम्ही त्यांना सांगत आहात की, अशा लोकांना नवीन कर्ज 4 टक्के दराने देणार. पण 4 टक्क्यांचा हा नियम सर्वांनाच लागू आहे. मग ज्यांनी प्रामाणिकपणे कर्जफेड केली आहे, वेळेत कर्जफेड केली आहे त्यांना तुम्ही काय दिले आहे ? काहीही नाही. तेव्हा कर्जमाफीची ही अशा प्रकारे फसवाफसवी सुरू असताना नक्की काय घडले ते आता पुढे येऊ लागले आहे. सभापती महोदय, आपल्याला माहिती असेल की, जर माझी 7-8 एकर जमीन आहे आणि माझ्या जमिनीतून नाला जात असेल वा इतर नैसर्गिक गोष्टी जात असतील तर माझी पेरायची जमीन ही कमी येते मात्र रेकॉर्डवर, 7-12 वर ती जास्त दाखविलेली असते. त्यामुळे कर्जमाफीच्या बाबतीत या दृष्टीने पूर्ण विश्लेषण करून, यासाठी महसूल खात्याला पूर्णपणे कामाला लावून हे सारे व्यवस्थित केले गेले असते, त्या संबंधातील निश्चित आराखडा तयार केला गेला असता, 5 एकर जमीन कोणती समजायची हे ठरविले गेले असते तर अनेक शेतकऱ्यांना, त्यांच्या कुटुंबाला कर्जमाफीचा फायदा मिळाला असता, जो आज मिळालेला नाही. आमच्या कोकणामध्ये लोक भांडाभांडी करून वेगळे होतात. पश्चिम महाराष्ट्रात देखील सरळ लोक वेगळे होतात. तेथे तर अफाट जमीन आहे. परंतु विदर्भामध्ये मात्र पाच भावांमध्ये जमीन वाटली गेली असली तरी 7-12 वर मात्र ती वडिलांच्याच नावे, एकच असते. त्यामुळे साहजिकच त्याला कर्जमाफी मिळाली नाही. सभापती महोदय, मी ज्या आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाच्या घरांमध्ये गेलो तेथे पाहिले आहे की, एका एका घरामध्ये भिंत टाकून भाऊ-भाऊ वेगळे राहतात. कारण तेथे घर मोठे असते आणि त्यात राहणारे 4-5 भाऊ त्यात चार खोल्या वेगळ्या करून वेगळे-वेगळे रहात असतात. तीच त्यांच्या जमिनीचीही तऱ्हा असते त्यामुळे 7-12 वर जमीन एकच असल्याने ते सारे भाऊ कर्जबाजारीच राहिले. त्यांना कोणतीही माफी मिळाली नाही. म्हणूनच हे आकडे येथे येत आहेत. त्यानुसार मग पश्चिम महाराष्ट्रात कर्जमाफीमध्ये झुकते माप दिले गेले, पण विदर्भासाठी मात्र ते दिले गेले नाही असे दिसून येते. विदर्भातील 6 जिल्ह्यांमध्ये जे झाले ते एकट्या पुणे जिल्ह्यात झालेले आहे. तेव्हा अशा ज्या जमिनी आहेत, कुटुंबे आहेत त्यांचे नियोजन, आराखडे हे सरकारने कर्जमाफी देण्यापूर्वी करायला पाहिजे होती. पण तसे न झाल्याने शेतकऱ्यांवर मोठा अन्याय झाला आहे आणि हा अत्यंत गंभीर स्वरूपाचा अन्याय आहे.

.... एक्सएक्स 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

सभापती महोदय, आता बागायती जमीन आणि जिराईत जमीन हा प्रकारही यात आहे. बागायती जमिनीला 100 रूपये कर्ज मिळत असेल तर जिराईत जमिनीला 1 रूपया मिळते. कर्ज देताना लगेच त्याचे गणित बदलले जाते. बागायती जमीन असेल तर त्यासाठी भरपूर कर्ज मिळते. माझ्याकडे या संदर्भात एक निवेदन आले आहे. त्यातून एक मजेदार गोष्ट समोर आली आहे. पश्चिम महाराष्ट्रात ट्रॅक्टरचे कर्ज देखील या कर्जमाफी योजनेतून माफ झाले आहे. ट्रॅक्टरसाठी घेतलेले कर्ज त्या शेतकऱ्याने या कर्जमाफीसाठी असलेल्या कर्जामध्ये जोडले. आता त्याबद्दल आमची मुळीच तक्रार नाही. पण असे जर केले जाऊ शकत असेल तर मग आमच्या विदर्भातील शेतकऱ्याने विहिरीसाठी घेतलेले कर्ज का त्यात जोडले नाही ? विदर्भात विहिरीसाठी तर आमचा शेतकरी जीव घालवतो. तेव्हा ट्रॅक्टरबरोबर विहिरीवरील कर्जही जोडले असते तर त्या शेतकऱ्याचे विहिरीसाठीचे जे 20-25 हजाराचे कर्ज बाकी होते तेही माफ झाले असते आणि त्या शेतकऱ्याने सुटकेचा निश्वास तरी टाकला असता. तेव्हा आजच मला पैठण वरून एक फोन आला. तेथील एका शेतकऱ्याने विहिरीसाठी व्याजासह 12 हजाराचे कर्ज घेतले होते. तो सांगतो आहे की, मी त्यासाठी आतापर्यंत 15 हजार रूपये भरले आहेत तरीही 35 हजार बाकी आहे. 1986 पासूनचे हे कर्ज आजही चालूच आहे. तेव्हा सांगण्याचा मुद्दा हा की, ट्रॅक्टर प्रमाणेच विहिरीवरील हे कर्ज कर्जमाफी योजनेत जोडले असते तर विदर्भ-मराठवाड्यातील शेतकऱ्याला त्यातून खूप मोठा दिलासा मिळाला असता. तेव्हा या दृष्टीने शासनाने अभ्यास का केला नाही ? सभापती महोदय, मला आणखी दुसरे सांगावयाचे आहे. आता आपण येथे चर्चा केल्यानंतर पुन्हा एकत्र बसून चर्चा करू, शेवटी आपल्याला शेतकऱ्याचे भले करावयाचे आहे, ते कसे होईल हे आपण पाहू. ...

(यानंतर श्री. सरफरे .....वायवाय 1 ..

अशुद्धारित प्रत / शोधनेसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सरकारला त्याबाबतचा एक अहवाल देऊ शकलो असतो. परंतु सरकारची काम करण्याची इच्छाच दिसत नाही. ज्याप्रमाणे या सभागृहात मंत्री आपले कामकाज संपल्यानंतर धावत सुटतात, त्याप्रमाणे आमचा यामध्ये संबंध नसल्यामुळे आम्ही मोकळे आहोत असे सांगतात. सगळेच मंत्री मोकळे होतात असे मी म्हणणार नाही. आपल्यावर काही बांधिलकी आहे की नाही? राज्यातील जनता आपल्याकडे जबाबदारीने पहात आहे की नाही? हे राजकारणी आम्हाला काहीतरी मिळवून देतील, आमच्यासाठी भांडतील अशा आशेवर ते लोक आहेत. हे सर्व आपल्याकडे असतांना आपण का प्रयत्न केले नाहीत? याबाबत आता जून महिन्यामध्ये याद्या लागल्यानंतर हे सर्व प्रश्न उपस्थित होतील.

सभापती महोदय, धाराशीव जिल्हयातील एक घटना मी "ई" टीव्हीवर पाहिली आहे. तेथील स्टेट बँकेने इंग्रजीमध्ये याद्या लावल्या. त्यावेळी मी जिल्हाधिकाऱ्यांना ताबडतोब फोन केला. या राज्यात कायद्याने संपूर्ण मराठीकरण झाले असल्यामुळे ग्रामीण भागात मराठीकरण करण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे. केंद्र सरकारच्या खात्यापासून प्रत्येक बाबतीत मराठीकरण झाले पाहिजे. आणि होत नसेल तर आपण त्यांना नोटीस पाठवा, तुम्हाला तसा अधिकार आहे. त्या बँकेच्या ठिकाणी तो शेतकरी यादी पहाण्यास गेल्यानंतर कपाळाला हात लावून बसला होता. म्हणत होता की, मी याद्या वाचायला आलो परंतु इंग्रजीत याद्या असल्यामुळे मला त्या वाचता येत नाहीत. त्या शेतकऱ्याचे म्हणणे आणि त्या याद्या सुध्दा "ई" टीव्हीवर दाखविण्यात आल्या. म्हणजे एखाद्या शेतकऱ्याचे नशीब जर फुटलेले असेल तर ते भाषेमधून सुध्दा त्याला आडवे करुन टाकते. त्यावेळी टीव्ही वर त्या अधिकाऱ्याला दाखविण्यात आले. वास्तविक अशा अधिकाऱ्यांना बाहेर काढून बदडून काढायला पाहिजे. त्यासंबंधीचा कायदा येत आहे. अशा अधिकाऱ्यांना आपण कां सोडावयाचे? आपण वसूली कसली करीत आहात? तो माजोर अधिकारी म्हणतो आम्ही मराठीत यादी जाहीर करणार नाही, आम्ही इंग्रजीतच यादी जाहीर करणार. ही स्टेट बँक आहे, आम्ही केंद्रीय कर्मचारी आहोत अशाप्रकारे तो रुबाबात बोलत होता. धाराशीवसारख्या ग्रामीण भागातील ग्रामीण बँकेचा एक अधिकारी म्हणतो की, आम्ही इंग्रजीत केले आहे, ते बरोबर आहे. जर शेतकऱ्याचे अशा ठिकाणी ज्यावेळी नशीब फुटत जाते त्यावेळी आम्हाला वाटते की, आपण याठिकाणी कशासाठी बसत आहोत? हे शासन, सरकार एवढया छोटया छोटया गोष्टी कां पहात नाही? सभापती महोदय, या याद्या लावण्यासाठी जो विलंब झाला आहे त्याचा सुध्दा अभ्यास करण्याची गरज आहे. जून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

महिन्यानंतर लावलेल्या याद्यांमध्ये गोंधळ झालेला असून त्यामध्ये नक्की कुणाचा सहभाग आहे हे समजत नाही. सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मी मागणी करीत आहे. या सदनामध्ये पॅकेजच्या माध्यमातून अधिकृत झालेला भ्रष्टाचार मांडला, अधिकाऱ्यांचे नाव घेऊन भ्रष्टाचार मांडला, तालुकावार झालेला भ्रष्टाचार मांडला. त्यावेळी अशाप्रकारचा भ्रष्टाचार राज्यात झाला नाही अशी सरकारने शेखी मिरवली. आपण या अधिकाऱ्यांच्या बाजूने कशासाठी उभे रहाता? तुम्हाला ते काही पोहोचवितात काय? परवा मी दौऱ्यावर असतांना दै. सकाळच्या पहिल्या पानावरील बातमी वाचली. मंत्रालयामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांना भेटायला एक वयोवृद्ध आजीबाई आल्या होत्या. त्यावेळी त्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना सरळ विचारले की, साहेब मंत्रालयापर्यंत पाठविलेले पैसे तुमच्यापर्यंत पोहोचले काय? तिच्या घरासमोरचा बंधारा फुटल्यामुळे तिचे घर उद्ध्वस्त झाले. तो बंधारा फोडल्याचा आरोप अधिकारी तिच्यावरच करीत आहेत. तेव्हा ती म्हणते की, बंधारा फुटल्यामुळे माझे नुकसान झाले, ते माझेच पैसे आहेत. मी मंत्रालयापर्यंत पैसे पाठविले आहेत, माझे कुणी वाकडे करु शकत नाही. अशाप्रकारे या मंत्रालयाच्या दारापर्यंत 80 वर्षाची एक वयोवृद्ध म्हातारी येते, आणि ती मुख्यमंत्र्यांना सांगते. एवढया माजोरी अधिकाऱ्यांसाठी आपण कशासाठी राबत आहात? ज्याअर्थी, तुम्ही राबता त्याअर्थी तुमचा काहीतरी राबता असला पाहिजे. आणि जर नसेल तर त्याला तुम्ही कां चोपून काढीत नाही? एक तर तुम्ही तुमचा राबता मान्य करा. अधिकाऱ्यांना वाचविण्याची तुमची प्रवृत्ती या महाराष्ट्रात काय सांगत आहे? एका वयोवृद्ध म्हातारीने तुमचे धिंडवडे काढले आणि दै. सकाळ वर्तमानपत्राने फोटासहीत पहिल्या पानावर छापले आहेत. एका बाजूला एका महिलेने केरसुणी बनवून आणि त्या विकून 1 लाख रुपये विठ्ठलाच्या चरणी अर्पण केले त्याबद्दल माननीय मुख्यमंत्री विठ्ठलाच्या दरबारी तिचा सत्कार करतात त्याच वेळी मुख्यमंत्र्यांना पैसे पोहोचले कां म्हणून 80 वर्षाची वयोवृद्ध म्हातारी आजीबाई येऊन विचारते. यावरुन तुमच्या शासनाचे धिंडवडे निघावयाचे बाकी आहेत असे तुम्हाला वाटते काय? तरीही तुम्ही सर्व गुंडाळून इकडे येण्यास तयार नाही. सभापती महोदय, लाज कोळून प्यायल्यानंतर काय होते याचे उत्तम उदाहरण आपल्याला दिसत आहे. तुम्ही त्यांना किती दिवस संभाळणार आहात? माननीय श्री. अनिल देशमुख साहेब, तुमच्याकडे सर्व टोल नाके आहेत, त्यामुळे हे सुध्दा टोल नाके तुमच्याकडे दिले आहेत काय? याची मला शंका वाटते. सभापती

अशासकीय सत्र / शासनासाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

श्री.दिवाकर रावते...

महोदय, मागील अधिवेशन संपल्यानंतर आपणा सर्वांना लेखापरीक्षणाचा जो अहवाल देण्यात आला त्यामध्ये पॅकेजमध्ये झालेला संपूर्ण भ्रष्टाचार मांडला गेला.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

सर्व सन्माननीय सदस्यांना लेखा परीक्षणचा अहवाल प्राप्त झाला आहे. त्यामध्ये जे पॅकेज देण्यात आले आहे, त्या बाबतीत तालुक्यानिशी पूर्ण भ्रष्टाचार मांडला गेला आहे. माझी तुमच्याकडे प्रमुख मागणी आहे. माननीय पंतप्रधान यांनी माझ्या मराठवाड्यातील, विदर्भातील शेतकऱ्यांसाठी पॅकेज जाहीर केले. या भागातील पाच-सहा हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आणि जागतिक स्तरावर हा प्रश्न उपस्थित झाला. यामधून केवळ माझीच नाही, तर संपूर्ण देशाची बदनामी झाली होती. त्या बदनामीला सामोरे जाऊन, या देशाचे माननीय पंतप्रधान या भागामध्ये आले, त्यांनी सगळया ठिकाणी भेट दिली. पण त्यांना अधिकाऱ्यांनी काही घरातील लोकांच्या भेटी घेऊ दिल्या नाहीत, तेथे आम्ही गेलो होतो. पण त्यानंतर माननीय पंतप्रधान यांनी पॅकेज जाहीर केले. ते कशासाठी केले ? आपण सुदैवाने विदर्भातीलच मंत्री आहात. आमचे माननीय राज्यमंत्री डॉ.राजेंद्र शिंगणेसाहेबही विदर्भातील आहेत. ते त्याच पट्टयामध्ये रहाणारे असून चटके खात आहेत. मग ज्या पॅकेजच्या माध्यमातून आमच्या भागातील शेतकऱ्यांना थोडासा दिलासा मिळेल आणि आत्महत्या थांबतील असे वाटत होते. ते पॅकेज 70 टक्के खाल्ले आहे असा माझा उघड आरोप आहे. मी त्या दिवशी व्यथित होऊन, चिडून म्हणालो की, कोणाचीही दयामाया करु नका. त्यांच्या घरादारावरुन नांगर फिरवा, ज्यांनी माझ्या शेतकऱ्यांच्या घरावरुन नांगर फिरवला आणि केंद्र शासनाने, आमच्या माननीय पंतप्रधान यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी जो निधी दिला होता, तो फस्त केला. अशा लोकांच्या घरादारावर नांगर फिरवावा असे सांगितले होते आणि ही गोष्ट सिध्द झाली आहे. आम्ही बोलतो ते कदाचित गैर असेल. कारण आम्ही विरोधी पक्षाचे आहोत. मी माननीय मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांनी जी मुलाखत दिलेली आहे, त्याबाबतीत बोलणार आहे. परंतु आज जर तुम्हाला लेखी परीक्षणाव्दारे याबाबतीत पूर्ण अहवाल दिला असेल तर माझी आपल्याकडे मागणी आहे की, पॅकेजच्या संबंधात पूर्णपणे चौकशी करावी, यासाठी न्यायालयीन चौकशी करावी. किंवा त्यासाठी निवृत्त न्यायाधीशांची नेमणूक करावी आणि याबाबतीत फास्ट ट्रॅक कोर्ट निर्माण करुन सर्व संबंधितांवर खटले दाखल करावेत. या हरामखोरांना तुरुंगामध्ये जाऊ द्या. येथील शेतकऱ्यांना लुबाडणाऱ्यांना, त्यांच्या टाळूवरील लोणी खाणाऱ्यांना तुरुंगामध्ये जाऊ द्या. यामध्ये केंद्र शासनाचा, माननीय पंतप्रधान, माननीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांचा काय दोष आहे ? तुमचा नेता बदनाम होत आहे याबद्दल तुम्हाला काही वाटत नाही काय ? आम्ही दोन शब्द बोलल्यानंतर ताडताड ....

. . . .2 झेड-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

फुटाण्यासारखे उठून उभे रहाता. तुमच्या नेत्यांना बदनाम करणारी अधिकाऱ्यांमध्ये जी अवलाद बसलेली आहे, त्यांना नेस्तनाबूत करणारे प्रशासन निर्माण करण्यासाठी तुम्ही तुमची सगळी प्रतिष्ठा का पणाला लावत नाही ? हा माझा तुम्हाला प्रश्न आहे. तुम्हाला असे वाटत नाही का ? यामुळे माननीय कृषी मंत्री श्री.शरद पवारसाहेब बदनाम होत आहेत ? यामुळे माननीय पंतप्रधान बदनाम होत आहेत ? माननीय पंतप्रधान विदर्भामध्ये येतात आणि पॅकेज जाहीर करतात. ही आम्हाला आमच्यासाठी गौरवाची बाब वाटली. कारण या भागातील शेतकऱ्यांसाठी माननीय पंतप्रधान आले आणि त्यांनी फक्त या सहा जिल्ह्यांसाठी पॅकेज जाहीर केले. पण ते अधिकाऱ्यांनी खाल्ले. माननीय श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब, याबाबतीत न्यायालयीन चौकशी करण्यात यावी अशी मी मागणी केली आहे. यासाठी फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन करा आणि जे भ्रष्टाचारामध्ये अडकलेले आहे, त्यांना तुरुंगामध्ये पाठविले जाईल अशा प्रकारचा बंदोबस्त करावा. नाहीतर तुमच्यापर्यंत हे पॅकेज पोहोचले आहे असा आम्ही त्याचा अर्थ लावू आणि त्या पॅकेजमध्ये तुमचे पाप धुतले गेले असेल तर येणाऱ्या निवडणुकीमध्ये या पापाचे धनी म्हणून तुम्हाला माफी मिळणार नाही हे मी येथे नमूद करीत आहे. हे सर्व सांगत असताना परत आकडेवारी कशासाठी वाचावयाची ? माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी वाचली आहे. एकंदर नगर, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली या भागासाठी 5000 कोटी रुपये आणि अमरावती, यवतमाळ, भंडारा, चंद्रपूर, वर्धा, नागपूर, बुलढाणा, अकोला या भागासाठी 1573 कोटी रुपये आहेत. ही सर्व आकडेवारी आलेली आहे. दै.सकाळ या वर्तमानपत्राची "ॲग्रो वन" ही जी पुरवणी आहे, त्यामध्ये सर्व माहिती व्यवस्थितपणे दिली जाते. मी दै.सकाळ या वर्तमानपत्राला धन्यवाद देतो.

सभापती महोदय, बि-बियाणांच्या बाबतीत काय सांगावयाचे ? कर्जमाफीचा विषय थांबवित असताना मला एक गोष्ट प्रामुख्याने सांगावयाची आहे. याठिकाणी माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील देखील बोलले आहेत. माननीय सहकार मंत्री डॉ.पतंगराव कदमसाहेब, या सदनामध्ये जे बोलले आहेत, त्याप्रमाणे घडलेले नाही. आम्ही त्यांना डिवचून-डिवचून बोललो आणि त्यांना सांगितले की, अहो, पतंगराव तसे घडलेले नाही. परंतु ते म्हणाले की, "मी सांगतो ना." माझी एक विनंती आहे की, माननीय सहकार मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी सदनाची दिशाभूल केली म्हणून आम्ही हक्कभंग दाखल करणार आहोत.

. . . .2 झेड-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

आणि ही बाब मी माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांना त्या उद्‌गारासहित सांगितलेली आहे. ते केवळ आपल्या पक्षाचे ज्येष्ठ मंत्री आहेत, भावी मुख्यमंत्र्यांच्या शर्यतीमध्ये आहेत म्हणून त्यांना माफी मिळता कामा नये. जर त्यांना सदनाचे गांभीर्य नसेल तर त्याबाबतीत हक्कभंग दाखल करुन घेण्यात यावा असे मी यानिमित्ताने सुतोवाच करीत आहे. या सदनाला कोणी गृहीत धरु नये. शेतकऱ्याला कोणी मन मानेल त्याप्रमाणे सांगू नये. पण या सदनामध्ये एक माननीय मंत्री महोदय जेव्हा सांगतात. तेव्हा सगळे बंद करण्यात आले. मग सोसायटीपासून सगळीकडील आपले कर्ज माफ झाले असे शेतकऱ्याला वाटले.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

पण आज तो कपाळाला हात लावून बसला आहे. सोसायट्या बुडाल्या. ज्यांच्यावर कर्ज आहे त्यांच्या बाबतीत तर सोडाच पण सोसायटीवाले बुडाले. त्यांची आता गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे. एका मंत्रिमहोदयांच्या निवेदनामुळे या सगळ्या गोष्टी इतक्या गंभीर झालेल्या आहेत. आपण त्यांच्यावर हक्कभंग आणू. आपण तो दाखल करुन घ्यावा अशी विनंती करतो. त्यासंदर्भामध्ये त्यांना त्याचा जाब द्यावा लागेल आणि जर त्यांनी यासदनाचा हक्कभंग केला असेल तर नुसती नैतिकदृष्ट्या जबाबदारी टाकली तरी त्यांच्यावर राजीनामा देण्याची पाळी येईल. कारण विशेष हक्क समितीचे प्रमुख आदरणीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी साहेब आहेत. आता ते सभागृहात उपस्थित नाहीत. मी त्यांना सांगतो की, आपण फास्ट-ट्रॅक कोर्टासारखे ते प्रकरण चालवावे. या सदनामध्ये एखादी बाब सहज गमतीने धेणे कसे असते ते त्यांना समजू द्या.

सभापती महोदय, मी बी-बियाणांच्या बाबतीत एकच सांगू इच्छितो. परवा औरंगाबादला बी-बियाणाची एक मोठी कार्यशाळा झाली. बरेच शेतकरी आले होते. त्या कार्यशाळेमध्ये खूप चर्चा झाली. ती सगळी चर्चा या ठिकाणी मांडून मी वेळ घेणार नाही. बी-बियाणांची चर्चा त्यासंबंधीचे जे बिल येणार आहे त्यावेळी करु. परंतु त्या कार्यशाळेमध्ये जे सांगितले गेले त्यामधील एका शेतकऱ्याची व्यथा मी या ठिकाणी मांडतो. म्हणजे आपल्याला सहज शितावरुन भाताची परीक्षा करता येईल. कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी आभारप्रदर्शन होत असताना मध्येच एक शेतकरी उभा राहिला. त्यांनी उपस्थित मान्यवरांना संबोधित करुन सांगितले. तो वर्धने येथील रहिवाशी आहे. त्याच्याकडे साडेपाच एकर शेती आहे. पिनॉक कंपनीचे बियाणे खरेदी करुन त्याने मका लावला. त्याचे 60 टक्के नुकसान झाले. मात्र त्याच्या गाऱ्हाण्याकडे कृषी अधिकारी व ग्राहक मंचाने दुर्लक्ष केले आहे. सहा महिन्यांपासून त्याला न्याय मिळत नाही. हे ऐकून कृषी आयुक्तांनी त्यांना न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले. एक शेतकरी आपले झालेले नुकसान सांगत होता. अकोल्यात झालेले नुकसान मला आठवते. बी-बियाणाच्या कायद्यावर बोलताना मी हे सर्व बोलणार आहे. परंतु एका शेतकऱ्याचे नुकसान झाल्यानंतर तो सहा महिने हेलपाट्या घालतो आणि आमचे कृषी अधिकारी न्याय देत नाहीत. मग आमचे कृषी मंत्री काय करीत आहेत ? आता मी काही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

श्री. दिवाकर रावते .....

रामायणातील दाखला देणार नाही किंवा आणखी कोठले दाखले देणार नाही. परंतु राजा कसा असावा ? राज्यातील एका माणसाने जरी आपली भावना व्यक्त केली तरी तिचा आदर करणारा आणि कारवाई करणारा राजा असावा. तो संस्कार ज्या मातीत घुसला आहे त्या मातीमध्ये कृषी खात्याचा भ्रष्टाचार इतका जमिनीखालचा आहे की, तो कोणाला दिसत नाही आणि म्हणून कोणी बोंबलत नाही. एवढा प्रचंड भ्रष्टाचार आहे. बाकीचे भ्रष्टाचार दिसतात. रस्त्याचे दिसतात, पाटबंधाऱ्याचे दिसतात. समाजकल्याणचे दिसतात. अर्बन खात्याचे तर काही बघावयास नको. पण जशी गुप्त झालेली सरस्वती आहे तशी कृषी खात्यामध्ये गुप्त महालक्ष्मी वाहते. जरा माती काढली की, सरस्वतीचे जसे पाणी दिसते तसे ते सगळे एक एक अधिकारी आहेत. त्याच्यातूनच हे खताचे प्रकरण निर्माण झाले आहे. आपण ऐकले तर आपल्याला धक्का बसेल. सभापती महोदय, खताचे काय झाले ? बातम्या कशा आहेत ते आपण बघावे. बातम्या जोरदार आहेत. "मुख्यमंत्र्यांच्या लातुरात अभुतपूर्व खत टंचाई, खतासाठी शेतकऱ्यांनी केली जाळपोळ" अशी बातमी आहे. मी सगळीकडे गेलो होतो. भाऊसाहेब, आपण निवडणुकीसाठी तिकडे होता म्हणून जात होता पण मी मुद्दाम गेलो होतो. मी खिजवण्यासाठी नव्हे तर परिस्थिती पाहण्यासाठी गेलो होतो. "नांदेड जिल्ह्यात मुखेड देगलूरला शेतकऱ्यांचा खतासाठी रास्ता रोको", "हिंगोली, वसमत, शेणगाव, शेतकऱ्यांनी इतर खत घेऊन जाणाऱ्या गाड्या अडवल्या.", "परभणी, रटना, पेडगाव येथे खतासाठी शेतकऱ्यांचे उग्र आंदोलन, पोलिसांचा आंदोलकांवर लाठीमार", "उस्मानाबाद जिल्ह्यात खतासाठी उग्र निदर्शने, शेतकऱ्यांनी केली दगडफेक" अशा बातम्या आलेल्या आहेत. सभापती महोदय, माझ्याकडे कॅसेट आहे. रक्तबंबाळ झालेले शेतकरी, लाठ्या खाणारे शेतकरी यासंदर्भातील सी.डी. माझ्याकडे आहे. आता या ठिकाणी दाखवता येत नाही. ती सोय झाली तर तेही दाखवता येईल. आता 100 कोटीचे नवीन काम होत आहे. सचिव पण चांगले आहेत. आपल्या कारकिर्दीत 100 कोटीचा दुरुस्तीचा प्रकल्प काढला की, सगळे व्यवस्थित होऊन जाते. म्हणजे इमारतीचे मॉडर्नायझेशन. ते पण सहा महिन्यात होईल. आमच्या येथे लॅपटॉप येणार आहे. काय होणार आहे ते बघू. पुढचे पुढे आहे. सभापती महोदय, मी सगळ्या जिल्ह्यात गेलो.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/ श्री.बरवडनंतर 17:45

श्री.दिवाकर रावते..

मी सर्वांना भेटलो. लातूर जिल्हयासाठी 45,416 मे.टन खत मंजूर झाले होते, प्रत्यक्षात 44 मे.टन आले. नांदेड जिल्हयासाठी 68,438 मे.टन खत पाहिजे होते, प्रत्यक्षात 35,000 मे.टन आले. उस्मानाबाद जिल्हयासाठी 1,91,900 मे.टन खत पाहिजे होते, 47 मे.टन देणार आहे असे सांगितल्यावर जून महिना उलटून गेला आहे, प्रत्यक्षात केवळ 14 मे.टन खात आले. परभणी जिल्हयामध्ये हाहाकार उडाला होता. 24,000 मे.टनाची मागणी होती, तेथे केवळ 4 हजार टन आले. हिंगोली जिल्हयात लाठीमार झाला आहे. तेथे 9,000 मे.टन इतकी तातडीची मागणी होती. तेथे केवळ 580 टन आले. पश्चिम महाराष्ट्रातील सांगली, कोल्हापूर जिल्हयामध्ये ऊसाची लागवड मोठया प्रमाणावर होत असल्यामुळे तेथे डीएपी खताची मोठी मागणी होती. पण डीएपीचे खत तेथे गेलेच नाही, त्यामुळे तेथील शेतक-यांच्या मनामध्ये कृषी मंत्र्यांविरुध्द तर फारच असंतोष आहे. पुढच्या हंगामाध्ये साखर कारखान्यामध्ये नोव्हेंबरमध्ये ऊस पाठवावयाचा आहे. तेथे पाणी उपलब्ध आहे त्यामुळे ऊसाला खत घालायचे आहे. पण अनेक शेतक-यांना अजून नांगरट करावयाची आहे, नांगरणीच्या वेळचे खत घालायचे आहे, त्यानंतर दीड-दोन फूट रोप झाल्यावर जे खत लागते ते घालायचे आहे. म्हणजे खत देण्याच्या पाळया असतात त्यांचे संपूर्ण वर्णन करण्याची आवश्यकता नाही, तेवढा वेळही नाही, सांगण्यासारखी परिस्थिती सुध्दा नाही. महाराष्ट्रामध्ये खताची मागणी किती आहे ते सांगतो. माझ्याकडे केंद्र सरकारचे 2006-07 मधील मॅन्यूअल आहे. त्यामध्ये 12-15 प्रकारच्या खताची विभागनिहाय मागणी दिलेली आहे. एकूण मागणी 48 लाख 22 हजार 350 टन इतकी नमूद केलेली आहे. त्यामध्ये सर्वात मोठी मागणी युरियाची आहे, त्यानंतर डीएपीची आहे. आपल्याकडे खतांची स्थिती कशी आहे ते सांगत असल्यामुळे सभागृहात माननीय कृषी मंत्री श्री.बाळासाहेब थोरात उपस्थित पाहिजेत अशी आमची मागणी होती. माननीय कृषी राज्यमंत्र्यांनी खताची बिलकूल टंचाई होणार नाही, असे असत्य सांगून सभागृहाची दिशाभूल करु नये. अन्यथा आम्ही आपल्याविरुध्द हक्कभंगाची सूचना देऊ. आपण सत्य असेल ते सभागृहात बोलावे. कारण शेतकरी आपल्याकडे अपेक्षेने पाहत आहे. कोणाची उणीधुणी काढण्यासाठी या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा राहिलेलो नाही. राज्यात निर्माण झालेल्या परिस्थितीवर मात करुन आपल्याला पुढे जायचे आहे. उद्ध्वस्त झालेल्या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

शेतक-यांना सांभाळण्याच्या भूमिकेतून आम्ही शासनासमोर उभे आहोत. परंतु वस्तुस्थिती तर सभागृहात आम्हाला मांडावीच लागेल. माझ्याकडे अधिकृत आकडेवारी आहे, आपण उत्तरामधून जी आकडेवारी देणार आहात तीच आकडेवारी माझ्याकडे आहे. डीएपी खताची 35 हजार मे.टनाची मागणी असताना केवळ 5 हजार मे.टन खत आले आहे. 10 : 26 : 26 या खताची 15 हजार मे.टनाची मागणी होती, त्यापैकी काहीच आले नाही. 12 : 32 : 16 या खताची 15 हजार मे.टनाची मागणी होती, त्यापैकी केवळ 2500 मे.टन आले आणि सल्फर, फॉस्फेटची 30 हजार मे.टनाची मागणी असताना केवळ 500 मे.टन आले आहे. युरियाची 30 हजार मे.टनाची मागणी असताना केवळ 15 हजार मे.टन आले. पोटॅशची 1 हजार मे.टनाची मागणी असताना काहीच आले नाही. एक महिन्यासाठी 1 लाख 26 हजार मे.टनाची तातडीची मागणी होती, त्यापैकी 23 हजार मे.टन खत आले. खताचा हा तुटवडा नाही काय ? हा तुटवडाच आहे. शेतक-यांच्या मेळाव्यामध्ये मी जाहीरपणे बोललो होतो की, तुम्ही दुकानदारावर दगडफेक करु नका. दुकानदाराच्या घरामध्ये खताचा साठा असेल आणि तो काळया बाजारात विकत असेल तर त्याला सोडूच नका. पण दुकानदारालाच खत उपलब्ध झाले नसेल तर तो शेतक-यांना कोठून देणार ? त्यामुळे मी फर्टिलायझर ॲक्टच्या कोशामध्ये गेलो होतो, म्हणून मी मुद्दाम सांगत आहे. जसे पेट्रोलपंपवाला कमिशन घेऊन पेट्रोल विकतो. त्याला कंपनीकडून पेट्रोल आणून दिले जाते. तसे सरकारने खत आणून त्या परवानाधारकाला दिले पाहिजे. त्यानंतर तो परवानाधारक शेतक-यांच्या मागणीप्रमाणे खत देईल. पण ही सर्व मंडळी खूप हुशार आहेत. हे दुकानदार वेगळे आहेत. या लोकांचे सहकार कारखाने आहेत, त्यांनी कारखान्याच्या नावाने परवाने काढले आहेत. त्यामुळे तेथे रॅकच्या रॅक भरुन खत घेऊन जातात. मंत्रिमहोदयांनी उत्तरामध्ये सांगावे. मला कोणचेही नाव घेण्यास भाग पाडू नका. इतक्या मोठया खत टंचाईमुळे पोलिसांचा लाठीमार होत आहे. खतासाठी शेतकरी रांगा लावत आहेत. पण खताचे दलाल कसे निर्माण झाले आहेत आणि त्यांना मी डोळयांनी पाहिले आहे म्हणून सांगतो. ते दलाल लाईनमध्ये उभे राहिले होते, मग रिक्षावाला, नोकर ज्याचा काही संबंध नाही असे लोक लाईनमध्ये उभे राहिले, त्यांनी खताच्या बॅगा घेतल्या आणि त्या बॅगा ब्लॅकमध्ये विकल्या आहेत. मीच आमच्या जिल्हा प्रमुखांना हरकत घेण्यास सांगून तो प्रकार थांबविण्यास सांगितले.

यानंतर श्री.शिगम..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....)

प्रत्येकाकडील 7/12 पाहून खताचे वाटप करावयास पाहिजे होते. ज्याला खताचे वाटप करायचे आहे तो शेतकरी असल्याचे काही तरी डाक्युमेंट पाहिले पाहिजे. तेव्हा खताचे वाटप करताना अशा प्रकारे तुम्ही डाक्युमेंट घेतले होते काय ते सांगा. ह्या गोष्टी माननीय मंत्री महोदय नाकारु शकणार नाहीत. ज्याप्रमाणे पेट्रोल आणि डिझेल मनमानेल त्या प्रमाणे आणि मानमानेल तेथे विकता येत नाही त्याप्रमाणे खत देखील मनमानेल तसे आणि मनमानेल तेथे विकता येत नाही. कारण तसा कायदा आहे. असे असताना शासनाने कोणत्या अधिकारामध्ये तहसीलदार कार्यालय आणि पोलीस स्टेशनमधून खत विकले ? हे खत कोणत्या शेतक-यांना आणि कशा पध्दतीने विकले ? अशा प्रकारे कायद्याचा भंग शासनाने का केला ? कारण शासनाकडे शेतक-यांना द्यायला खत नव्हते. आपल्या जाणा-या अब्रूला झाकण्यासाठी तहसीलदार कार्यालय आणि पोलीस स्टेशनमधून खत वाटण्यात आले. हे वाटप करण्यासाठी जिल्ह्यामध्ये दुसरी कोणती यंत्रणा नव्हती काय ? राज्यामध्ये खताच्या वाटपाची अक्षरश: दुर्दशा झालेली आहे. माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या वडिलांच्या पुण्याईकडे पाहून शेतक-यांचा अपमान करु नये. त्यांनी खताची टंचाई आहे असे जाहीरपणे सांगावे. आम्ही ज्या ज्या वेळी आघाडी शासनाला प्रश्न विचारतो त्या त्या वेळी हे आघाडी शासन उलट विचारते की, युती शासनाने काय केले ? शेजारच्याला पोर होत नाही म्हणून तूला होत नाही असे थोडेच आहे? प्रत्येक वेळी युतीने काय केले असे हे शासन विचारते. या खात्याचे पूर्वीचे केन्द्रीय मंत्री श्री.सुरेश प्रभू यांनी दिनांक 29 सप्टेंबर 2007 रोजी माननीय पंतप्रधानाना पत्र लिहिले. त्यांच्या पत्रामध्ये इंग्रजी भाषेचा सुडौलपणा मला दिसला. म्हणून त्या पत्रातील काही ओळी मी आपणास वाचून दाखवितो. त्या पत्रामध्ये त्यांनी असे लिहिले आहे की, "I am encroaching upon your valuable time to draw your kind attention to some of the important issues." त्यांनी असे म्हटले आहे की "I am encroaching upon you valuable time" means "Please spare your time". त्या पत्रात पुढे असे म्हटले आहे की, "The country is facing shortage of fertilizers. I understand that India is going to import about 4 million tons Urea, 2.6 million tons DAP

..2..

(श्री. दिवाकर रावते....)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

and 3.8 million tons Potash during 2006-07 to meet the demand-supply gap". त्या पत्रात पुढे असे म्हटले आहे की, " provide a conducive environment to encourage efficiency, competition and the much needed fresh investment in the fertilizer sector. The current Government policies are leading the fertilizer industry to sickness" खत कशा प्रकारे आयात करावे लागणार आहे, हे खत आयात करीत असताना कशा पकारे भाववाढ होणार आहे, खाजगी कंपन्या कशा प्रकारे बंद होण्याच्या मार्गावर आहेत या सर्व गोष्टी त्या पत्रामध्ये नमूद करण्यात आलेल्या आहेत. त्यांनी वार्निंग दिलेली आहे की सरकारच्या अस्तित्वात असलेल्या धोरणाप्रमाणे या इंडस्ट्रीज सिकनेसकडे जात आहेत. त्या पत्रात पुढे असे म्हटले आहे की, "Ports have already been chocked up with inward traffic of wheat of wheat cargoes." पुढे असे म्हटले आहे की, "The increased fertilizer imports have further added to the Ports congestion resulting in substantial demurrages."आमच्या साहेबांनी अफाट गहू आणला. त्यामुळे सगळया बंदरे जाम झालेली आहेत. बोटी बंदराबाहेर उभ्या राहिल्या तर त्याचे पैसे बोट मालकाला नाही तर पार्टीला द्यावे लागतात. त्या पत्रात पुढे असे म्हटले आहे की, "The inland rail transportation infrastructure is inadequate to transport such high volumes so as to ensure delivery of the much needed fertilizers during its peak consumption period in the near future for Rabi crops. Such transportation bottlenecks are bound to deprive farmers of this much needed input at the right time." खत वेळेवर न पोहोचण्याची समस्या ही रेल्वेमुळे निर्माण झालेली आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

रेल्वेच्या अडचणीमुळे राज्यातील शेतक-यांना खत पुरविणे कठीण जाईल अशा प्रकारची बाब माननीय पंतप्रधान यांच्या निदर्शनास आणून दिली होती. त्या पत्रात पुढे असे म्हटले आहे की, "I request for your kind personal intervention to look at the policies under formulations in

respect of agriculture and farm inputs (like fertilizers) so as to make them more transparent." केंद्रीय माजी मंत्र्यांनी या परिस्थितीबाबत माननीय पंतप्रधानांना अगोदरच पत्रान्वये कल्पना दिली होती. या ठिकाणी सरकार कशासाठी कारणे सांगत आहे ? रेल्वे, ट्रक, बंदरे ही कारणे कशासाठी सरकार सांगत आहे ही गोष्ट मला कळली नाही. नको असलेला गहु आयात केला त्यामुळे वाईट परिस्थिती निर्माण झाली आहे. त्या गोष्टीचा देखील माजी केंद्रीय मंत्र्यांनी आपल्या पत्रात उल्लेख केलेला आहे. काहीही कारणे देऊन शेतक-यांचा प्रश्न सुटणार आहे काय ? कोणतीही कारणे देऊन सरकारने केलेली पापे लपणार आहेत काय ? या गोष्टीचा खुलासा सभागृहात केला गेला पाहिजे.

सभापती महोदय, खतांमध्ये जी काही कमतरता आहे, ती मिश्रखतांमुळे भरुन काढली जाते. पर राज्यातील कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी सांगितले की, महाराष्ट्रातील मातीला मिश्रखते दिली तर ती जास्त उपयुक्त ठरतील. देशातील इतर राज्यात मिश्रखते विकत घेतली जात नाहीत. परंतु महाराष्ट्रात मात्र मिश्रखताने क्रांती घडविली आहे हे सत्य आहे. मिश्रखतांचे कारखाने निर्माण करावयाचे धोरण राज्य शासनाने अवलंबिले आहे. महाराष्ट्र राज्य कृषी औद्योगिक विकास महामंडळ हे राज्य शासनाच्या अखत्यारितील महामंडळ आहे. त्या महामंडळाचे अध्यक्ष आदरणीय कृषी मंत्री आहेत. दि स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटींग फेडरेशन, मुंबई ही देखील राज्य शासनाची कंपनी आहे. या राज्याला मिश्रखताची किती गरज आहे यासंबंधीचे पूर्ण कोस्टक माझ्याकडे उपलब्ध आहे. मिश्रखते तयार करणारे कारखाने सरकारचे आहेत. मिश्रखतांचे कारखाने सरकारने निर्माण केले आहेत. त्या कारखान्यातून निर्माण होणारे मिश्रखताने राज्याची गरज भागत नाही. म्हणून या राज्यात मिश्रखतांचे खाजगी कारखाने सुरु केले गेले. या ठिकाणी मिश्रखतांचे कारखाने सुरु करा म्हणून त्या कारखानदारांना शासनाने बोलाविले आणि त्यांना कारखाने सुरु करण्यास परवानगी दिली. या राज्यात अकोला, औरंगाबाद, जालना, नांदेड, अमरावती, यवतमाळ, सांगली, कोल्हापूर, लातूर येथेही खाजगी मिश्रखतांचे कारखाने सुरु आहेत. हे कारखाने एकूण 27 टक्के

2...

श्री. दिवाकर रावते....

खत तयार करतात. या खाजगी मिश्रखतांच्या कारखान्यांनी फक्त या राज्यापूरतेच मिश्रखते निर्मिती करावी म्हणून परवानगी दिलेली आहे. परंतु या कारखान्यातील मिश्रखते बाहेरील राज्यात विकत घेतले जात नाही. आपल्या राज्यात खताची टंचाई नको म्हणून परराज्यातील कारखानदारांना बोलावून कारखाने सुरु केले. नर्मदा ॲग्रो केमिकल्स, छत्तीसगड, ए.पी.इंडियन बोयो-केमिकल्स,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मध्यप्रदेश, सुहाना ॲग्रो लिमिटेड, मध्यप्रदेश, सुमन ॲग्रो ॲन्ड फर्टिलायझर, मध्यप्रदेश, या कारखान्यातील खते आपल्या राज्यात आली आहेत. या कारखान्यांमधून आलेल्या खतांमध्ये मातीचे प्रमाण खूप होते. त्या खताचा परिणाम असा झाला की, शेतक-यांच्या शेतीच्या उत्पादनात काहीही फरक पडला नाही. माती मिश्रीत खत कारखान्यांवर कोणत्याही प्रकारची कारवाई राज्य शासनाच्या वतीने करण्यात आली नाही. या कारखान्यातील खतांवर शासनाने बंदी का घातली नाही ? .....

तालिका सभापती (श्री. भास्कर जाधव) : मी सन्माननीय सदस्यांना विचारु इच्छितो की, आपणाला अजून किती वेळ बोलावयाचे आहे ?

श्री. दिवाकर रावते : हा गंभीर विषय असल्यामुळे मला अजून अर्धा तास बोलावयाचे आहे.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, सभागृहाची वेळ सायंकाळी 6.00 वाजेपर्यंतच वाढविण्यात आली आहे. उद्या पुन्हा या विषयावर सभागृहात चर्चा होणार आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. रावते यांना आपले उर्वरित भाषण पूर्ण करण्यासाठी उद्या पुन्हा संधी उपलब्ध करुन द्यावी अशी माझी विनंती आहे.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांचे भाषण पूर्ण झालेले नसल्यामुळे त्यांना उद्या बोलण्याची संधी देण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : ठीक आहे.

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव) : सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक 17 जुलै, 2008 रोजी सकाळी 10.00 वा. पुन: भरेल. सकाळी 10.00 ते 12.00 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. त्यामध्ये दुष्काळासंबंधी अपूर्ण राहिलेली चर्चा घेण्यात येईल. त्यानंतर दुपारी 12.15 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 1 मिनिटांनी गुरुवार, दिनांक 17 जुलै, 2008 च्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही